यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगा घरोघरी

भारतीय संविधानाची ओळख

COURSE CODE : VECD101
BOOK CODE : VECD1012



पुस्तक २

भारतीय संविधान
मूलभूत हक्क, कर्तव्ये आणि शासन व्यवस्था



यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र मुक्त
विद्यापीठ

VECD101
भारतीय संविधानाची ओळख
Book code: VECD1012

पुस्तक २

भारतीय संविधान : मूलभूत हक्क, कर्तव्ये आणि शासन व्यवस्था

लेखक : ॲड. निलेश खानविलकर, डॉ. सुनील गावंडे

घटक १ : मूलभूत हक्क (पार्श्वभूमी व न्यायालयीन संरक्षण) १

घटक २ : राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे २०

घटक ३ : मूलभूत कर्तव्ये ३३

घटक ४ : भारतीय शासन व्यवस्था ४६

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

कुलगुरू : प्रा. संजीव सोनवणे

संचालक : नागार्जुन वाडेकर, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

विद्याशाखा परिषद

प्रा. नागार्जुन वाडेकर (अध्यक्ष)
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य. च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. जयदीप निकम
संचालक व वरिष्ठ प्राध्यापक
निरंतर शिक्षण विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. शिवाजी सरगर
संचालक
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षणकेंद्र
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रा. प्रकाश पवार
प्रमुख, राज्यशास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ
विद्यानगर, कोल्हापूर

प्रा. राजेंद्र कुंभार
(सेवा निवृत्त) ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे

प्रा. संजय तांबट
प्रमुख, संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे

प्रा. चेतना कामळस्कर
संचालक
विज्ञान विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. संदिप चौधरी
प्रमुख, समाजशास्त्र विभाग
सरस्वती भुवन महाविद्यालय, सरस्वती कॉलनी
औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर

प्रा. देवेंद्र इंगळे
इतिहास विभाग प्रमुख
मूळजी जेठा महाविद्यालय (स्वायत्त)
जळगाव

डॉ. लतिका गायकवाड
सहयोगी प्राध्यापक,
वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा ,
य. च. मुक्तविद्यापीठ, नाशिक

डॉ. सुभाष सोनुने
सहायक प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
य. च. मुक्तविद्यापीठ, नाशिक

राज्यस्तरीय शिक्षणक्रम सल्लागार समिती (लोकप्रशासन)

प्रा. नागार्जुन वाडेकर (अध्यक्ष)
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य. च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. डॉ. श्याम शिरसाठ
प्रमुख, लोकप्रशासन विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

प्रा. डॉ. जितेंद्र वासनिक
प्रमुख, लोकप्रशासन विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर
विद्यापीठ, नागपूर

प्रा. डॉ. बालाजी कत्तुरवार
लोकप्रशासन विभाग,
देगलूर महाविद्यालय, देगलूर

प्रा. डॉ. मृदुल निळे
नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभाग,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रा. डॉ. शामसुंदर वाघमारे
लोकप्रशासन विभाग,
शारदा महाविद्यालय, परभणी

प्रा. डॉ. संजय भालेराव
लोकप्रशासन विभाग,
शिवाजी महाविद्यालय, कन्नड

प्रा. डॉ. प्रकाश पवार
प्रमुख, राज्यशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. डॉ. विजय तूंटे
राज्यशास्त्र विभाग,
प्रताप महाविद्यालय, अमळनेर

प्रा.डॉ. पांडुरंग भोये
राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग,
सा. फु. पु. विद्यापीठ, पुणे

प्रा. डॉ. जयश्री बिरदवडे
लोकप्रशासन विभाग,
ए. बी. भांडवलदार महाविद्यालय,
देवगाव (रं) छत्रपती संभाजीनगर

प्रा. डॉ. मीरा फड
लोकप्रशासन विभाग,
यशवंत महाविद्यालय, नांदेड

प्रा. डॉ. अमोल काळे
लोकप्रशासन विभाग,
पीपल्स महाविद्यालय, नांदेड

डॉ. योगेश भादे
लोकप्रशासन विभाग,
विवेकानंद महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

कुलगुरू : प्रा. संजीव सोनवणे

संचालक : प्रा. नागार्जुन वाडेकर, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

लेखक

ॲड. निलेश खानविलकर
बी. ५०३, सागर सोसायटी
रिझवी बिल्डींग तानाजी नगर
(मालाड पूर्व) पूर्व, मंबई

डॉ. सुनील गावंडे
शैक्षणिक संयोजक
(सहायक प्राध्यापक स्तर)
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

संपादक

सुभाष वारे
प्लॉट नं. ७२ मुळे कॉलनी,
लंडन किड्स शाळेच्या मागे
शाहुनगर, केडगाव
जि. अहिल्यानगर

शिक्षणक्रम संयोजक

डॉ. सुनील गावंडे
शैक्षणिक संयोजक (सहायक प्राध्यापक स्तर)
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

निर्मिती

श्री. विलास बधान
व्यवस्थापक (प्र.), ग्रंथनिर्मिती केंद्र
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

© *2025, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक*

● **प्रथम प्रकाशन :** ऑगस्ट २०२५ ● **प्रकाशन क्रमांक :** ३०९७
● **मुखपृष्ठ रेखाटन :** श्री. कांचन शिंदे, ग्रंथनिर्मिती केंद्र
● **अक्षरजुळणी :** गुलाब घाटाळ, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
● **प्रकाशक :** श्री. दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक -४२२ २२२

ISBN : 978-81-991885-9-4 *AB-25-29 (Yogesh)*

पुस्तक दुसरे : भारतीय संविधान : मूलभूत हक्क, कर्तव्ये आणि शासन व्यवस्था

प्रास्ताविक

भारतीय संविधान व प्रशासन या अभ्यासक्रमातील भारतीय संविधान : आपले हक्क आणि कर्तव्ये हे दुसरे पुस्तक आहे. ह्या पुस्तकात भारतीय संविधानातील मूलभूत हक्क, भारताचे नीतिनिर्देशक तत्वे, मूलभूत कर्तव्ये आणि संविधानातील प्रशासन विषयक तरतुदींबाबत माहिती देण्यात आलेली आहे.

घटक १ : मूलभूत हक्क (पार्श्वभूमी व न्यायालयीन संरक्षण) या घटकामध्ये मूलभूत हक्क यांची पार्श्वभूमी, मूलभूत हक्कांचे महत्व, मूलभूत हक्कांचे न्यायालयीन संरक्षण या संदर्भात माहिती देण्यात आलेली आहे.

घटक २ : राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे या घटकामध्ये राज्याची नीती निर्देशक तत्वे , त्यांचे महत्व आणि मूलभूत अधिकाराशी राज्याची नीती निर्देशक तत्वे यांचा संबध याबाबत माहिती देण्यात आलेली आहे.

घटक ३ : नागरिकांची मूलभूत कर्तव्ये या घटकामध्ये मूलभूत कर्तव्ये, त्यांचे महत्व आणि मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये यांमधील फरक बाबत माहिती देण्यात आलेली आहे.

घटक ४ : भारतीय शासन व्यवस्था या घटकामध्ये राष्ट्रपती, राज्यसभा, लोकसभा, सर्वोच्च न्यायालय, घटना दुरुस्तीची प्रक्रिया इत्यादी विषयी सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

सदर पुस्तकाचा अभ्यास केल्यानंतर भारतीय संविधानातील मूलभूत हक्क, राज्याची नीती निर्देशक तत्वे, मूलभूत कर्तव्ये आणि भारतीय शासन व्यवस्था याबाबत माहिती मिळेल. नागरिकता ही भारतीय संविधानामुळे मिळते त्यामुळे नागरिक म्हणून संविधानाचा आदर करणे आपले प्रथम कर्तव्य आहे. भारतातील प्रत्येक जागृत नागरिकाने संविधानातील हे महत्वाचे भाग समजून घेणे आवश्यक आहे. सविस्तर माहितीसाठी प्रत्येक घटकाच्या शेवटी अधिक वाचनासाठी दिलेल्या संदर्भ पुस्तकांचा अभ्यास करावा.

घटक १ : मूलभूत हक्क (पार्श्वभूमी व न्यायालयीन संरक्षण)

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय -विवेचन

१.२.१ मूलभूत हक्क : मूलभूत हक्कांची पार्श्वभूमी आणि इतिहास

१.२.२ संविधानातील मूलभूत हक्कांच्या तरतुदी

१.२.३ मूलभूत हक्कांचे महत्व

१.२.४ मूलभूत हक्कांना न्यायालयीन संरक्षण

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके व इतर साधने

१.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

- भारतीय संविधानातील मूलभूत हक्कांची पार्श्वभूमी व इतिहासाची माहिती मिळेल.
- भारतीय संविधानातील मूलभूत हक्काबाबतच्या तरतुदी समजतील.
- मूलभूत हक्काचे महत्व कळेल.
- भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारांचे न्यायालयीन संरक्षणाबाबत माहिती मिळेल.
- मूलभूत हक्क आणि राज्याची नीती मार्गदर्शक तत्त्वे यांच्यातील फरक समजू शकेल.

१.१ प्रास्ताविक

भारतीय संविधान हा भारतातील सर्वोच्च कायदा आहे. संविधानामुळे भारतामध्ये कायद्याचे राज्य प्रस्थापित झाले आहे. भारताची राजकीय व्यवस्था ही संविधानाने आखलेली आहे. संविधानामध्ये मूल्ये, तत्त्वे व राज्याचे स्वरूप दिलेले आहे. संविधानामध्ये व्यक्ती आणि नागरिकांचे मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये निश्चित केलेली आहेत. संविधानामध्ये राज्यांची नीती मार्गदर्शक तत्त्वे सांगितलेली आहेत ज्यांच्या आधारे राज्याने राज्यकारभार केला पाहिजे. संविधानामध्ये शासनाची चौकट आखलेली आहे. ज्यात प्रामुख्याने शासन, प्रशासन आणि न्यायमंडळ व्यवस्थेचा समावेश होतो. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यामध्ये समन्वय आणि संतुलन राखण्याचे

काम भारतीय संविधान करते. कायदेमंडळाचे काम हे कायदा बनविण्याचे आहे, कायदेमंडळाला आपण शासन म्हणून ओळखतो. कार्यकारी मंडळाचे काम हे कायद्याची अंमलबजावणी करणे हे असते, कार्यकारी मंडळाला आपण प्रशासन म्हणून ओळखतो. तसेच न्याय मंडळाचे काम हे कायद्याचा योग्य अर्थ लावणे हे असते.

प्रशासन आणि संविधानाचा अत्यंत जवळचा संबंध आहे. संविधानाचा आधार घेवून कायदे बनवले जातात. कायद्याची अंमलबजावणी लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम हे प्रशासन करत असते. भारतात सर्वात जास्त कायदे हे मूलभूत हक्क आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांचा आधार घेवून बनलेली आहे. ह्या कायद्यांच्या अंमलबजावणीद्वारे सामान्य व्यक्तीपर्यंत हक्क पोहचण्याचे काम हे प्रशासन करते. त्यामुळे संविधान आणि प्रशासन यांचा संबध समजून घेणे गरजेचे आहे.

भारतीय संविधान हे २२ भागांमध्ये विभागले आहे. या मधील सर्वात महत्वाचा भाग म्हणजे भाग ३ मुलभूत हक्कांचा. अनुच्छेद १३ नुसार एखादा कायदा हा मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारा असल्यास तो कायदा रद्द ठरविला जावू शकतो. म्हणजेच कायद्याची वैधता तपासण्यासाठी मुलभूत हक्क समजून घेणे गरजेचे आहे. संविधानाच्या अंमलबजावणीसाठी शासन आणि प्रशासन हे विविध प्रकारचे कायदे तयार करतात. ह्या कायद्याची प्रशासनाच्या माध्यमातून अंमलबजावणी केली जाते. त्यामुळे प्रशासनाचे काम समजून घेण्यासाठी मूलभूत हक्क समजून घेणे गरजेचे आहे.

१.२ विषय-विवेचन

मूलभूत हक्क हे मानवी हक्क असून व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वाचे आणि अत्यावश्यक असतात. मूलभूत हक्कांना भारतीय संविधानातील मुलभूत अधिकारांची सनद असे म्हटले जाते. मूलभूत हक्क संविधानाद्वारे बहाल करण्यात आले असल्यामुळे, त्यांना कायदेशीर दर्जा देखील मिळाला आहे. मूलभूत हक्क हे व्यक्तीच्या सर्वांगीण बौद्धिक, भौतिक, मानसिक, नैतिक आणि आध्यात्मिक विकासाठी गरजेचे असतात. मूलभूत हक्क नागरिकाला समाजासोबत जोडून ठेवण्याचे काम करत असतात. मूलभूत हक्क समाजात असे काही वातावरण निर्माण करतात कि, ज्यामुळे प्रत्येक व्यक्तीला त्याचे व्यक्तिमत्व विकसित करण्यास मदत होते.

१.२.१ मूलभूत हक्काची पार्श्वभूमी आणि इतिहास

मूलभूत हक्क हे मानवी हक्क असून मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वाचे आहेत. जगभरात देश स्वतंत्र होत असताना मूलभूत हक्कांचा विचार केला गेला. १२०० – १४०० दशकापासून मूलभूत हक्कांबाबत जगभरात चर्चा होत होती. त्यामुळे मूलभूत हक्क समजून घेताना मूलभूत हक्क बाबत इतिहास समजून घेणे खूप महत्वाचे आहे.

१. **मॅग्ना कार्टा :** १२१५ मध्ये इंग्लंड चा राजा जॉन याने त्याच्या प्रजेसाठी लिखित स्वरुपात अधिकारांचे परिपत्र जाहीर केले, त्याला मॅग्ना कार्टा (Magna Carta) म्हटले जाते. मॅग्ना कार्टा (Magna Carta) हे सर्वात पहिले लिखित अधिकारांचे परिपत्र म्हणून ओळखले जाते. याद्वारे लोकांना स्वातंत्र्याची हमी दिली गेली होती. याचा जगभरातील देशांच्या संविधानातील मूलभूत हक्कांवर प्रभाव आहे. या परिपत्रानंतर १६८९ मध्ये विकसित झालेला इंग्लंड मधील कायदा हा नागरिकांच्या हक्काची व स्वातंत्र्याची हमी देतो. बिल ऑफ राईट हा मॅग्ना कार्टा नंतर नागरी स्वातंत्र्याची हमी देणारा इंग्लंड मधील सर्वात महत्वाचा कायदा मानला जातो. भारतीय संविधानातील मूलभूत हक्कांना भारताचा मॅग्ना कार्टा म्हणून ओळखले जाते.

२. **विविध राज्यक्रांती** : ज्याप्रमाणे मूलभूत हक्कांवर मॅग्ना कार्टाचा प्रभाव आहे त्याचप्रमाणे भारतीय संविधानातील मूलभूत हक्कांवर इंग्लंडचे हक्कांविषयीचे विधेयक, अमेरिकन संयुक्त राज्यांचे हक्कांविषयीचे विधेयक, आणि फ्रान्सचे माणसाच्या अधिकाराच्या घोषणा यांचा प्रभाव दिसून येतो. जगभरात विविध देशांत राजेशाहीच्या विरोधात लोकांचा उठाव होऊ लागला. या उठावातून फ्रांस, अमेरिका यासारख्या देशात राज्यक्रांती झाल्या. या राज्यक्रांती विविध मानवी मूल्ये आणि हक्क यांचा विकास होत गेला. फ्रांसमध्ये मनुष्याचे नैसर्गिक व अविभाज्य, पवित्र हक्क म्हणून फ्रांस च्या राज्यक्रांतीच्या घोषणा पत्रात घोषित केले गेले. त्यानंतर फ्रेंच राज्यक्रांती १७८९ मध्ये समता (Equality), स्वातंत्र्य (Freedom), बंधुत्व यांचा विकास झाला. फ्रेंच राज्यक्रांतीच्या घोषणेने अशी तरतूद केली की " सर्व राजकीय संघटनांचे उद्दिष्ट हे माणसाच्या नैसर्गिक आणि अपरिहार्य हक्कांचे संरक्षण करणे आहे". १२१५ मध्ये मॅग्ना कार्टा, १६८९ मधील इंग्लिश बिल ऑफ राईटस, फ्रांस डिक्लेरेशन ऑफ राईटस ऑफ मॅन अँड द सिटीझन नंतर अमेरिकन लोकांनी त्यांच्या संविधानात हक्काचे विधेयक सामविष्ट केले. इंग्लिश राजेशाही पासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, अमेरिकन लोकांना भाषण, माध्यमे आणि धर्म बाबत स्वातंत्र्य हवे होते जे बिल ऑफ राईट्स मुळे मिळाले. विविध देशाच्या विविध न्यायालयांनी वेळोवेळी या मूलभूत हक्कांना संरक्षण देण्याचे काम केले आहे. तसेच विविध देशांच्या राज्यघटनेने मूलभूत हक्कांची तरतूद केली आहे व त्यांना कायदेशीर संरक्षण दिलेले आहे.

३. **मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा [UDHR]** : दुसऱ्या महायुद्धानंतर पुन्हा असा हिंसाचार होवू नये म्हणून जगभरातील विविध देश एकत्र येवून त्यांनी संयुक्त राष्ट्र नावाची संघटना स्थापन केली. १० डिसेंबर १९४८ रोजी या संयक्त राष्ट्राने मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा स्वीकारली. यास मानवी हक्कांचा जाहीरनामा देखील म्हटले जाते. या 'मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा मध्ये संपूर्ण जगभरातील व्यक्तींचे जन्मजात कोणकोणते हक्क आहेत याचा उहापोह केला आहे. मानवी हक्काचा जाहीरनामा संयुक्त राष्ट्राने स्वीकारल्यावर विविध देशांतील सरकारांनी त्यांच्या देशांतर्गत उपाययोजना आणि कायदे करण्याचे काम हाती घेतले. मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणेचा मसुदा तयार करण्यासाठी जबाबदार असणारे संयुक्त राष्ट्र मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष एलेनॉर रुझवेल्ट यांनी मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणेला मानवतेचा मॅग्ना कार्टा म्हणून म्हटले आहे. संयुक्त राष्ट्र बनून मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा बनण्याचा कालावधी आणि भारतीय संविधान संविधान सभा बनण्याचा कालावधी हा साधारण सारखा आहे. भारतीय संविधानातील मूलभूत हक्कांवर या मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणेचा प्रभाव दिसून येतो.

४. **स्वातंत्र्याची चळवळ** : स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य सैनिकांची भारतातील संविधानात मूलभूत हक्कांची हमी असावी अशी तीव्र इच्छा आणि सततची मागणी होती. भारताच्या संविधानात मूलभूत अधिकारांच्या जाहीरनाम्याचा समावेश असावा, हा विचार १८९५ मध्ये ॲनी बेझंट ह्यांनी त्या वर्षीच्या काँग्रेस अधिवेशनात मांडला व तेव्हापासून तो सातत्याने मांडला गेला. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नेहरू समिती तयार करून नेहरू अहवाल १९२८ मध्ये तयार करण्यात आला. यामध्ये भारतीयांना स्वातंत्र्यानंतर मूलभूत हक्क मिळाले पाहिजे याची मागणी करण्यात आली होती. तसेच धार्मिक स्वातंत्र्य भारतीयांना मिळेल याचा उल्लेख देखील नेहरू अहवालामध्ये करण्यात आला होता. स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय सभा [काँग्रेस]अशी अधिवेशने भरवत असे. १९३१ साली कराची येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाचे अध्यक्ष हे सरदार वल्लभभाई पटेल होते. त्यांनी या अधिवेशनामध्ये मूलभूत अधिकारांची मागणी केली. तसेच स्वातंत्र्यपूर्व काळात कम्युनिस्ट पार्टीचे नेते एम. एन रॉय यांनी देखील ब्रिटीशांकडे मूलभूत हक्कांची मागणी केली होती.

५. **संविधान सभा :** १९४६ साली संविधान तयार करण्यसाठी संविधान सभा गठीत करण्यात आली. या संविधान सभेत विविध कामासाठी विविध समित्या तयार करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये मूलभूत हक्कासाठी देखील समिती तयार करण्यात आली होती. संविधान सभेतील मुलभूत हक्कांच्या समितीचे 8

६. अध्यक्ष हे सदर वल्लभभाई पटेल होते. मूलभूत हक्काच्या समितीमध्ये देखील विविध मूलभूत हक्कावर चर्चा होत होती. संविधान सभेत संविधानाचा मसुदा तिसऱ्या वेळी सादर केल्यानंतर संमत झाला. या तिन्ही वेळेच्या मसुद्यामध्ये मूलभूत हक्कांचा समावेश होता.

संविधानातील मूलभूत हक्कांचा इतिहास आणि पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी मॅग्ना कार्टा, जागतिक प्रभाव, मानवी हक्कांची सार्वत्रिक घोषणा, स्वातंत्र्याची चळवळ आणि संविधान सभा हे मुद्दे समजून घेतल्यावर कळते की मूलभूत हक्क हे मानवी हक्क असून त्यांचा काळानुसार विकास झालेला आहे. मूलभूत हक्क हे मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक आहेत.

१.२.२ मूलभूत हक्क संदर्भात संविधानातील तरतुदी

देशातील व्यक्तींना स्वतःच्या आणि समूहाच्या विकासासाठी अत्यावश्यक असलेल्या हक्कांना मूलभूत हक्क म्हटले जाते. मूलभूत हक्कांचा उद्देश हा व्यक्तीच्या जीवनात परिपूर्णता निर्माण करून व्यक्तीचे संरक्षण आणि विकास करणे होय. मुलभूत हक्क व्यक्तींच्या भौतिक, मानसिक, नैतिक, सामाजिक विकासासाठी महत्वाचे असतात. मूलभूत हक्कामुळे व्यक्ती देशात सुरक्षित असते तसेच यामुळे देशाचा देखील विकास होतो. मूलभूत हक्कांवर मानवी मूल्यांचा संबंध दिसून येतो. मूलभूत हक्कांना संविधानामध्ये सर्वोच्च स्थान आहे. मूलभूत हक्कांची रचना अशा प्रकारे केली गेली आहे की त्यात कोणत्याही जुलमी सरकार किंवा व्यक्तीद्वारे दुरुस्ती, उल्लंघन किंवा त्यांत हस्तक्षेप होऊ शकत नाहीत. काही हक्क सरकारवर निर्बंध आणि नियंत्रण आणतात. मूलभूत हक्क हे मानवी हक्क आहेत. काही मानवी हक्क संविधानात मूलभूत मानले गेले म्हणून आपण त्यांना मूलभूत हक्क म्हणतो. संविधानाने या हक्कांची अंमलबजावणी करण्याची तरतूद देखील केली आहे. काळ आणि परीस्थितीनुसार मूलभूत हक्कांमध्ये बदल होवू शकतात. संविधानाचा गाभा न बदलता संविधानातील मूलभूत हक्कांमध्ये सुधारणा करता येऊ शकते.

भारतीय संविधानामध्ये भाग तीनI मध्ये मूलभूत हक्क सांगितलेले आहेत. अनुच्छेद १२ ते ३५ पर्यंत मूलभूत हक्क संदर्भातिल तरतुदी आहेत. ह्या तरतुदी ८ प्रकारांमध्ये विभागल्या जातात. सुरवातीला ७ प्रकारचे मूलभूत हक्क होते परन्तु १९७८ मधील ४४ व्या घटना दुरुस्तीअंतर्गत मालमत्तेचा हक्क रद्द करण्यात आला. संविधानामध्ये अनुच्छेद ३१ नुसार असलेला मालमत्तेचा मूलभूत हक्क रद्द करून तो अनुच्छेद ३००क मध्ये कायदेशीर हक्क म्हणून जोडण्यात आला.

भारतीय संविधानामध्ये सहा प्रकारचे मूलभूत हक्क दिलेले आहेत.

१. समानतेचा हक्क (अनुच्छेद १४ ते अनुच्छेद १८)
२. स्वातंत्र्याचा हक्क (अनुच्छेद १९ ते अनुच्छेद २२)
३. शोषणापासून संरक्षणाचा हक्क (अनुच्छेद २३ ते अनुच्छेद २४)
४. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (अनुच्छेद २५ ते अनुच्छेद २८)
५. सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क (अनुच्छेद २९ ते अनुच्छेद 30)
६. सांविधानिक उपाययोजनेचा हक्क (अनुच्छेद ३२)

- **अनुच्छेद १२ : राज्य :** या अनुच्छेद मध्ये राज्य या संकल्पनेचा अर्थ सांगितलेला आहे. राज्य म्हणजे अशी व्यवस्था जी शासनाच्या अनुदानावर व शासनाच्या नियंत्रणाखाली बनलेली आहे. "राज्य" या शब्दामध्ये भारताचे सरकार, संसद आणि राज्य सरकार आणि प्रत्येक राज्याचे विधानमंडळ यांचा समावेश होतो. त्यात

महानगरपालिका, जिल्हा मंडळे, पंचायती, राज्य विद्युत मंडळे, पोर्ट ट्रस्ट यांसारख्या सर्व स्थानिक किंवा इतर प्राधिकरणांचा देखील समावेश होतो. या शब्दामध्ये भारताच्या हद्दीतील सर्व प्राधिकरणांचा समावेश होतो

- **अनुच्छेद १३ : मूलभूत हक्कांच्या विरोधातील कायदे बनवता येणार नाही :** भारतात मूलभूत हक्क विरोधात कोणतेही कायदे असू शकत नाहीत. अनुच्छेद १३ नुसार भारत स्वतंत्र होण्यापूर्वीचे कायदे जर मूलभूत हक्क विरोधात असतील तर ते कायदे अस्तित्वात असणार नाहीत. कायद्यामध्ये अध्यादेश, आदेश, उपविधी, नियम, विनिमय, अधिसूचना, रूढी किंवा परिपाठ यांचा समावेश होतो. या अनुच्छेदावरून संविधानातील मूलभूत हक्कांचे महत्व समजून येते.

१. समानतेचा हक्क (अनुच्छेद १४ ते अनुच्छेद १८)

समानतेचे हक्क हे भारतीय संविधानामध्ये अनुच्छेद १४ ते १८ मध्ये सांगितलेले आहेत. याद्वारे सामाजिक विषमता दूर करून बंधुता वाढीस लागून समता प्रस्थापित करण्यात आली आहे. समतेचा हक्क हा सर्वाधिक महत्त्वाचा आहे. लोकशाही प्रस्थापित होण्यासाठी हा हक्क अत्यावश्यक आहे. या हक्कांशिवाय इतर हक्कांना काहीच अर्थ उरत नाही. मूलभूत हक्क हे समाजात समानता टिकवून ठेवण्याचे कार्य करतात, त्यामुळे देशाच्या एकतेसाठी देखील ते महत्वपूर्ण ठरतात.

• **अनुच्छेद १४ : कायद्यापुढे समानता :** यामध्ये दोन हक्कांचा समावेश होतो. एक, कायद्यापुढे सर्व समान आहेत. दुसरे, राज्य सर्व व्यक्तींना कायद्याचे समान संरक्षण देईल. हा समानतेचा हक्क भारताच्या राज्यक्षेत्रात व सर्व व्यक्तींना लागू आहे. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि पंतप्रधान काही ठिकाणी अपवाद आहेत.

• **अनुच्छेद १५ : धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई :** यामध्ये राज्य म्हणजे सरकारी व्यवस्था नागरिकांशी धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या आधारावर भेदभाव करू शकत नाही. तसेच धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या कारणावरून दुकाने, सार्वजनिक उपहार गृहे, हॉटेल, सार्वजनिक करमणुकीचे स्थाने यांत प्रवेश रोखू शकत नाही. असे जरी असले तरी सरकारी व्यवस्था लहान मुले, महिला यांच्यासाठी विशेष तरतूद करण्याचा अधिकार आहे. तसेच सामाजिक व शैक्षणिक मागासलेला वर्ग, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजाती व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सरकार विशेष तरतूद करू शकते.

महाराष्ट्रातील शनी शिंगणापूरचे मंदिर आणि मुंबईचा हाजीअली दर्गा याठिकाणी महिलांना पुरुषांच्या बरोबरीने प्रवेश नव्हता. या लिंग आधारित विषमतेच्या विरोधात महिलांनी लढा दिला हे समानतेच्या हक्कांचे प्रतीक आहे. तसेच केरळमधील सबरीमला मंदिरात महिलांच्या प्रवेशासाठी दिलेला लढा ही या हक्कांचं द्योतक आहे. समान संधी ही समतेच्या हक्कातली आणखी एक महत्त्वाची गोष्ट. त्यानुसार मागास घटकांना आरक्षणाची तरतूद घटनेत करण्यात आली आहे. समाजातील सर्व घटकांना नोकरी आणि रोजगाराच्या समान संधी प्राप्त व्हाव्यात अशी तरतूद घटनेत आहे. शिक्षण क्षेत्रातील आरक्षणाची तरतूद ही अनुच्छेद १५ नुसार आहे. जानेवारी २०१९ मध्ये घटनेत दुरुस्ती करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही १० टक्के आरक्षण देऊ केलं आहे. आर्थिक निकषाच्या आधारे आरक्षण देऊ करणाऱ्या या घटना दुरुस्तीला सर्वोच्च नायालयात आव्हान दिले गेले होते. २७ नोव्हेंबर २०२२ रोजी या आव्हान याचिकेचा निकाल आला व तीन विरुद्ध दोन अशा बहुमताने आर्थिक निकषावर आरक्षण देणाऱ्या घटनादुरुस्तीला सर्वोच्च न्यायालयाने योग्य ठरविले.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निकाला विरोधात "द सोसायटी फॉर राईट्स ऑफ बॅकवर्ड कम्युनिटी" यांच्याद्वारे पुनर्विचार याचिका दाखल केली गेली होती. ९ मे २०२३ रोजी तत्कालीन सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी या पुनर्विचार याचिकेला काहीही आधार नसल्याचे मत मांडत ती फेटाळून लावली. अशा प्रकारे आर्थिक निकषावर आरक्षणास न्यायालयाने योग्य ठरविले आहे.

• **अनुच्छेद १६ : सार्वजनिक सेवा योजनाच्या बाबींमध्ये समान संधी :** सरकारी सेवांमध्ये धर्म, वंश, जात, लिंग, कुळ, जन्मस्थान, निवास या कारणावरून भेदभाव करता येणार नाही. सर्व नागरिकांना सरकारी नोकरी मध्ये समान संधी देण्यात येईल. असे असले सरकारी सेवांमध्ये मागासवर्गाला पर्याप्त प्रतिनिधित्व नसेल तर सरकारी व्यवस्था आरक्षणासारखी विशेष तरतूद करू शकते. आरक्षण हा सध्या वादाचा विषय बनवला गेला आहे. परंतु आरक्षण हे समानता आणण्यासाठीचे धोरण आहे. सरकारी नोकरीतील आरक्षणाची तरतूद ही अनुच्छेद १६ नुसार आहे.

• **अनुच्छेद १७ : अस्पृश्यता निवारण :** कोणत्याची स्वरुपाची अस्पृश्यता नष्ट करण्यात आलेली आहे. अस्पृश्यतेचे पालन करणे हे कायद्यानुसार शिक्षेस पात्र ठरवले आहे. अस्पृश्यता प्रतिबंध कायदा, १९५५ व अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ या कायद्याद्वारे अस्पृश्यतेचे पालन हे शिक्षेस पात्र ठरवले आहे.

• **अनुच्छेद १८ : किताब नष्ट करणे :** सेवाविषयक आणि विद्याविषयक तसेच मान सन्मान विषयक किताबांव्यतिरिक्त राज्य कोणालाही किताब देणार नाही. किताब दिल्याने समानतेचा भंग होतो. कोणत्याही भारतीय नागरिकास राष्ट्रपतीच्या परवानगीशिवाय विदेशी किताब स्वीकारता येणार नाही. तसेच कोणताही विदेशी नागरिक भारतात लाभाचे किंवा विश्वासाचे पद धारण करत असेल तर त्यासही विदेशी किताब राष्ट्रपतीच्या परवानगीशिवाय स्वीकारता येणार नाही.

२. स्वातंत्र्याचा हक्क (अनुच्छेद १९ ते अनुच्छेद २२)

स्वातंत्र्याचा हक्क हा सर्व हक्कांचा आत्मा आहे. मूलभूत हक नागरिकाला स्वतंत्ररित्या वावरण्याचा, विचार मांडण्याचा हक्क देतात, त्यामुळे देशातील नागरिकांच्या स्वातंत्र्याचे रक्षण होते, सोबतच हे हक्क देशात हुकूमशाही शासनाची स्थापना रोखण्यास देखील मदत करतात. त्यामुळे स्वातंत्र्याबाबत चे हक्क समजून घेणे गरजेचे आहे.भारतीय संविधानामध्ये अनुच्छेद १९ ते अनुच्छेद २२ पर्यंत स्वातंत्र्याच्या संदर्भातील हक्क सांगितले आहेत.

• **अनुच्छेद १९ : भाषण व इतर स्वातंत्र्य :** भारतीय संविधानातील अनुच्छेद १९ मध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संदर्भात ६ स्वातंत्र्याचे प्रकार सांगितले आहेत.

१. भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य
२. शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य
३. संघटना, संघ किंवा सहकारी संस्था बनविण्याचे स्वातंत्र्य
४. भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य
५. भारताच्या राज्यक्षेत्रात कोणत्याही भागात राहण्याचे व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य
६. कोणताही पेशा आचरण्याचे अथवा व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालविण्याचे स्वातंत्र्य

या सर्व स्वातंत्र्यांचा उपभोग हा फक्त भारतीय नागरिकांस घेता येईल. तसेच हे स्वातंत्र्य अमर्यादित स्वरूपाचे नसून त्यावर वाजवी निर्बंध घातले आहेत. भारताची सार्वभौमता व एकात्मता, राज्याची सुरक्षितता, परकीय देशांशी मैत्रीचे संबंध, सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता किंवा नीतिमत्ता यांच्या हितासाठी व न्यायालयाचा अवमान, अब्रुनुकसानी किंवा अपराधास चिथावणी यासंदर्भात राज्य वाजवी निर्बंध नागरिकांस घालू शकते.

अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे लोकशाहीचे बलस्थान आहे. त्यामुळे वर्तमानपत्रे व वृत्तवाहिन्या तसेच अन्य प्रसार माध्यमे यांना खूप महत्व आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याला अतोनात महत्त्व आहे. सर्व नागरिकांना त्यांचे विचार आणि मते मुक्तपणे मांडण्याचा हक्क आहे. यात केवळ तोंडी शब्दच नाही, तर लेखन, चित्रे, चित्रपट, बॅनर इत्यादीद्वारे मांडलेले मतदेखील समाविष्ट आहे. बोलण्याच्या अधिकारात न बोलण्याच्या अधिकाराचाही

समावेश होतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर कोणत्या ना कोणत्या प्रकारचं बंधन घालण्याचे प्रकार वारंवार होत असतात. यथायोग्य चिकित्सा करून न्यायालय या बाबत निर्णय देत असते. अनुच्छेद १९ मधील स्वातंत्र्य आणि अनुच्छेद २१ मधील जगण्याचा हक्क हे वेगळे नसून एकमेकाशी संबंधित आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे सकस लोकशाही राज्यासाठी अत्यावश्यक आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य या विषयावर जितका खल आतापर्यंत झाला आहे, तितका खचितच घटनेतील एखाद्या कलमावर झाला असेल.

• **अनुच्छेद २० : अपराधांबद्दलच्या दोषसिद्धीबाबत संरक्षण :** अनुच्छेद २० मध्ये गुन्हेगारांच्या संदर्भात हक्क सांगितले आहेत. अपराधाचा आरोप असणाऱ्या व्यक्तीविरोधी खटला हा अपराध करण्याच्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यावारे चालविला जाईल. तसेच अपराध करण्याच्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यामध्ये नमूद केलेलीच शिक्षा दिली जाईल. कोणत्याही व्यक्तीच्या विरोधात एकाच अपराधाबाबत एकापेक्षा अधिक वेळा खटला चालविला जाणार नाही किंवा तीस शिक्षा केली जाणार नाही. कोणत्याही व्यक्तीस तिच्यावर आरोप असलेल्या मुद्या बाबत स्वतः विरोधी साक्ष देण्यास सक्ती केली जाऊ शकत नाही.

• **अनुच्छेद २१ : जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण :** भारताच्या राज्य क्षेत्रात प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा हक्क आहे. परंतु कायद्याद्वारे एखाद्या व्यक्तीला न्याय्य प्रक्रिया पार पाडून फाशीची शिक्षा दिली जाऊ शकते. जगण्याचा हक्क म्हणजे केवळ जगण्याचा हक्क नाही. यात सन्मान आणि अर्थपूर्ण जीवन जगण्यास सक्षम असणे देखील आवश्यक आहे. सन्मानाने जगण्याच्या हक्कामध्ये जगण्यासाठी महत्वाच्या व गरजेच्या सर्व गोष्टीचा समावेश होतो तसेच व्यक्तिगत स्वातंत्र्याचा हक्क देखील यामध्ये समाविष्ट आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद २१ च्या संदर्भात विविध अंगाने व्याख्या केलेली आहे. यामध्ये गोपनीयतेचा हक्क, परदेशात जाण्याचा हक्क, आश्रय मागण्याचा हक्क, एकांतवासाच्या विरोधात हक्क, सामाजिक न्याय आणि आर्थिक सक्षमीकरणाचा हक्क, कोठडीत मृत्यूच्या विरोधात हक्क, विलंब हक्क, डॉक्टरांच्या मदतीचा हक्क, सार्वजनिक फाशीच्या विरोधात हक्क, सांस्कृतिक वारशांच्या संरक्षणाचा हक्क, प्रदूषण मुक्त पाणी आणि हवेचा हक्क, प्रत्येक बालकाच्या पूर्ण विकासाचा हक्क, आरोग्य आणि वैद्यकीय मदतीचा हक्क आणि शिक्षणाचा हक्क यांचा समावेश हा सर्वोच्च न्यायलयाने विविध खटल्यांच्यामार्फत अनुच्छेद २१ च्या जगण्याचा हक्कांमध्ये केलेला आहे. जगण्याच्या हक्कांमध्ये दोन हक्क समविष्ट आहेत. १. जगण्याचा हक्क आणि २. वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने या हक्कांचे वर्णन 'मूलभूत हक्कांचे हृदय' असे केले आहे. एके गोपालन केस (१९५०), मेनका गांधी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया केस (१९७८), फ्रान्सिस कोराली मुलिन विरुद्ध केंद्रशासित प्रदेश दिल्ली (१९८१), ओल्गा टेलिस विरुद्ध बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशन (१९८५) आणि उन्नी कृष्णन विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य (१९९३) हे अनुच्छेद २१ च्या बाबतीतले सर्वोच्च न्यायालयातले महत्त्वाचे खटले आहेत.

• **अनुच्छेद २१ क : शिक्षणाचा हक्क :** राज्य सहा ते चौदा वर्षे वयाच्या सर्व बालकांसाठी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची तरतूद करेल. हा अनुच्छेद ८६ वी संविधान सुधारणा २००३ अन्वये संविधानाच्या मूलभूत हक्कामध्ये अंतर्भूत केलेला आहे. हा हक्क मिळाल्यानंतर शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क आहे हे मान्य करणाऱ्या १३५ देशांच्या यादीत भारताला मान मिळाला.

• **अनुच्छेद २२ : अटक व स्थानबद्धता यांपासून संरक्षण :** अनुच्छेद २२ मध्ये आरोपीचे हक्क सांगितलेले आहेत. यामध्ये पुढील हक्कांचा समावेश होतो

१.अटक झालेल्या व्यक्तीला लवकरात लवकर त्याच्या अटकेची कारणे कळवली पाहिजेत.

२.अटक झालेल्या व्यक्तीला स्वतःचा बचाव करण्याचा आणि विधी सहाय्य घेण्याचा हक्क आहे.

३.अटक झालेल्या व्यक्तीला अटक केल्यापासून २४ तासांच्या आत दंडाधिकारी यांच्या समोर हजर केले जाईल.

परंतु, प्रतिबंधात्मक अटकेच्या संदर्भात वरील कोणतीही गोष्ट लागू नाही. प्रतिबंधात्मक अटकेसाठी तरतूद करणारा कोणताही कायदा कोणत्याही व्यक्तीला तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी ताब्यात ठेवू शकत नाही. कायद्याच्या चौकटीमध्ये अटक ही अत्यंत महत्त्वपूर्ण संकल्पना आहे; कारण प्रत्येक व्यक्तीला भारतीय संविधानाने काही मूलभूत हक्क दिलेले आहेत. एखाद्या व्यक्तीस अटक केली असता तिच्या सांविधानिक अधिकारांवर गदा येते व ही गदा म्हणजे कायद्याच्या भाषेत नेमके काय, हे जाणून घेणे गरजेचे आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ या कायद्यामधील प्रकरण ५ हे 'व्यक्तींना अटक करणे' याबाबत सविस्तर माहिती देते. त्यातील कलम ४१ ते ६० ही व्यक्तींना अटक करण्याबाबत आहेत. म्हणजेच अटक कशी करावयाची असते, अटकेचे हक्क कुणाला आहेत, संशयिताचा पाठलाग करणे, बंद घरात जबरदस्तीने मोडतोड करून प्रवेश मिळवणे, झडती घेणे, हत्यारे जप्त करणे, चोवीस तासांपेक्षा जास्त कालावधीसाठी डांबून न ठेवणे व अटकेची कारणे देणे वगैरे विविध तरतुदी या संहितेत दिलेल्या आहेत.

३. शोषणापासून संरक्षणाचा हक्क (अनुच्छेद २३ ते अनुच्छेद २४)

• **अनुच्छेद २३ : माणसांचा अपव्यापर आणि वेठबिगारी यांना मनाई :** याद्वारे दोन अमानुष पद्धतींना आळा घालण्यात आलेला आहे. माणसाचा अपव्यापार किंवा देहविक्री आणि वेठबिगारी किंवा जबरदस्तीने विना मोबदला काम करून घेणे हे कायद्याने अयोग्य आहे. परंतु सार्वजनिक प्रयोजनाकरता सार्वजनिक सेवा करायला लावण्यास राज्याला याद्वारे प्रतिबंध होणार नाही. परंतु अशी सेवा लागू करताना राज्य केवळ धर्म, वंश, जात किंवा वर्ग किंवा त्यांपैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करू शकणार नाही. माणसांचा अपव्यापर किंवा देहविक्री रोखण्यासाठी अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ हा कायदा तयार केला गेला आहे. तसेच वेठबिगार पद्धत निर्मूलन अधिनियम १९७६ या कायद्याद्वारे वेठबिगारी संपविण्यात आली आहे. भारतामध्ये पूर्वीपासून देवदासी, वेठबिगारी अश्या शोषणाच्या पद्धती होत्या. मजुरांचे जमीनदाराकडून शोषण होत असे. मागासवर्गीय स्त्रियांचे शोषण होत असे. मागासवर्गीय लोकांचे जातीच्या व धर्माच्या चुकीच्या रुढींच्या आधारे शोषण होत असे. अश्या प्रकारचे सर्व शोषण बंद करण्यासाठी हा शोषणापासून संरक्षणाचा हक्क दिला आहे.

• **अनुच्छेद २४ : कारखाने, इत्यादीद्वारे बालकांना कामाला ठेवायला मनाई :** चौदा वर्षांपेक्षा कमी वयाच्या बालकास कोणत्याही कारखान्यात किंवा खाणीत काम करण्यास मज्जाव आहे. तसेच चौदा वर्षांपेक्षा कमी वयाच्या बालकास इतर कोणत्याही धोकादायक ठिकाणी रोजगाराला, कामाला ठेवता येणार नाही. बाल कामगार प्रतिबंध व नियमन अधिनियम १९८६ या कायद्याद्वारे बाल मजुरी संपविण्यात आली आहे.

४. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (अनुच्छेद २५ ते अनुच्छेद २८)

अनुच्छेद २५ ते अनुच्छेद २८ मध्ये धार्मिक स्वातंत्र्याच्या तरतुदी संविधानामध्ये आहे. धार्मिक स्वातंत्र्याच्या तरतुदी ह्या देशाची व्यवस्था धर्मनिरपेक्ष असेल आणि व्यक्ती किंवा नागरिकांना धर्म उपासना स्वातंत्र्य असेल या प्रकारच्या आहेत. भारत हा देश धर्मनिरपेक्ष असला तरी देशातील व्यक्तींना किंवा नागरिकांना कोणत्याही धर्माचे पालन, आचरण, प्रचार व प्रसार करण्याचा हक्क आहे. सरकारच्या दृष्टाने सर्व धर्म समान असून भारताचा कोणताही अधिकृत धर्म असणार नाही याचा प्रत्यय धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकारातून येतो. सर्व धर्मांना समान न्याय, आदर मिळावा यासाठी सरकारने प्रयत्न करावेत तसेच धर्माच्या आधारावर सरकार भेदभाव करणार नाही असे यात सांगितले आहे. पण सध्याच्या काळात धार्मिक स्वातंत्र्याचा वापर राजकारणासाठी केला जात आहे. धार्मिक स्वातंत्र्याच्या बाबतीतलं अगदी नजीकच्या काळातलं उदाहरण म्हणजे गोमांस बंदी च्या नावाने गोरक्षक टोळ्यांनी केलेल्या तथाकथित झुंडहत्या. उत्तरेकडील राज्यांतील अनेकजण या झुंडहत्येला बळी पडलेत.

• **अनुच्छेद २५ : सद्सदविवेकबुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रचार :** भारतातील कोणत्याही व्यक्तीला सदसदविवेकबुद्धीने धर्म मुक्तपणे प्रकट करण्याचा, आचरण्याचा आणि त्याचा प्रचार करण्याचा हक्क आहे. सार्वजनिक आरोग्य, सामाजिक नीतिमत्ता आणि कायदा आणि सुव्यवस्था यांच्या अधीन राहून हे हक्क बजावायचे आहेत. २५ व्या अनुच्छेदाचा अर्थ थोडक्यात असा निघतो की, राज्याला कुठलाही धर्म नसेल म्हणजेच राज्यव्यवस्था कुठल्याही एका धर्माला उचलून धरणार नाही किंवा दुसऱ्या कुठल्या धर्माला आपपर भावाने वागवणार नाही. नागरिकांना व्यक्तिगत जीवनामध्ये आपल्या पसंतीप्रमाणे धर्म पाळण्याचे किंवा कुठलाही धर्म न पाळण्याचे स्वातंत्र्य असेल. मात्र आपले धर्म स्वातंत्र्य उपभोगताना इतर नागरिकांच्या मुलभूत अधिकारावर गदा येणार नाही याची काळजी सर्वच नागरिकांनी घ्यायची आहे. शिवाय आपल्यापेक्षा वेगळी श्रद्धा बाळगणाऱ्या इतर नागरिकांच्या श्रद्धेचा आदर बाळगायचा आहे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सार्वजनिक जीवनाच्या नियमनाच्या दृष्टीने जे मुद्दे आर्थिक, व्यापार विषयक, आरोग्य विषयक म्हणजेच धर्मनिरपेक्ष आहेत अशा मुद्यांच्या बाबतीत राज्यव्यवस्थेचा कायदा हा अंतिम असेल. धर्मनिरपेक्षता या मुल्याचा एक वैशिष्ट्यपूर्ण असा अर्थ अनुच्छेद २५ आपल्यासमोर ठेवतो.

• **अनुच्छेद २६ : धार्मिक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य :** प्रत्येक धार्मिक संप्रदाय आणि धार्मिक गटाला पुढील हक्क प्राप्त आहेत

१.धार्मिक व धर्मादायी प्रयोजनाकरिता संस्था स्थापन करण्याचा आणि स्वखर्चाने चालविण्याचा हक्क आहे.

२.धार्मिक बाबी मध्ये आपल्या व्यवहाराची व्यवस्था पाहण्याचा हक्क आहे.

३.जंगम व स्थावर मालमत्ता घेण्याचा आणि तिचे संपादन करण्याचा हक्क आहे.

४.कायद्यानुसार मालमत्तेचे प्रशासन करण्याचा हक्क आहे.

• **अनुच्छेद २७ : धर्माच्या संवर्धनाकरिता कर देण्याचे स्वातंत्र्य :** धर्माच्या कारणावरून कोणत्याही व्यक्तीकडून सक्तीने कर घेतला जावू शकत नाही. कोणत्याही व्यक्तीला जो विशिष्ट धर्म किंवा धार्मिक गटाच्या प्रचारासाठी किंवा देखभालीसाठी वापरला जाणार आहे असा कर भरण्यास भाग पाडले जाणार नाही.

• **अनुच्छेद २८ : शैक्षणिक संस्थांत धार्मिक बाबींच्या सूचना पाळण्याचे स्वातंत्र्य :** यामध्ये शैक्षणिक संस्थामध्ये धार्मिक सूचना देण्यासंदर्भातील पुढील प्रमाणे हक्क दिलेले आहेत.

१.सरकारी नियंत्रण आणि सरकारी पैश्यातून चालणाऱ्या शैक्षणिक संस्थामध्ये कोणत्याही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही.

२.सरकारी नियमावर आधारित पण दाननिधी किंवा न्यासद्वारे चालणाऱ्या शैक्षणिक संस्थेमध्ये काही प्रमाणात धार्मिक शिक्षण दिले जाऊ शकते.

३.सरकारमान्य किंवा अनुदानित शाळेत धार्मिक शिक्षण किंवा उपासना यांत सहभाग घेण्यास बालकांस किंवा पालकांस अनिवार्य केले जाणार नाही.

५. सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क (अनुच्छेद २९ ते अनुच्छेद ३०)

• **अनुच्छेद २९ : अल्पसंख्यांक वर्गाच्या हितसंबंधांचे संरक्षण :** भारताच्या राज्यक्षेत्रात कोणत्याही नागरिकांना स्वतःची वेगळी भाषा, लिपी व संस्कृती जपण्याचा हक्क आहे. तसेच सरकारी किंवा सरकार अनुदानित शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकांस धर्म, वंश, जात, किंवा भाषा या कारणावरून प्रवेश नाकारला जावू शकत नाही.

• **अनुच्छेद ३० : अल्पसंख्यांक वर्गाच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्याचे प्रशासन करण्याचा हक्क :** धर्म व भाषा आधारित अल्पसंख्याक वर्गाला आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व प्रशासन करण्याचा हक्क आहे.

६. सांविधानिक उपाय योजण्याचा हक्क (अनुच्छेद ३२)

• **अनुच्छेद ३२ : संविधानिक उपाय योजण्याचा हक्क :** व्यक्तीच्या कोणत्याही मूलभूत अधिकाराचे उल्लंघन सरकारद्वारे / राज्याद्वारे झाल्यास व्यक्ती सरकारच्या / राज्याच्या विरोधात थेट सर्वोच्च न्यायालयात जाऊ शकते. यासाठी व्यक्तीला सर्वोच्च न्यायालयात जाण्यासाठी (1) बंदी प्रत्यक्षीकरण (Habeas corpus), (2) परमादेश (Mandamus), (3) प्रतिछेद (Prohibition), उत्प्रेशन (Certiorary) आणि (5) हक्क पृच्छा (Quo warranto) यापैकी याचिकेचा आधार घ्यावा लागेल.

१. **बंदी प्रत्यक्षीकरण (Habeas corpus)** : यानुसार अटक केलेल्या व्यक्तीस २४ तासाच्या आत कोर्टात हजर करण्याचे आदेश देण्यात आलेले आहे.

२. **परमादेश (Mandamus) :** सरकारी अधिकारी आपले कार्य करत नसेल तर त्याला न्यायालय तसा आदेश देईल या आदेशालाच परमादेश म्हणतात. हा आदेश खाजगी व्यक्तींना देता येत नाही, राष्ट्रपती, राज्यपाल, सर्वोच्च न्यायालयाचे व उच्च न्यायालयाचे मुख्याधिकारी यांनाही यातून वगळण्यात आले आहे.

३. **प्रतिषेध (Prohibition) :** कनिष्ठ न्यायालयांमध्ये एखाद्या खटल्याची सुनावाणी चालू असेल व या खटल्याचे कामकाज थांबवणे वरिष्ठ न्यायालयास उचित वाटले तर ते कनिष्ठ न्यायालयास संबंधित खटल्याचे कामकाज थांबवण्याचा आदेश देते याचा अर्थ कनिष्ठ न्यायालय आपल्या मर्यादेत राहूनच कार्य करेल.

४. **उत्प्रेषण (Certiorary) :** वरिष्ठ न्यायालय कनिष्ठ न्यायालयाचे निर्णय रद्द करून तो खटला आपल्याकडे हस्तांतरित करण्याचे आदेश देते. यालाच उत्प्रेषण म्हणतात.

५. **पृच्छा (Quo warranto) :** एखादे शासकीय पद अपात्र व्यक्ती धारण करीत असेल तेव्हा न्यायालय आपणास हे पद धारण करण्याचा काय हक्क आहे याची विचारणा करू शकते व ते पद सोडण्याचा आदेश देऊ शकते.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २२६ नुसार सदरच्या याचिका ह्या उच्च न्यायालयात दाखल करता येऊ शकतात. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 32 प्रमाणे मूलभूत हक्कांवर कोणत्याही प्रकारे गदा आल्यास घटनात्मक उपायांचा हक्क देण्यात आला आहे. कारण या हक्कांना संरक्षणात्मक हमी नसेल तर त्या हक्कांना काहीही अर्थ उरत नाही. त्यामुळे घटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांवर गदा आल्यास दाद मागण्याचा हक्क घटनेनेच दिला आहे. हा हक्क असल्यामुळेच कदाचित मूलभूत हक्कांचं महत्त्व वारंवार अधोरेखित होत आलं आहे. डॉ. बाबसाहेब आंबेडकरांच्या मते अनुच्छेद ३२ हा घटनेतील सगळ्यात महत्वाचा अनुच्छेद असून तो संविधानाचा आत्मा आहे.

अनुच्छेद ३३, ३४ आणि ३५ यामध्ये संसदेला काही मूलभूत हक्क दिलेले आहेत याचा उल्लेख आहे. सशस्त्र सेना दलाचे सदस्य, सार्वजनिक सुव्यवस्था राखणाऱ्या दलाचे सदस्य, गुप्त वार्ता, ब्युरो किंवा संस्था या कामासाठी नेमलेले व्यक्ती यांच्या कर्तव्याचे पालन व्हावे व त्यांच्यामध्ये शिस्त लागवी ह्या हेतूने कायदे करण्याचा अधिकार संसदेला आहे. मार्शल कायदा असलेल्या ठिकाणी देखील संसद सुव्यवस्था राखणे किंवा पुनर्संचयित करणे याच्याशी संबंध, ते दिलेली शिक्षा, जप्तीचे आदेश किंवा लष्करी हक्क नियमित करू शकते. यासंदर्भातील हक्क हे फक्त संसदेला असतील तर राज्याच्या विधिमंडळाला असे हक्क नसतात.

मुलभूत हक्काद्वारे संविधानाला कायद्याचे राज्य देशात प्रस्थापित करायचे आहे. मूलभूत हक्क हे केवळ देशातील नागरिकांसाठी नव्हे, तर सोबतच देशासाठी देखील महत्वपूर्ण ठरतात. देशातील नागरिक आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत हक्क महत्वपूर्ण ठरतात. व्यक्तीला सर्वांगीण विकासासाठी मूलभूत हक्कांची गरज असते. मूलभूत हक्क हे मानवी प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी आणि सामाजिक प्रगतीला चालना देण्यासाठी आवश्यक आहेत. मुलभूत हक्क हे मानवी व्यक्तिमत्त्वाला आकार देतात. हे हक्क वंश, जन्माचे ठिकाण, धर्म, जात, संप्रदाय, रंग, लिंग या भेदभावांशिवाय सर्व नागरिकांना लागू आहेत. राज्य नागरिकांचे मुलभूत हक्क हिरावून घेवू शकत नाही. फक्त आणीबाणीच्या काळात काही मूलभूत हक्कांवर अधिक निर्बंध राज्य आणू शकते, पण अनुच्छेद २१ चा हक्क आणीबाणीच्या काळात देखील सरकार काढून घेऊ शकत नाही. काही मूलभूत हक्कांवर वाजवी निर्बंध आहेत याचा

अर्थ सरकारकडून कधी कधी चुकीचा घेतला जातो. एका व्यक्तीच्या मुलभूत हक्कांच्या संरक्षणाची जबाबदारी हि दुसऱ्या व्यक्तीचे कर्तव्य असले पाहिजे, तरच मूलभूत हक्कांचा गैरवापर केला जाणार नाही. संविधान सभेत मूलभूत हक्कांवरील चर्चा करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते, "राज्यघटना कितीही चांगली किंवा वाईट असली तरी ती शेवटी चांगली किंवा वाईट हे ठरणं हे राज्यकर्ते तिचा कसा वापर करतील यावर अवलंबून राहील." हे आज ही तितकेच खरे आहे.

१.२.३ मूलभूत हक्कांचे महत्व

मानवी हक्क व मूलभूत हक्क यात साम्य भरपूर आहे. मूलभूत हक्क संविधानाने दिल्यामुळे त्याला विशेष कायदेशीर दर्जा प्राप्त झाला आहे. संविधानाच्या प्रस्तावनेत निर्देशित केलेल्या मुल्यांचे रक्षण हे मूलभूत हक्कांद्वारे केले जाते. व्यक्तीला समाजासोबत जोडण्याचे काम मुलभूत हक्क करतात. मूलभूत हक्क समाजात समानता टिकवून ठेवण्याचे काम करतात. देशाची एकता देखील मूलभूत हक्कांमुळे सुरक्षित राहते. देशाच्या व नागरिकांच्या विकासासाठी मूलभूत हक्क आवश्यक आहेत. व्यक्तीच्या नैतिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासासाठी मूलभूत हक्क महत्वपूर्ण ठरतात.

१. **नागरिकांबरोबर व्यक्ती म्हणून हक्क :** मुलभूत हक्क हे सर्व नागरिकांसाठी आहेतच; परंतु काही मूलभूत हक्क हे भारतातील नागरिक नसलेल्या व्यक्तींसाठी ही आहेत. मुलभूत हक्कांमधील अनुच्छेद क्र. १४, २०, २१, २२, २३, २५ ह्या तरतुदी ह्या नागरिकांसोबत व्यक्तींसाठी उपलब्ध आहेत. व्यक्ती या संकल्पनेत भारताचे नागरिक व भारताचे नागरिक नसलेले पण भारतात कोणत्यातरी कारणाने राहणाऱ्यांचा समावेश होतो. सर्व व्यक्तींना धर्म स्वातंत्र्याचा हक्क आहे. परंतु भाषणस्वातंत्र्य आणि देशाच्या कोणत्याही भागात राहण्याचे व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य यांसारखे स्वातंत्र्य फक्त नागरिकांनाच दिले जाते.

२. **सर्वसमावेशक :** भारतीय संविधानात सहा प्रकारचे मूलभूत हक्क आहेत आणि हे सर्व हक्क देशाच्या सर्व नागरिकांना, वंश, जात, धर्म, इत्यादी विचारात न घेता सार्वत्रिकपणे लागू आहेत. मूलभूत हक्क हे केवळ मूलभूत नागरी, राजकीय, सामाजिक, आर्थिक हक्क आणि स्वातंत्र्यांची खात्री आणि हमी देत नाहीत, तर ते अल्पसंख्याक समुदाय, जाती, वर्ग आणि धार्मिक गटांचे रक्षण करणे आणि सर्व प्रकारच्या भेदभावाची भावना दूर करणे आणि समानता स्थापित करणे ही महत्त्वपूर्ण कार्ये देखील पूर्ण करतात. मूलभूत हक्क हे संविधानाच्या मूलभूत संरचनेचा एक भाग आहेत म्हणून, जर असे झाले तर तो विशिष्ट कायदा घटनाबाह्य म्हणून घोषित केला जाईल आणि नियमांच्या विरुद्ध असल्याने तो रद्द केला जाईल. मूलभूत हक्कांमध्ये सर्व अल्पसंख्याक समुदाय, जाती, वर्ग, लिंग आणि धार्मिक व भाषिक गटांच्या रक्षणाचा विचार केला आहे. खऱ्या अर्थाने मूलभूत हक्क हे सर्वांसाठी असल्याने सर्व समावेशक आहेत.

३. **राज्य निर्बंध घालू शकते :** राज्य हे सामान्य लोकांच्या हिताचे, सभ्यतेचे किंवा नैतिकतेचे रक्षक असते. त्यामुळे राज्य आमच्या हक्कांवर बंधने घालणारे कायदे करू शकते. मूलभूत हक्क हे अनिर्बंध नसतात. मुलभूत हक्कांवर वाजवी निर्बंध असू शकतात. अनुच्छेद १९ मध्ये सांगितलेले भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य, संघटना, संघ किंवा सहकारी संस्था बनविण्याचे स्वातंत्र्य, भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य, भारताच्या राज्यक्षेत्रात कोणत्याही भागात राहण्याचे व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य आणि कोणताही पेशा आचरण्याचे अथवा व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालविण्याचे स्वातंत्र्य यावर भारताची सार्वभौमता व एकात्मता, राज्याची सुरक्षितता, परकीय देशांशी मैत्रीचे संबंध, सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता किंवा नीतिमत्ता यांच्या हितासाठी व न्यायालयाचा अवमान, अब्रुनुकसानी किंवा अपराधास चिथावणी यासंदर्भात राज्य वाजवी निर्बंध घालू शकते. तसेच मूलभूत हक्क देखील अनियंत्रित राज्य कृतीपासून व्यक्तींचे संरक्षण करतात उदाहरणार्थ, संविधानाने अस्पृश्यता नाहीशी

केली आहे आणि वेठबिगारीस बंदी घातली आहे. या तरतुदी मुळे राज्याच्या किंवा व्यक्तींच्या कृतीवर नियंत्रण आले आहे.

४. **संविधान सुधारणा :** मूलभूत हक्कांसह संविधानातील सर्व तरतुदींमध्ये संविधान सुधारणा केल्या जाऊ शकतात परंतु संविधानाच्या मूलभूत संरचनेत बदल होऊ शकत नाही. त्यामुळे मुलभूत हक्क अधिक मजबूत होतील असे बदल मूलभूत हक्कांमध्ये संविधान सुधारणांद्वारे करता येऊ शकतात. उदा. ८६ वी संविधान सुधारणा २००३ द्वारे अनुच्छेद २१ मध्ये संविधान सुधारणा करून अनुच्छेद २१ हा शिक्षणाचा हक्क समाविष्ट करण्यात आला. मूलभूत हक्क आणखी मजबूत करण्याच्या हेतूने मूलभूत हक्कांमध्ये संविधान सुधारणा होऊ शकते.

५. **आणीबाणी :** आणीबाणीच्या काळात मूलभूत हक्क गोठविले जातात. आणीबाणीच्या काळात अनुच्छेद १९ द्वारे प्रदान केलेले विविध हक्क हे निलंबित केले जातात. परंतु जगण्याचा हक्क अनुच्छेद २१ आणीबाणीच्या काळात गोठविला जावू शकत नाही. तसेच अनुच्छेद २० देखील आणीबाणीच्या काळात गोठविला जात नाही. मूलभूत हक्कांवरील निर्बंध हे फक्त काही काळासाठी असू शकतात. तसेच अनुच्छेद ३३,३४ आणि ३५ नुसार लष्करी व निमलष्करी क्षेत्रांसाठी मूलभूत हक्क काही प्रमाणात प्रतिबंधित असतात.

६. **न्यायालयांद्वारे संरक्षण :** व्यक्ती व नागरिकांचे मुलभूत हक्क जपणे हे राज्याचे कर्तव्ये आहे. राज्याकडून व्यक्ती किंवा नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे हनन झाल्यावर व्यक्ती किंवा नागरिकांना राज्याच्या विरोधात अनुच्छेद ३२ नुसार थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याकरिता जाता येते. तसेच अनुच्छेद २२६ नुसार उच्च न्यायालयात जाता येते. कायदे आणि सरकारी कृतींचे पुनरावलोकन करण्यासाठी, त्यांचे घटनात्मक तरतुदींशी सुसंगत असल्याची खात्री करण्यासाठी मूलभूत हक्क न्यायपालिकेला मदत करतात.

७. **मूल्य केन्द्री :** मूलभूत हक्क यांच्या केंद्राशी मानवी मूल्ये आहेत. मूलभूत हक्कांतील अनुच्छेद १४ ते १८ च्या केंद्रस्थानी समानता हे मूल्य आहे. तसेच मूलभूत हक्कांतील अनुच्छेद १९ ते २२ च्या केंद्रस्थानी स्वातंत्र्य हे मूल्य आहे. तसेच अनुच्छेद २५ ते २८ च्या केंद्रस्थानी धर्म स्वातंत्र्य हे मूल्य आहे. मूल्यांचा ऱ्हास हा विषमता किंवा भेदाभेदाचे मूळ आहे. त्यावर उपाय म्हणून संविधानात मूलभूत हक्क आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुलभूत हक्कांबाबत असे मत होते कि भेदभाव हा मूलभूत हक्कांचा शत्रू आहे. त्यामुळे मुलभूत हक्कांची अंमलबजावणी योग्य प्रकारे व्हायची असेल तर सर्व प्रकारचा भेदभाव नष्ट व्हायला हवा आणि तसे झाले नाही तर मूलभूत हक्कांना काही अर्थ नाही अशी त्यांची भूमिका होती. मूलभूत हक्क हे अत्याचारी प्रथांना आव्हान देऊन, सर्वसमावेशकतेला चालना देऊन आणि उपेक्षित समुदायांना सशक्त करून सामाजिक परिवर्तनामध्ये योगदान देतात. मुलभूत हक्क हे समाजातील प्रगतीशील बदलासाठी उत्प्रेरक म्हणून काम करतात.

८. **लोकशाहीसाठी आवश्यक :** मूलभूत हक्क हे व्यक्तींच्या विकासासाठी आणि प्रतिष्ठा जपण्यासाठी आवश्यक मानले गेले आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्य व नागरी स्वातंत्र्याला मान्यता दिली नाही आणि त्याचे संरक्षण केले नाही तर लोकशाही व्यवस्थेचा काही फायदा होणार नाही असे संविधान सभेतील सदस्यांचे मन होते. लोकशाही मध्ये मतांना खूप महत्व आहे. त्यामुळे देशातील जनमत तयार करण्याचे साधन सुरक्षित असले पाहिजे. यासाठी, संविधानाने भारतातील सर्व नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य व इतर हक्कांच्या स्वरुपात मूलभूत हक्काद्वारे हमी दिली आहे. मूलभूत हक्क राजकीय लोकशाहीची खात्री देतात. लोकशाही मध्ये व्यक्तीला मूलभूत हक्क असले पाहिजे आणि आणि ते अबाधित राखण्याची जबाबदारी शासनावर असली पाहिजे. मूलभूत हक्कांचा उद्देश हा समाजात समानता प्रस्थापित करून स्वातंत्र्य आणि लोकशाही मूल्यांचे जतन करणे हा आहे.

मूलभूत हक्क व्यक्तींचे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि वैयक्तिक स्वातंत्र्यांचे रक्षण करतात. प्रत्येक व्यक्तीशी न्याय्य आणि पूर्वग्रह न ठेवता वागले जाईल असा व्यवहार राज्य व्यक्तीशी करेल असे मूलभूत हक्क सुनिश्चित करतात. लोकशाही मूल्ये आणि तत्त्वे टिकवून ठेवण्यासाठी मूलभूत हक्क महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. मूलभूत हक्क भारतीयांना भारतीय नागरिक म्हणून त्यांचे आयुष्य शांतता व समानतेने व्यतीत करण्याचे नागरी हक्क प्रदान करतात. संविधानामध्ये मूलभूत हक्कांना सर्वोच्च स्थान आहे. संविधानाच्या मूलभूत संरचनेमध्ये मूलभूत हक्कांचा समावेश होतो. मूलभूत हक्क केवळ संरक्षणच नव्हे तर मानवी हक्कांचे घोर उल्लंघन रोखण्यातही मदत करतात. मूलभूत हक्क नावाप्रमाणेच हे मानवी प्रतिष्ठेचे आणि अखंडतेचे संरक्षण आणि देखभाल करण्यासाठी सर्वात महत्वाचे स्त्रोत आहेत.

१.२.४ मूलभूत हक्क आणि न्यायालयीन संरक्षण

व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण झाले पाहिजे याची जबाबदारी भारतीय संविधानाने राज्यावर टाकली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मूलभूत हक्कांसंदर्भात म्हणाले होते की "संसद किंवा विधी मंडळाची जबाबदारी केवळ मूलभूत हक्क प्रदान करणे नाही तर त्याहूनही महत्वाचे म्हणजे त्यांचे रक्षण करणे हे आहे". मूलभूत हक्क हे संविधानाने सर्व भारतातातील व्यक्ती किंवा नागरिकांना बहाल केले आहे. मूलभूत हक्कांचा लाभ भारतातील सर्व व्यक्ती किंवा नागरिकांना होईल याची खात्री शासन घेते. राज्याने भारतातातील व्यक्ती किंवा नागरिकांच्या हक्काचे हनन केले तर भारतातातील व्यक्ती किंवा नागरिकांना थेट संविधानातील अनुच्छेद ३२ नुसार सर्वोच्च न्यायालयात किंवा अनुच्छेद २२६ नुसार उच्च न्यायालयात राज्याच्या विरोधात दाद मागता येते. मूलभूत हक्कांमधील अनुच्छेद १३ देखील न्यायालयीन संरक्षणाच्या दृष्टीने खूप महत्वाचे आहे. अनुच्छेद १३ नुसार मूलभूत हक्कांच्या विरोधात संसद किंवा विधी मंडळास कायदे बनवता येत नाहीत. त्यामुळे एखादा कायदा जर मूलभूत हक्कांच्या विरोधात असेल तर त्याबाबत सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायलयाकडे कायदा रद्द करण्यासाठी जाता येऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाने व उच्च न्यायालयाने घेतलेले निर्णय हे इतर सर्व न्यायालयांना बंधकारक असतात. न्याय मंडळाचे काम हे संविधानाचा किंवा कायद्याचा अर्थ लावणे हे आहे. सर्वोच्च न्यायालयाने विविध खटल्यांमध्ये मूलभूत हक्कांचा अर्थविस्तार केला आहे. अनुच्छेद २१ सन्मानाने जगण्याचा हक्क या अनुच्छेदाचा अर्थविस्तार जास्त केला आहे. महत्वाचे न्यायालयीन खटले आपण पाहूया ज्यामुळे मुलभूत हक्कांचे संरक्षण झाले आहे.

१. **केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य, (१९७३) :** या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे आत्तापर्यंत सर्वात जास्त म्हणजे १३ न्यायाधीश असलेल्या संविधान पीठ होते. हा खटला सर्वात महत्वाचा खटला मानला जातो. या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने संसद संविधानातील कोणत्याही भागात सुधारणा करू शकते का याबाबत निर्णय दिला. या खटल्यामध्ये मूलभूत संरचना नियम स्वीकारला गेला. या खटल्याआधी सर्वोच्च न्यायालयाचे शंकरी प्रसाद प्रकरण (१९५१) आणि सज्जन सिंग प्रकरण (१९६५) या खटल्यांमध्ये असे म्हणणे होते की संसद कायदेशीर प्रक्रिया राबवून संविधान सुधारणा करू शकते. याचा अर्थ संसदेला मूलभूत अधिकारांसह संविधानाच्या कोणत्याही भागामध्ये सुधारणा करण्याचा हक्क होता. केशवानंद भारती प्रकरणातील निकालानुसार संसद संविधानातील सर्व भागामध्ये सुधारणा करू शकते, अगदी मूलभूत हक्कांमध्ये देखील सुधारणा करू शकते परंतु संसद अशी कोणतीही सुधारणा करू शकत नाही की ज्यामुळे संविधानाची मूलभूत संरचना बदलू शकेल. या खटल्यामध्ये स्पष्ट केले गेले की संसदेला संविधानाची 'मूलभूत संरचना' बदलता येणार नाही. त्यामुळे या खटल्याद्वारे सर्वोच्च न्यायालयाने भारतीय संविधानाची अखंडता जपण्याचे महत्वाचे कार्य केले आहे. मूलभूत हक्क हा संविधानाच्या मूलभूत संरचनेचा भाग आहे. त्यामुळे संसद संविधानात मनमानी बदल करू शकणार नाही.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर सुरवातीला, शंकरी प्रसाद प्रकरण (१९५१) आणि सज्जन सिंग प्रकरण (19६५) मध्ये सर्वोच्च न्यायालयाने संविधान सुधारणा करण्यासाठी संसदेला पूर्ण अधिकार दिला होता. त्यामुळे संसदेला संविधानातील मुलभूत हक्कांसह विविध भागामध्ये सुधारणा करण्याचा अधिकार होता. गोलखनाथ प्रकरणात (१९६७) सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितले की संसद मूलभूत हक्कांमध्ये सुधारणा करू शकत नाही. गोलखनाथ खटला (१९६७), आरसी कूपर खटला (१९७०) आणि माधवराव सिंधिया खटला (१९७०) मधील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांविरोधी तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने संविधानात मोठ्या सुधारणा केल्या. त्याच्या विरोधात केशवानंद भारती प्रकरणात या सुधारणांना आव्हान देण्यात आले. या खटल्यामध्ये संविधानाची मूलभूत संरचना ठरविण्यात आली. त्यानंतरच्या मिनर्व्हा मिल्स, (१९८०) प्रकरणात देखील सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत संरचना ही महत्वाची मानून संसदेला संविधानात बदल करण्याचे हक्क हे मर्यादित आहेत असे सांगितले तसेच हे स्पष्ट केले की संसद सर्वोच्च नसून संविधान सर्वोच्च आहे. कोएल्हो केस जी ९ वे शेड्यूल केस म्हणून ओळखली जाते या खटल्यामध्ये नऊ न्यायाधीशांच्या खंडपीठाने संविधानाच्या मूलभूत संरचनेला यांना महत्व देवून सांगितले की संसद कोणताही कायदा ९ व्या अनुसूची मध्ये टाकू शकते परंतु न्यायालय त्या कायद्याचे न्यायिक पुनरावलोकन करू शकते आणि कायदा जर मूलभूत संरचना सिद्धांताचे उल्लंघन करत असेल तर न्यायालय तो रद्द करू शकते.

२. **मेनका गांधी विरुद्ध भारतीय संघ (१९७८) :** या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने भारतीय संविधानातील मूलभूत हक्कांमधील अनुच्छेद २१ जीवनाचा हक्कचा अर्थ विस्तृत केला आहे. अनुच्छेद २१ अन्वये जगण्याचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क भारतातील प्रत्येक व्यक्तीला आहे. या खटल्याआधी एखादा कायदा मनमानी किंवा जाचक असला तरी न्यायालयांना त्या कायद्यावर प्रश्न विचारण्याची परवानगी नव्हती. पण या खटल्याद्वारे विशिष्ट कायद्यामुळे जगण्याच्या अधिकाराचे किंवा वैयक्तिक स्वातंत्र्याचे उल्लंघन केले जाईल असे वाटत असल्यास न्यायालयाने अनुच्छेद २१ अन्वये पुनर्विलोकन करण्याचे अधिकार स्वतःकडे ठेवले. न्यायालयाची जबाबदारी ही संविधानाचा वॉचडॉग म्हणून झाली आहे. मेनका गांधी खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाद्वारे असे स्पष्ट झाले की अनुच्छेद २१ अंतर्गत 'कायद्याद्वारे स्थापित केलेल्या प्रक्रियेचा' 'कायद्याची योग्य प्रक्रिया' या अभिव्यक्तीप्रमाणेच अर्थ लावायला पाहिजे. त्यानंतरच्या निर्णयात, सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले की अनुच्छेद २१ असे वाचले जाईल की "वैध कायद्याद्वारे स्थापित केलेल्या न्याय्य आणि वाजवी प्रक्रियेशिवाय कोणत्याही व्यक्तीचे जीवन किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही". ए.के. गोपालनच्या प्रकरणात पुन्हा सर्वोच्च न्यायालयाने २०१५ मध्ये मत व्यक्त केले की "कायद्याने विहित केलेली प्रक्रिया निष्पक्ष, न्याय्य आणि वाजवी असावी, काल्पनिक, जाचक किंवा मनमानी नसावी". सर्वोच्च न्यायालयाने या खटल्यामध्ये परदेशात जाण्याचा हक्क हा अनुच्छेद २१ मधील वैयक्तिक स्वातंत्र्याच्या हक्काचा भाग आहे असे म्हटले. यामुळे जाचक आणि अन्यायकारक कायद्यापेक्षा वैयक्तिक स्वातंत्र्य आणि जगण्याचा हक्क हा अधिक महत्वाचा आहे हे न्यायालयाने अधोरेखित केले.

३. **शाहबानो केस (१९८५) :** लिंग न्यायाच्या प्रवासात एक मैलाचा दगड म्हणून या खटल्याकडे पाहिले जाते. याचिकाकर्त्या शाहबानो बेगम यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कायद्याच्या कलम १२५ अंतर्गत देखभाल रक्कम मंजूर करण्यासाठी न्यायालयात अर्ज केला होता. तर याविरोधात असे म्हणणे मांडले की देखभाल रक्कम मंजूर करणे ही वैयक्तिक धार्मिक कायद्याची बाब आहे. यामध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने असे सांगितले की तत्कालीन फौजदारी प्रक्रिया संहिता कायदा कलम १२५ ची तरतूद ही खरोखर धर्मनिरपेक्ष आहे आणि वैयक्तिक धार्मिक कायद्यापेक्षा वेगळी आहे. या खटल्यामध्ये धर्म स्वातंत्र्य आणि न्याय या

मूल्यांमध्ये संघर्ष होत असताना न्यायालयाने न्याय ही बाजू लावून शाह बानो यांच्या बाजूने निर्णय दिला. या खटल्याद्वारे एकरूप नागरी संहितेच्याबाबत चर्चेला दिशा देण्याचे काम सर्वोच्च न्यायालयाने केले. या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने वैयक्तिक धार्मिक कायद्यांच्या पावित्र्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करून समान नागरी संहितेद्वारे संविधानिक मूल्ये अग्रभागी आणली. या खटल्यामध्ये धर्म, उपासना स्वातंत्र्य आणि स्त्री पुरुष समानता आणण्यासाठी स्त्रियांप्रती न्यायपूर्वक व्यवहार यांच्यात संघर्ष उभा राहिला असता सर्वोच्च न्यायालय स्त्री-पुरुष समानता आणण्यासाठी स्त्रियांप्रती न्यायपूर्वक व्यवहार यासोबत उभे राहिले. भारतातील मुस्लीम महिलांच्या हक्कांसाठीच्या लढ्यात आणि मुस्लिम वैयक्तिक कायद्याविरुद्धच्या लढाईतील एक मैलाचा दगड म्हणून याकडे पाहिले जाते. याने हजारो महिलांना कायदेशीर दावे करण्यासाठी आधार दिला, ज्याची त्यांना आधी परवानगी नव्हती.

४. **इंद्रा साहनी वि. युनियन ऑफ इंडिया (१९९२) :** या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने भारतीय संविधानाच्या अंतर्गत आरक्षणाच्या घटनात्मकतेशी संबंधित निर्णय दिला. इंद्रा साहनी निकालात (१९९२), न्यायालयाने सरकारचे पाऊल उचलून धरले आणि घोषित केले की OBC मधील प्रगत वर्ग (म्हणजे, क्रिमी लेयर) आरक्षणाच्या लाभार्थ्यांच्या यादीतून वगळले पाहिजेत. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी क्रीमी लेयरची संकल्पना टाकली पाहिजे, असेही त्यात म्हटले आहे. इंद्रा साहनी यांनी दिलेल्या निकालानुसार केवळ सुरुवातीच्या नियुक्त्यांमध्ये आरक्षण असेल, पदोन्नतीमध्ये नाही. परंतु सरकारने नंतर दुरुस्तीद्वारे घटनेत कलम १६(४अ) आणले. राज्याला असे वाटत असेल की SC/ST कर्मचाऱ्यांचे पुरेसे प्रतिनिधित्व होत नसेल तर त्यांना पदोन्नतीच्या बाबतीत आरक्षणाची तरतूद करण्याचा अधिकार दिला. सुप्रीम कोर्टाने या निकालात आरक्षणाची मर्यादा ५० टक्के ठेवली आहे.

५. **विशाखा वि. राजस्थान राज्य (१९९७) :** सर्वोच्च न्यायालयाने या खटल्यामध्ये कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ टाळण्यासाठी न्यायशास्त्राचा याचाच परिणाम म्हणून संसदेने कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंध कायदा केला. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या संदर्भात, विशाखा विरुद्ध राजस्थान यामध्ये न्यायिक सक्रियता पहायला मिळते. याआधी कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाशी संबंधित कोणतेही कायदे भारतात नसल्यामुळे, न्यायालयाने असे नमूद केले की अनुच्छेद १४, १५, १९ आणि २१५ चे स्पष्टीकरण करताना महिलांविरुद्ध सर्व प्रकारच्या भेदभाव निर्मूलनाच्या विचारावर अवलंबून राहावे लागते. याद्वारे सर्वोच्च न्यायालयाने भारतात 'लैंगिक छळ' ची पहिली अधिकृत व्याख्या प्रदान केली.

६. **राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण विरुद्ध युनियन ऑफ इंडिया आणि इतर. (२०१४) :** या खटल्यामध्ये न्यायालयाने हे स्पष्ट केले की संविधानाचे अनुच्छेद १४, १९, आणि २१ हे व्यक्ती केंद्रित धरून बनले आहेत. तसेच लिंग ओळख एखाद्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा अविभाज्य घटक आहे आणि "वैयक्तिक स्वायत्तता" आणि "स्व-निर्णय" च्या केंद्रस्थानी आहे. तसेच या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने केंद्र आणि राज्य सरकारांना निर्देश दिले की ट्रान्स जेन्डर नागरिकांना सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला वर्ग मानण्यासाठी पावले उचलावीत. तसेच त्यांना शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी आणि सार्वजनिक नियुक्त्यांसाठी सर्व प्रकारचे आरक्षण देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करावेत.

७. **न्यायमूर्ती के.एस. पुट्टास्वामी वि. युनियन ऑफ इंडिया (२०१७) :** सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की गोपनीयतेचा मूलभूत हक्क हा संविधानातील अनुच्छेद २१ च्या जीवन आणि स्वातंत्र्याच्या हक्कामधे अंतर्निहित आहे. ह्या खटल्याला आधार कार्डचा खटला म्हणून पण ओळखले जाते. गोपनीयतेला घटनात्मकदृष्ट्या संरक्षित मूल्य आहे की नाही हे ठरवण्यासाठी या न्यायालयाचे नऊ न्यायाधीश एकत्र येऊन या खटल्याचा निर्णय दिला. गोपनीयतेचा मूलभूत हक्क हा मुद्दा मानवी हक्कांच्या संरक्षणावर आधारित

संवैधानिक संस्कृतीच्या पायापर्यंत पोहोचतो. याद्वारे गोपनीयतेला संरक्षित घटनात्मक मूल्य मानले गेले. २०१७ च्या पुट्टास्वामी निकालाने 'गोपनीयतेचा हक्क' हा भारतीय न्यायशास्त्रातील मूलभूत हक्क म्हणून अधोरेखित केला गेला. तेव्हापासून, मूलभूत हक्क म्हणून गोपनीयतेच्या हक्कावर जोर देण्यासाठी आणि त्याची व्याप्ती स्पष्ट करण्यासाठी अनेक प्रकरणांमध्ये हे एक महत्त्वाचे उदाहरण म्हणून वापरले गेले आहे.

एडीएम जबलपूर वि. शिवकांत शुक्ला (१९७६) या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एच. आर. खन्ना यांनी मूलभूत हक्कामधील अनुच्छेद २१ बाबत अशी टिपणी केली की "विना खटला नजरकैदेत ठेवणे हे वैयक्तिक स्वातंत्र्यावर प्रेम करणाऱ्या सर्वांसाठी एक न आवडणारी बाब आहे". अश्याप्रकारे न्यायालय मूलभूत हक्कांचे संरक्षण करते. मूलभूत हक्कांचा उद्देश हा समाजातील सर्व व्यक्तींचे वैयक्तिक स्वातंत्र्य आणि लोकशाही तत्त्वे जतन करणे हा आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणले होते की "विधिमंडळाची जबाबदारी ही केवळ मूलभूत हक्क प्रदान करणे नाही तर त्याहूनही महत्वाचे म्हणजे त्यांचे रक्षण करणे आहे".

१.२.५ मुलभूत हक्क आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांमधील फरक

संविधान सभेतील मसुदा समितीने संविधान सभेत मसुदा तीन वेळा सादर केला. तिसऱ्या वेळी संविधानाचा मसुदा संमत झाला आहे. मसुदा समितीने संविधान सभेत पहिल्यांदा फेब्रुवारी 1948 मध्ये मसुदा सादर केला, दुसऱ्यांदा मसुदा 17 ऑक्टोबर 1948 रोजी सादर केला आणि तिसऱ्यांदा अंतिम मसुदा 26 नोव्हेंबर 1949 मध्ये सादर केला. या तिन्ही वेळेस मसुद्यामध्ये मूलभूत अधिकार आणि राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे या दोन्हींचा समावेश करण्यात आला होता. मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे एकमेकांना पूरक असली तरी त्यांच्यामध्ये काही गंभीर फरक आहेत.

१. मूलभूत हक्क हे भारतीय संविधानाच्या भाग तीन मध्ये दिलेले असून अनुच्छेद १२ ते ३५ मध्ये मूलभूत हक्कांच्या तरतुदी आहेत. तसेच राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ही भारतीय संविधानाच्या भाग चार मध्ये दिलेले असून अनुच्छेद ३६ ते ५१ मध्ये राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वांच्या तरतुदी आहेत.

२. भारताच्या संविधानातील मूलभूत हक्कांवर युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकेच्या संविधानाचा प्रभाव आहे. तर राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वावर आयर्लंडच्या संविधानाचा प्रभाव आहे.

३. मूलभूत हक्क हे नागरिकांना दिलेली हमी आहेत तर राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ही राज्याने पाळावयाची मार्गदर्शक तत्त्वे आहेत. भारतीय नागरिकांचे कल्याण हा मूलभूत हक्कांचा मुख्य भाग आहे. तर राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे मोठ्या प्रमाणात समाजाचे कल्याणास मदत करतात. राज्याने धोरण व कायदे बनविताना राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे लक्षात ठेवायची असतात. देशातील प्रत्येक नागरिकाचे कल्याण मूलभूत अधिकारांद्वारे केले जाते तर संपूर्ण समाजाचे कल्याण राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वांच्या मदतीने केले जाते.

४. मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास अनुच्छेद ३२ नुसार सर्वोच्च न्यायालयात किंवा २२६ नुसार उच्च न्यायालयात जाता येते तर राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन झाल्यास न्यायालयात जाता येत नाही. मूलभूत हक्कांना न्यायालयीन संरक्षण आहे तर राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांना न्यायालयीन संरक्षण नाही.

५. मूलभूत हक्कांचा लाभ नागरिकांना मिळावा याची हमी राज्यांनी घ्यायची असते त्यामुळे मूलभूत हक्क हे कधीकधी राज्यावर लादलेले एक प्रकारचे निर्बंध मानले जातात. तर राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ही काही विशिष्ट उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सरकारला मदत करण्यासाठीचे निर्देश आहेत.

६. मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारा कायदा असेल तर न्यायालये तो अवैध आणि घटनाबाह्य ठरवू शकतात. परंतु राज्याचा नीती मार्गदर्शक तत्वांचा उल्लंघन करणारा कायदा असेल, तर तो अवैध आणि घटनाबाह्य ठरवण्याचा हक्क न्यायालयांना नाही.

मूलभूत हक्क आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यामध्ये खूप फरक असला तरी दोन्ही संविधानातील महत्त्वाचे भाग आहेत. मूलभूत हक्क आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे हे एकमेकांशी पूरक आहेत. तसेच न्यायालय कायद्याची वैधता तपासताना मूलभूत हक्क आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे या दोन्ही तरतुदींचा विचार करते. मूलभूत हक्क आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे वर वर पाहता वेगवगळी वाटत असली तरी व्यक्ती विकासासाठी आणि देश व समाजासाठी दोन्ही अत्यंत महत्वाचे आहेत.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

एका वाक्यात उत्तरे लिहा.

[१] संविधान सभेतील मूलभूत हक्क समितीचे अध्यक्ष कोण होते?

[२] धर्म प्रचार प्रसार आणि आचरणाच्या स्वातंत्र्याची बंधने कोणती आहेत?

[३] अनुच्छेद १९ मध्ये कोण कोणते स्वातंत्र्याचे प्रकार सांगितलेले आहेत?

[४] सर्वोच्च न्यायालयाच्या कोणत्या खटल्यामध्ये संविधानाच्या मूलभूत संरचनेचा विचार मांडला गेला?

[५] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनुच्छेद ३२ संदर्भात काय मत मांडले होते?

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **खटला :** न्यायालयातील याचिका किंवा प्रकरण
- **संविधान सुधारणा :** संविधानामध्ये दुरुस्ती करण्यासाठीची प्रक्रिया
- **अस्पृश्यता :** स्पृश्य किंवा अस्पृश्य याच्या आधारे केलेला जन्माधिष्ठीत भेदाभेद किंवा विषमता
- **निर्बंध :** वाजवी बंधने
- **मूल्ये :** पायाभूत सर्वसाधारण नियम किंवा सिद्धांत

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१] सरदार वल्लभभाई पटेल

२] सार्वजनिक आरोग्य, सामाजिक नितीमत्ता, कायदा आणि सुव्यवस्था

३] भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य, संघटना, संघ किंवा सहकारी संस्था बनविण्याचे स्वातंत्र्य, भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य, भारताच्या राज्यक्षेत्रात कोणत्याही भागात राहण्याचे व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य आणि कोणताही पेश आचरण्याचे अथवा व्यवसाय, व्यापार किंवा धंदा चालविण्याचे स्वातंत्र्य

४] केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य, (१९७३)

५] अनुच्छेद ३२ हा भारतीय संविधानाचा आत्मा आहे.

१.५ सारांश

या प्रकरणामध्ये आपण मुलभूत हक्क याची विस्तृत माहिती घेतली. यावरून हे समजते की मूलभूत हक्क हे व्यक्तीच्या सर्वांगीण बौद्धिक, भौतिक, मानसिक, नैतिक आणि आध्यात्मिक विकासाठी गरजेचे असतात. मुलभूत हक्काला संविधानामुळे कायदेशीर स्वरूप मिळाले आहे. नागरिकांना किंवा व्यक्तींना मूलभूत हक्क उपभोगता येतील याची जबाबदारी भारतीय संविधानाने शासनावर टाकली आहे. तसेच शासनाकडून नागरिकांच्या किंवा व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे हनन झाल्यास व्यक्तीला किंवा नागरिकांना शासनाच्या विरोधात सर्वोच्च किंवा उच्च न्यायालयात दाद मागता येते. संसदेला मूलभूत हक्कांमध्ये संविधान सुधारणा करून बदल करता येऊ शकतो परन्तु संसद संविधानाची मूलभूत संरचना बदलू शकत नाही.

संविधानात मुलभूत हक्क सहा प्रकारचे दिलेले आहेत. समानतेचा हक्क (अनुच्छेद १४ ते अनुच्छेद १८), स्वातंत्र्याचा हक्क (अनुच्छेद १९ ते अनुच्छेद २२), शोषणापासून संरक्षणाचा हक्क (अनुच्छेद २३ ते अनुच्छेद २४), धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क (अनुच्छेद २५ ते अनुच्छेद २८), सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क (अनुच्छेद २९ ते अनुच्छेद ३0) आणि संविधानिक प्रतिकाराचा हक्क (अनुच्छेद ३२). मालमत्तेचा हक्क हा पहिला मूलभूत हक्कांमध्ये समाविष्ट होता परन्तु ४४ व्या घटना दुरुस्ती अंतर्गत मालमत्तेचा हक्क मूलभूत हक्क म्हणून रद्द करण्यात आला. आणि तो अनुच्छेद ३००क मध्ये कायदेशीर हक्क म्हणून जोडण्यात आला. मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी शासन आणि न्यायालयाची आहे. न्यायालयाने विविध खटल्यामधे मूलभूत हक्कांच्या संरक्षणाची भूमिका घेतली आहे तसेच शासन विविध कायदे तयार करून त्याची अंमलबजावणी करून मूलभूत हक्कांचे संरक्षण करते.

मूलभूत हक्क, राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये ह्या तरतुदी भारतीय संविधानाचा प्राण आहेत. मूलभूत हक्क, राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये हे एकमेकांशी पूरक असून यांच्या मुळाशी भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेत सांगितलेली मूल्ये आणि मानवी मूल्ये आहेत. शासन मूलभूत हक्क, राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे आणि मुलभूत कर्तव्ये याची अंमलबजावणी विविध कायद्याद्वारे करते. न्यायालय देखील कायद्याची वैधता तपासण्यासाठी मूलभूत हक्क, राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये यांची मदत घेते. सर्वात महत्वाचे म्हणजे व्यक्ती, समाज आणि देश यांच्यातील परस्पर सामंजस्याचे नाते तयार होण्यासाठी मूलभूत हक्क, राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये यांची नितांत आवश्यकता आहे.

१.६ सरावासाठी स्वाध्याय

खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा

१] मूलभूत हक्क याची पार्श्वभूमी व इतिहास लिहा

२] मूलभूत हक्कांबाबत तरतुदी विस्ताराने लिहा

३] मूलभूत हक्क याचे महत्व विशद करा

४] मुलभूत हक्क याबाबत महत्वाच्या खटल्यांची माहिती द्या

५] मूलभूत हक्क आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांच्यातील फरक स्पष्ट करा.

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१] चौधरी रा. अ. [२०२४]. भारताचे संविधान. पुणे, चौधरी लॉ पब्लिशर्स

२] पठाण नु. [2०2३]. आपले संविधान, प्रियदर्शी पब्लिकेशन

3] Lakshmikant M [2०22]. Indian Polity. Chennai, McGraw Hill Education [India] Private Limited

4] Basu D. D. [2०18]. Introduction of Indian Constitution. Gurgaon, LexisNexis.

घटक २ : राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे

अनुक्रमणिका

२. ० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय-विवेचन

- २.२.१ राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांची पार्श्वभूमी आणि इतिहास
- २.२.२ राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे
- २.२.३ राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे मधील घटनात्मक सुधारणा
- २.२.४ राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांची वैशिष्ट्ये
- २.२.५ राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांचे वर्गीकरण
- २.२.६ राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी
- २.२.७ राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यावर टीका
- २.२.८ मूलभूत हक्क आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांच्यातील संघर्ष संदर्भातील खटले

२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.४ स्वयं- अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके व इतर साधने

२.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

१. भारतीय संविधानातील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांची पार्श्वभूमी व इतिहासाची माहिती मिळेल

२. भारतीय संविधानातील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे व त्यांचे महत्व कळेल.

३. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वामध्ये आजपर्यत किती सुधारणा झाल्या आहेत हे कळेल.

४. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांचे वैशिष्ट्ये समजतील.

५. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांची अमलबजावणी कश्या रीतीने होत आहे हे कळेल.

६. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यावरील टीका समजेल.

७. मुलभूत हक्क आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांच्या संघर्षाबाबत न्यायालयीन खटल्यांबाबत माहिती मिळेल

२.१ प्रास्ताविक

भारतीय संविधानातील भाग IV [चार] मध्ये राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे सांगितलेली आहेत. अनुच्छेद ३६ ते अनुच्छेद ५१ पर्यंत राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे सांगितलेली आहेत. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ही भारतीय संविधानातील महत्वाचा भाग आहे. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ही राज्य व्यवस्थेसाठी मार्गदर्शक ठरणारी आहेत. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे पाळण्याचे कर्तव्य हे राज्यांचे पर्यायाने शासनाचे आहे. कायदे आणि धोरण बनविताना राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे बघणे गरजेचे आहे. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ही अत्यंत मूलभूत आणि आवश्यक आहेत. जसे निवडणुका असतात तेव्हा राजकीय पक्ष स्वत:चा जाहीरनामा जनतेपुढे प्रसिद्ध करतात तसेच राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे हा राज्याचा जाहीरनामा आहे. भारतीय संविधानाचे अभ्यासक आणि अमेरिकन विद्वान ग्रेनविल ऑस्टीन यानी राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांबाबत आणि मूलभूत हक्क यांना 'संविधानाचा मूळ आत्मा' म्हटले आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाचे पूर्व मुख्य न्यायाधीश एम. सी. छागला यांचे राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांबाबत असे मत आहे की " या सर्व तत्वांची पूर्णपणे अंमलबजावणी केली तर आपला भारत देश हा पृथ्वीवरील स्वर्गासारखा दिसू शकेल".

२.२ राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे

२.२.१ राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांची पार्श्वभूमी आणि इतिहास

राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांची पार्श्वभूमी आणि इतिहास समजून घ्यायचा असेल तर पुढील मुद्द्यांच्या आधारे समजून घेणे गरजेचे आहे.

१. **संविधान सभा :** भारतीय संविधान हा संविधान सभेने सर्वानुमते तयार केलेला दस्तऐवज आहे. संविधान सभेमध्ये भारतीय संविधानाचा मसुदा तयार करताना मुलभूत हक्कांबाबत चर्चा चालू असताना एक पेच संविधान सभेपुढे निर्माण झाला. मुलभूत हक्कांच्या संरक्षणाची जबाबदारी शासनाची असेल असा निर्णय झाला परंतु भारताची साधन संपत्ती, आर्थिक भांडवल, आणि अनुभव पाहता प्रत्येक मूलभूत हक्काचे संरक्षण करणे शक्य नव्हते. त्यावर संविधान सभेचे सल्लागार जेष्ठ विधिज्ञ बी एन. राव यांनी सूचना मांडली की आयर्लंड प्रमाणे मूलभूत हक्क आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे हे वेगवेगळे करता येऊ शकतात. त्यानुसार संविधान सभेने ज्या अधिकारांना संरक्षण देणे शक्य आहे आणि जे खूप महत्वाचे आहेत असे अधिकार मूलभूत हक्कांमध्ये ठेवले व ज्या अधिकारांचे संरक्षण करणे शक्य नाही असे अधिकार हे राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वामध्ये दाखल करण्यात आले. संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे की "राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ही भविष्यातील शासनाचा आधार आहे".

२. **आयर्लंडचे संविधान :** भारतीय संविधानावर जगभरातील इतर देशांच्या संविधानाचा प्रभाव दिसून येतो. भारतीय राज्यघटनेच्या निर्मात्यांवर आयरिश राष्ट्रवादी चळवळीचा प्रभाव होता. त्यामुळे आयर्लंडच्या राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांचा (Directive Principle) राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांवर खूप प्रभाव पडला आहे. भारत हे एक विशाल भूभाग असलेले आणि धर्म, जात, भाषा, खाद्य संस्कृती अशा अनेक अंगाने वैविध्यपूर्ण असे राष्ट्र आहे. भारतातील सामाजिक आणि आर्थिक आव्हानांचा व्यापकपणे सामना करण्यासाठी आयरिश राज्यघटनेतील राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे उपयुक्त ठरतील अशी भूमिका संविधान सभेतील सदस्यांनी घेतलेली दिसते. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे याची सूचना आंतरराष्ट्रीय

ख्यातीचे विधिज्ञ बेनेगल नरसिम्हा राव यांनी संविधानसभेतील सदस्यासमोर मांडली. भारतीय संविधानातील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यावर आर्यलंडच्या संविधानाचा प्रभाव आहे. आर्यलंडच्या संविधानातील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वांवर स्पेनच्या संविधानाचा प्रभाव आहे.

३. **भारत सरकार कायदा, १९३५ :** २५० वर्षे भारतावर ब्रिटीशांचे शासन चालू होते. सुरवातीला ईस्ट इंडिया कंपनी द्वारे ब्रिटीश भारतावर राज्य करत होते. १८५७ च्या उठावानंतर ब्रिटिश शासन थेट भारतावर राज्य करू लागले. भारतावर शासन करण्याचे कायदे हे ब्रिटिश पार्लमेंटमध्ये बनविले जात. भारतावर शासन करण्याच्या हेतूने बनवलेल्या कायद्यांपैकी भारत सरकार कायदा १९३५ हा कायदा खूप महत्वाचा आहे. या कायद्याद्वारे भारतातील प्रशासन नियंत्रित केले जायचे. भारत सरकार कायदा १९३५ मधील 'सूचनांचे साधन' (Instructions of Instrument) मधील तत्त्वे ही राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वांसारखी आहेत. राज्याची निती मार्गदर्शक तत्त्वेही भारत सरकार कायदा, १९३५ अंतर्गत भारतातील वसाहतींच्या राज्यपालांना सूचित केलेल्या सूचना आणि निर्देशांच्या संग्रहासारखी आहेत.

४. **सप्रू अहवाल :** सप्रू समितीने १९४५ मध्ये वैयक्तिक हक्कांच्या दोन श्रेणी सुचवल्या. एक न्याय्य आणि दुसरी गैर न्याय्य हक्क. न्याय्य हक्क, हे मूलभूत अधिकार आहेत, तर न्याय्य नसलेले अधिकार हे राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे आहेत. यामध्ये मूलभूत अधिकार आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे या दोन्हीची तरतूद करण्यात आली होती. गैर न्याय्य हक्क म्हणजे ज्या हक्कांना न्यायालयाचे संरक्षण नाही असे हक्क.

२.२.२ राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे

राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे राज्याची धोरणे ठरविणारी तत्त्वे किंवा विचार होय. राज्याला कायदे निर्मिती, शासनाचा कारभार, धोरण, योजना तयार करण्यासाठी मार्गदर्शन करणारी तत्त्वे म्हणजे राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे. यालाच राज्याची मार्गदर्शक तत्त्वे देखील म्हणतात. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांना 'भारतीय संविधानाचा विवेक' असे संबोधले जाते. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ही संविधानाच्या प्रस्तावनेतील मूल्ये अस्तित्वात आणण्याचा रोडमॅप आहे. वैविध्यपूर्ण आणि गतिमान जगाचे नागरिक म्हणून राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे सार आणि महत्त्व समजून घेणे महत्त्वाचे ठरते. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ही भारतीय संविधानातील भाग चार मध्ये दिलेली आहेत. अनुच्छेद ३६ ते अनुच्छेद ५१ पर्यंत भारतीय संविधानात राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत. संविधानाची प्रस्तावना देखील राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद केलेल्या "न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता" यासारख्या अटी सांगून कल्याणकारी राज्याच्या कल्पनेबद्दल बोलते.

- **अनुच्छेद ३६ : राज्य :** अनुच्छेद ३६ मध्ये राज्य म्हणजे काय ही संकल्पना मांडली आहे. राज्य म्हणजे शासनाच्या नियंत्रणाखालील आणि शासनाच्या निधीवर अवलंबून असलेल्या सर्व संस्था, व्यवस्था आणि प्राधिकरणे. तसेच भारताचे सरकार व संसद आणि राज्यातील राज्य सरकार व विधिमंडळ यांचा समावेश राज्य म्हणून केला जातो. अनुच्छेद १२ आणि अनुच्छेद ३६ मध्ये राज्याची संकल्पना सांगितलेली आहे.
- **अनुच्छेद ३७ : न्यायालयीन संरक्षण :** राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ही न्यायालयामार्फत अंमलबजावणी योग्य असणार नाही. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांविरोधी पालन केले किंवा त्याचे पालन केले नाही तर व्यक्ती राज्याच्या विरोधात न्यायालयात जाऊ शकत नाही. परंतु देशाच्या शासन व्यवहाराच्या दृष्टीने राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वेही अत्यंत मूलभूत आहेत. कायदे व धोरण ठरविताना ही तत्त्वे लागू करणे हे राज्याचे कर्तव्य आहे.

- **अनुच्छेद ३८ : कल्याणकारी राज्य :** राज्य सामाजिक, राजकीय आणि आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी, लोक कल्याणकारी समाजव्यवस्था राबविण्यासाठी प्रयत्नशील राहील. नीती मार्गदर्शक तत्वाच्याआधारे लोक कल्याणकारी राज्य निर्माण करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. राज्य लोक आणि लोकसमूह यांच्याबाबतीतील विषमता दूर करण्यासाठी प्रयत्नशील असेल. तसेच राज्य दर्जा, सुविधा आणि संधी यांच्याबाबातील विषमता दूर करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करेल. सर्वोच्च न्यायालयाने केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य या खटल्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की मार्गदर्शक तत्वांच्या उद्देशामध्ये कल्याणकारी राज्याची कल्पना समाविष्ट आहे.

  राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांमधील अनुच्छेद ३८ मधील आटोकाट प्रयत्न हा शब्द खूप महत्त्वाचा आहे. शासन सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाद्वारे कल्याणकारी राज्य प्रस्थापित करण्यासाठी कटिबद्ध असेल. संविधान स्वीकारण्याच्या वेळी परिस्थिती इतकी बिकट होती, आर्थिक परिस्थिती इतकी अपुरी होती की त्यामुळे कल्याणकारी व्यवस्था उभी करणे शक्य नव्हते. तरीही कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करण्याची दिशा या तत्वांनी सरकार समोर ठेवली आहे.
- **अनुच्छेद ३९ : राज्यांनी अनुसरावयाच्या धोरणाची तत्त्वे :** राज्य पुढील गोष्टीं बाबत धोरण तयार करतील

१. स्त्री पुरुषांना उपजीविकेचे साधन मिळविण्याचा समान हक्क असेल
२. सामुदायिक हिताच्या दृष्टीने समाजाच्या भौतिक साधन संपत्तीची मालकी आणि नियंत्रणाची विभागणी व्हावी
३. संपत्ती आणि उत्पादन साधनांचे केंद्रीकरण होऊ नये.
४. स्त्री आणि पुरुष यांना समान कामासाठी समान वेतन मिळावे.
५. बालके, स्त्री व पुरुष यांचे आरोग्य व ताकद यांचा दुरुपयोग होईल आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी वय व ताकद यास न पेलणारे असे कोणतेही काम करण्यास भाग पाडू नये.
६. बालकांना निरामय, मुक्त आणि प्रतिष्ठापूर्ण वातावरणात पूर्ण विकास करण्याची संधी व सुविधा दिल्या जाव्यात.

- **अनुच्छेद ३९ क : समान न्याय व कायदेविषयक मोफत मदत :** राज्य न्यायिक व्यवस्था समान संधीच्या तत्वावर उभारेल. आर्थिक किंवा अन्य कारणामुळे नागरिकांची न्याय मिळविण्याची संधी नाकारली जावू नये यासाठी मोफत कायदेशीर सहाय्य उपलब्ध करून देईल. हे मार्गदर्शक तत्व ४२ वी घटनादुरुस्ती कायदा, १९७६ अन्वये समाविष्ट करण्यात आले.
- **अनुच्छेद ४० : ग्रामपंचायतीचे संघटन :** राज्य ग्रामपंचायतीचे संघटन करेल आणि त्यांना समर्थ करण्यासाठी आवश्यक अधिकार आणि सुविधा देईल. या अनुच्छेदाचा पुढे विस्तार होवून ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती होऊन संविधानामध्ये अनुच्छेद २४३ मध्ये बदल करण्यात आले आणि शहरी व ग्रामीण भागात स्थानिक पातळीवर त्रिस्तरीय रचना अस्तिवात आल्या.
- **अनुच्छेद ४१ : कामाचा, शिक्षणाचा आणि विवक्षित बाबतीत लोकसहाय्याचा हक्क :** राज्य आपल्या आर्थिक क्षमतेनुसार बेरोजगारी, म्हातारपण आणि अपंगत्व याबाबतीत हाताला काम, शिक्षण आणि सहाय्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने तरतूद करेल.
- **अनुच्छेद ४२ : कामाच्या ठिकाणी न्याय्य व मानवीय परिस्थिती आणि प्रसुतीविषयक सहाय्य :** राज्य कामाच्या ठिकाणी न्याय्य आणि मानवीय परिस्थिती निर्माण होईल अश्या प्रकारची तरतूद करेल. तसेच राज्य नागरिकांना प्रसुतीविषयक सहाय्यासाठी तरतूद करेल.
- **अनुच्छेद ४३ : कामगारांसाठी सुविधा :** राज्य शेती आणि औद्योगिक क्षेत्रातील सर्व कामगारांना काम, निर्वाह वेतन, सामाजिक व सांस्कृतिक संधी आणि कामाच्या ठिकाणी मानवीय परिस्थिती उपलब्ध करून

देणाऱ्या तरतुदी करेल. तसेच राज्य ग्रामीण क्षेत्रात वैयक्तिक किंवा सहकारी तत्वावर कुटीर उद्योगाच्या संवर्धनासाठी तरतूद करेल.

- **अनुच्छेद ४३ क : उद्योगधंद्याच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग :** राज्य कोणत्याही उद्योगाच्या किंवा इतर कोणत्याची संस्थेच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग वाढविण्यासाठी तरतूद करेल. बेचाळीसावी संविधान सुधारणा १९७६ द्वारे अनुच्छेद ४३ क याचा समावेश संविधानात करण्यात आला.
- **अनुच्छेद ४३ ख : सहकारी संस्थांना प्रोत्साहन :** राज्य सहकारी संस्थांची निर्मिती, स्वतंत्र कामकाज व नियंत्रण आणि व्यवस्थापन यांबाबत प्रोत्साहन देईल. हे मार्गदर्शक तत्व ९७ वा घटनादुरुस्ती कायदा, २०१४ अन्वये समाविष्ट करण्यात आले.
- **अनुच्छेद ४४ : एकरूप नागरी संहिता :** भारताच्या राज्यक्षेत्रात नागरिकांना सर्वत्र एकरूप नागरी संहिता लाभावी यासाठी राज्य प्रयत्नशील राहील. विवाह, घटस्फोट, मुलाचा ताबा, दत्तक आणि वारसा यासारख्या बाबींसाठी सर्वांना एकसारखे कायदे तयार करण्याचा प्रयत्न राज्य करेल.
- **अनुच्छेद ४५ : सहा वर्षांपर्यंतच्या बालकांची देखभाल :** राज्य सर्व मुली व मुलांची वयाची सहा वर्षे पूर्ण होई पर्यंत देखभाल करेल तसेच त्यांना शिक्षण उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करेल. हे मार्गदर्शक तत्व ६८ वी घटनादुरुस्ती कायदा, २००२ अन्वये समाविष्ट करण्यात आले.
- **अनुच्छेद ४६ : अनुसूचित जाती, जमाती आणि इतर दुर्बल घटक यांचे हितसंबंध:** राज्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दुर्बल घटक यांच्या शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंधाना प्रोत्साहन देईल. तसेच सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारचे शोषण यापासून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व दुर्बल घटक यांचे रक्षण करेल.
- **अनुच्छेद ४७ : सार्वजनिक आरोग्य सुधारणे :** राज्य आपल्या जनतेचे पोषणमान व राहणीमान उंचाविण्यासाठी प्रयत्नशील राहील. तसेच राज्य सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी आपले प्राथमिक कर्तव्य मानेल. तसेच राज्य आरोग्याला हानिकारक असलेल्या मादक पेये आणि मादक पदार्थाच्या सेवनावर प्रतिबंध घालू शकेल.
- **अनुच्छेद ४८ : कृषी व पशुसंवर्धन यांची सुसूत्र व्यवस्था लावणे :** आधुनिक व शास्त्रीय पद्धतीने कृषी व पशुसंवर्धन यांची सुव्यवस्था करण्यासाठी राज्य प्रयत्नशील राहील. तसेच राज्य गाई इतर दुभती व जुंपणीची गुरे व वासरे यांच्या जातीचे रक्षण करणे व त्यांची सुधारणा व कत्तलीस मनाई करणे यासाठी उपाययोजना करील.
- **अनुच्छेद ४८ क : पर्यावरणाचे संरक्षण :** राज्य पर्यावरणाचे संरक्षण करेल तसेच देशातील जंगले आणि वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करेल. 42 वी घटनादुरुस्ती कायदा, 1976 अन्वये सदरचा अनुच्छेद संविधानात समाविष्ट करण्यात आला.
- **अनुच्छेद ४९ : राष्ट्रीय महत्वाच्या वस्तूंचे संरक्षण :** राज्य कलात्मक किंवा ऐतिहासिक दृष्ट्या कुतूहल विषय असलेल्या प्रत्येक स्मारक, स्थान किंवा वस्तूचे लूट, विद्रूपण, नाश, विल्हेवाट किंवा निर्यात यापासून संरक्षण करेल.
- **अनुच्छेद ५० : न्याय यंत्रणा कार्यकारी यंत्रणेपासून वेगळी ठेवणे :** राज्याच्या लोकसेवांमध्ये न्याय यंत्रणा कार्यकारी यंत्रणेपासून अलग ठेवण्याकरिता राज्य उपाययोजना करील. राज्याचे तीन भाग आहेत. कायदेमंडळ, न्याय मंडळ आणि कार्यकारी मंडळ. यांना एकमेकांपासून स्वतंत्र आणि तरीही एकमेकांवर देखरेख करत काम करता यावे यासाठी उपाययोजना करील. स्वतंत्र न्यायव्यवस्था राहिली पाहिजे या उद्देशाने या अनुच्छेदाची तरतूद केली गेली आहे.

- **अनुच्छेद ५१ : आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेचे संवर्धन :** राज्य पुढील कारणासाठी प्रयत्नशील राहील

१. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन करण्यासाठी,

२. राष्ट्राराष्ट्रांमध्ये न्यायसंगत व सन्मानपूर्ण संबंध राखण्यासाठी,

३. संघटित जनसमाजांच्या आपापसातील व्यवहारांमध्ये आंतरराष्ट्रीय कायदा व तहांची बंधने यांप्रति आदरभावना जोपासण्यासाठी,

४. आंतरराष्ट्रीय तंटे लवादाद्वारे सोडविण्यास प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्नशील राहील.

अशा महत्त्वाच्या राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांचा संविधानात समावेश करण्यामागे कल्याणकारी राज्य प्रस्थापित करून समाजातील काही व्यक्तींमध्ये संपत्तीचे केंद्रीकरण होऊ न देण्याचा मोठा उद्देश आहे.

२.२.३ राज्य धोरणांच्या मार्गदर्शक तत्वांमधील संविधान सुधारणा

राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे महत्त्वाची आहेत. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३६८ नुसार संविधानामध्ये सुधारणा केल्या जातात. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांमध्ये सुधारणा ह्या संसदेतील सदस्यांच्या बहुमताने होतात. आतापर्यंत खूप वेळा भारतीय संविधानातील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांमध्ये सुधारणा झालेल्या आहेत.

१. १९५६ साली ७ व्या घटना दुरूस्ती द्वारे भारतीय संविधानातील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे मधील अनुच्छेद ४९ मध्ये सुधारणा करण्यात आली.

२. १९७६ मधील ४२ वी घटना दुरूस्ती द्वारे संविधानामधील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांमधील ४ अनुच्छेदा मध्ये सुधारणा करण्यात आली. याद्वारे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३९, ३९-क, ४३-क, ४८-क मध्ये बदल करण्यात आले.

३. तसेच १९७८ मधील ४४ व्या घटना दुरूस्ती द्वारे भारतीय संविधानातील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वां मधील अनुच्छेद ३८ मध्ये सुधारणा करण्यात आली.

४. तसेच भारतीय संविधानाच्या राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांमधील अनुच्छेद ४५ मध्ये २००२ साली ८६ व्या घटना दुरुस्ती द्वारे सुधारणा करण्यात आली.

५. २०११ मधील ९७ व्या घटना दुरुस्ती द्वारे भारतीय संविधानातील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांमधील अनुच्छेद ४३-ख मध्ये सुधारणा करण्यात आली.

२.२.४ राज्य धोरणांच्या मार्गदर्शक तत्वांची वैशिष्ट्ये

भारतीय संविधानातील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे

१. **न्यायालयीन संरक्षण :** राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांच्या उल्लंघनासाठी न्यायालयाचे संरक्षण नाही किंवा न्यायालयीन कारवाईचे प्रावधान नाही. यांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्याकडे पुरेशी संसाधने नसतील (किंवा काही चांगले आणि प्रगतीशील कायदेही येऊ शकतात हे लक्षात घेऊन ते गैर-न्यायकारक ठरविण्यात आले.) तर सरकारला यांच्या अंमलबजावणी साठी सक्ती करता येणार नाही. न्यायालयांना कायदेशीर घटनात्मक वैधता तपासण्यासाठी मदत करतात. पुरेशा संसाधनांचा अभाव, विविधता व मागासलेपणा, नुकतेच स्वातंत्र्य मिळणे यामुळे राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांचे तंतोतन पालन करणे शक्य नव्हते, म्हणून या तत्वांना संविधान कर्त्यांकडून न्यायालयीन संरक्षण देणे शक्य झाले नाही.

२. **कायदे बनविण्याचा आधार :** राज्य कायदे आणि धोरणे बनविताना राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांचा आधार घेतील. ही तत्त्वे कार्यकारी आणि प्रशासकीय बाबी हाताळण्यासाठी राज्याला कायदेशीर आधार

देतात. केंद्र शासन किंवा राज्य शासन यांनी राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांची कायद्याद्वारे अंमल बजावणी करणे गरजेचे आहे.

३. **मूलभूत :** राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ही मूलभूत हक्कांसारखे न्यायालयाद्वारे संरक्षित नाहीत. असे असले तरी परंतु राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ही मूलभूत आणि अत्यंत महत्वाची आहेत. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांमधील अनुच्छेद ३७ मध्ये म्हटले आहे की ही तत्त्वे मूलभूत व अत्यंत महत्वाची आहेत. शासनाने त्याची अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

४. **कल्याणकारी राज्य :** भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेतील न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता अस्तित्वात आणण्यासाठी कल्याणकारी राज्य घडविण्यासाठी राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांचा आधार राज्यांना घ्यावा लागतो. अनुच्छेद ३७ नुसार कायद्याद्वारे कल्याणकारी राज्य तयार करणे हा उद्देश राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांचा आहे.

५. **सामाजिक आर्थिक लोकशाही :** राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वाच्या आधारे शासन विविध कार्यक्रम राबवून सामाजिक आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करू शकतात. भारतात सामाजिक व आर्थिक लोकशाही उभारण्यासाठी राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांचा मोलाचा वाटा आहे. या तत्वामुळे राज्याच्या सुशासन पद्धतींना प्रोत्साहन मिळते. लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी संविधानामध्ये राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांचा समावेश केला गेला.

६. **समाजवाद रुजविणे :** संविधान सभेतील चर्चा पाहिल्यास आपल्याला असे दिसून येते की संविधान सभेतील सदस्यांनी समाजवादी भारताचे स्वप्न पाहिले होते. त्यामुळे संविधान सभेतील चर्चेदरम्यान समाजवादी तरतुदींवर चर्चा झालेली दिसून येते. तसेच पंडित जवाहरलाल नेहरू जेव्हा उद्देशाचा ठराव संविधान सभेत मांडतात तेव्हा देखील समाजवाद भारतात प्रस्थापित केला पाहिजे असे आवाहन करतात. तसेच भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेमध्ये समाजवादी भारताचे स्वप्न मांडले आहे. प्रस्तावनेतील समाजवादी भारत प्रत्यक्षात उतरविण्यासाठी राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे गरजेची आहेत. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांमध्ये बहुतांश तत्त्वे ही समाजवादी स्वरुपाची आहेत.

२.२.५ राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांचे वर्गीकरण

समाजवादी तत्त्वे : भारतामध्ये स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी लोकशाही समाजवाद हा विचार जनमानसात रुजत होता. लोकशाही समाजवादी विचाराचा उद्देश हा समाजात सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करणे हा आहे. यातूनच कल्याणकारी राज्याची उभारणी करता येऊ शकते. समाजवादी तत्त्वे म्हणून भारतीय संविधानातील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांमधील अनुच्छेद ३८, ३९, ३९-क, ४१, ४२, ४३, ४३-क, आणि ४७ यांचा समावेश होऊ शकतो.

१. **गांधीवादी तत्त्वे :** ही तत्त्वे गांधीवादी विचारधारेवर आधारित आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी महात्मा गांधी यांनी काही लोकोपयोगी योजना राबविण्याच्या सूचना दिल्या होत्या. महात्मा गांधीचे स्वप्न प्रत्यक्षात येण्यासाठी काही विचारांचा समावेश राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांमध्ये केला आहे. गांधीवादी तत्त्वे म्हणून भारतीय संविधानातील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांमधील अनुच्छेद ४०, ४३, ४३-ख, ४६, ४७ आणि ४८ यांचा समावेश होऊ शकतो.

२. **उदारमतवादी तत्त्वे :** उदारमतवादी विचाराच्या आधारावरील तत्वांचा समावेश यामध्ये केला गेला आहे. तसेच उदारमतवादी तत्त्वे म्हणून भारतीय संविधानातील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांमधील अनुच्छेद ४४, ४५, ४८, ४८-क, ४९, ५० आणि ५१ यांचा समावेश होऊ शकतो.

२.२.६ राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी

राज्याचे धोरण ठरविताना राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे मार्गदर्शक ठरतात. राज्य कायदे बनविताना नीती मार्गदर्शक तत्त्वे यांचा आधार घेतात. देशात कल्याणकारी सुविधा राबविण्यासाठी व्यवस्थेने राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे आवश्यक आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आतापर्यंत राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांच्या आधारे अनेक कायदे किंवा धोरणे बनविलेली आहेत. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी हे कायदे व धोरण यांच्यामार्फत केली जाते.

१. **कल्याणकारी राज्य :** राज्याने कल्याणकारी राज्य प्रस्थापित केले पाहिजे असे राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांचा उद्देश आहे. यासाठी कल्याणकारी कायदे केंद्र सरकार आणि राज्यांनी बनविले आहेत. याच उद्देशाने महिलांसाठी विशेष कायदे बनवले आहेत. तसेच शेतकऱ्यांसाठी विशेष कायदे आहेत. कामगारांच्या हितासाठी कामगार कायदे बनवले आहेत. लहान मुलांच्या सुरक्षेसाठी विशेष कायदे बनविले आहेत. वंचित, दुर्लक्षित घटकांसाठी देखील विशेष कायदे बनवले आहेत. विशेष घटकांसाठी विशेष कायदे बनवून त्यांना सुरक्षा प्रस्थापित करणे हे कल्याणकारी राज्यात अपेक्षित आहे.

२. **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (MGNREGA)** : अनुच्छेद ३९(क) च्या अंमलबजावणीसाठी यासारख्या धोरणांची अंमलबजावणी करावी लागते.

३. **समान वेतन अधिनियम १९७६ :** या कायद्याद्वारे अनुच्छेद ३९ (घ) चे पालन केले जाते.

४. **बालकामगार (प्रतिबंध आणि नियमन) कायदा १९८६ :** अनुच्छेद ३९(च) ची अंमलबजावणी यासारखे कायदे बनवून केली जाते.

५. **विधी सेवा प्राधिकरण कायदा १९८७ :** अनुच्छेद ३९ क च्या आधारे राज्याने हा कायदा बनविला आणि त्याद्वारे तालुका, जिल्हा, राज्य आणि केंद्र स्तरावर विधी प्राधिकरण सेवा कार्यरत आहे.

६. **ग्राम पंचायत कायदा :** अनुच्छेद ४० चे अधिक विस्तारित स्वरूप हे घटना दुरुस्ती ७३ वी आणि ७४ वी द्वारे अनुच्छेद २४३ मध्ये अधिक तरतुदीसह समाविष्ट करण्यात आले. तसेच राज्य शासन आणि केंद्र शासन यांचे ग्रामविकास मंत्रालय देखील आहे ज्याच्याद्वारे विविध धोरण, योजना राबविल्या जातात. प्रत्येक स्तरावरील पंचायतींमध्ये एकूण जागांपैकी एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

७. **शिक्षण व दिव्यांग संदर्भात कायदे :** अनुच्छेद ४१ च्या अंमलबजावणीतील शिक्षण अधिकार कायदा २००९ राबविला जातो, तसेच शासनाच्या शिक्षण विभागाकडून विविध योजना आणि धोरण राबवविले जाते. केंद्र सरकारने दिव्यांग व्यक्तींसाठी विविध योजना काढल्या आहेत. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा कार्यक्रम घेतला जातो.

८. **प्रसुती रजा आणि मातृत्व लाभ कायदा :** अनुच्छेद ४२ च्या अंमलबजावणीसाठी यासारखे कायदे बनविले जातात. तसेच शासनाच्या कामगार मंत्रालयाच्या माध्यमातून कामाबाबत न्याय व मानवीय परिस्थिती निर्माण करण्यासाठी विविध योजना राबविल्या जातात.

९. **कामगार कायदे :** शेती, उद्योग अशा विविध क्षेत्रांतील कामगारांच्या कल्याणासाठी कामगार कायदा संहिता २०२२ सारखे विविध कायदे अस्तित्वात आहेत. तसेच कामगार मंत्रालयाच्या माध्यमातून कामगार कल्याणासाठी विविध धोरणे व योजना राबविल्या जातात. यामधे अनुच्छेद ४३ च्या अंमलबजावणी होताना दिसते. गरीब शेतकऱ्यांना शेतजमिनीचा मालकी हक्क प्रदान करण्यासाठी अनेक जमीन सुधारणा कायदे लागू करण्यात आले.

१०. **सामाजिक न्याय योजना :** अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती व दुर्बल घटकांच्या सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक विकासासाठी विविध योजना व धोरणे राबविली जातात. शिष्यवृत्ती कार्यक्रम, अल्पसंख्याक

संस्थांसाठी अनुदाने आणि दुर्बल घटकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक विकासाच्या योजना अस्तित्वात आहेत. अनुच्छेद ४६ च्या अंमलबजावणीसाठी सामाजिक न्याय योजना सामाजिक न्याय मंत्रालयाद्वारे राबविला जातो. अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी मुलांचे आणि मुलींचे वसतिगृह यासारख्या कार्यक्रमांचा त्यात समावेश होतो. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना अत्याचारापासून संरक्षण मिळावे यासाठी सरकारने अत्याचार प्रतिबंधक कायदा लागू केला, ज्याने अशा अत्याचारांना कठोर शिक्षा दिली जाऊ शकते.

११. **सार्वजनिक आरोग्य विभाग :** सार्वजनिक आरोग्य विभाग नागरिकांचे सार्वजनिक आरोग्य सुधारण्याच्या हेतूने विविध योजना राबवितो. याद्वारे अनुच्छेद ४७ ची अंमलबजावणी केली जाते. अनुच्छेद ४७ च्या अंमलबजावणीच्या हेतूने एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (IRDP), एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रम (ITDP), आणि प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, आयुष्मान भारत इ. सारखी सरकारी धोरणे व योजना राबविल्या जातात. महिलांचे चांगले आरोग्य सुनिश्चित करण्यासाठी केंद्र आणि राज्य स्तरावर जननी सुरक्षा योजने सारखे विविध कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत.

१२. **गोवंश हत्या बंदी कायदा :** हा कायदा अनुच्छेद ४८ आधारे बनविला आहे. या कायद्यामुळे गायी आणि बैलाच्या कत्तलीवर बंदी घालण्यात आली आहे. या कायद्यामुळे कृषी व पशू संवर्धन झाले आहे असे काही संघटनांचे म्हणणे आहे. संविधानातील अनुच्छेद ४८ हा शेतीची आणि शेतीसाठी आवश्यक असलेल्या पशुधनाची सुसूत्र व्यवस्था लावण्या संदर्भात आहे. या अनुच्छेदातील शब्द रचनेनुसार जुंपणीचे म्हणजेच शेतात काम करण्यासाठी उपयुक्त अशी जनावरे आणि दुभती म्हणजे दुध देणारी जनावरे यांची कत्तल होऊ रोखली जावी अशा पद्धतीची शब्दरचना अनुच्छेद ४८ मध्ये आहे. म्हणजेच गोवंश हत्या रोखणे हा मुद्दा संविधानाच्या अनुच्छेद ४८ मध्ये धार्मिक किंवा भावनिक अंगाने आलेला नसून शेती व पशुधनाची सुसूत्र व्यवस्था लावणे आणि त्यांची पैदास वाढवणे अशा अर्थाने आलेला दिसतो. सध्याच्या गोवंश हत्या बंदी कायद्याने शेतकरी समजाच्या अडचणीत भर पडली आहे असे दिसते.

१३. **पर्यावरण संरक्षण कायदे :** अनुच्छेद ४८क च्या अंमलबजावणीच्या उद्देशाने भारतात पर्यावरण संरक्षण कायदा, वन्यजीव संवर्धन कायदा यासारखे विविध कायदे लागू केले आहेत. याद्वारे पर्यावरणाचे संरक्षण आणि सुधारणा आणि देशातील जंगले आणि वन्यजीवांचे रक्षण केले जात आहे.

१४. **राष्ट्रीय स्मारक प्राधिकरण :** प्राचीन स्मारके आणि पुरातत्व स्थळे आणि अवशेष कायद्याद्वारे राष्ट्रीय स्मारके, स्थाने व वस्तूंचे संरक्षण आणि संवर्धन केले जाते. याद्वारे अनुच्छेद ४९ ची अंमलबजावणी केली जात आहे.

१५. **परराष्ट्र धोरण :** भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर भारताने परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत अलिप्ततावादी धोरण स्वीकारले. भारताचे परराष्ट्र धोरण मानवता, शांतता, सन्माननीय संबंध, सुरक्षा इत्यादींवर आधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेला चालना देते. भारत Non-Alignment Movement (NAM), इंटरनॅशनल सोलर ऑर्गनायझेशन किंवा इतर विविध अंतरराष्ट्रीय संघटनेचा सदस्यत्व आहे. भारताचे परराष्ट्र धोरण हे न्यायसंगत आणि सन्मानपूर्वक संबंध अधिक घट्ट करण्यासाठी आहे. याद्वारे अनुच्छेद ५१ ची अंमलबजावणी केली जात आहे.

१६. **योजना आयोग :** १९५०साली देशाचा विकास नियोजनबद्ध पद्धतीने करण्यासाठी योजना आयोगाची स्थापना करण्यात आली. याद्वारे पंचवार्षिक योजना आखल्या जाऊ लागल्या. सामाजिक व आर्थिक न्यायाच्या द्वारे

दर्जा व संधीची समानता साधण्याचा प्रयत्न केला जात असे. २०१५ मध्ये योजना आयोगाच्या जागी नीती आयोगाची स्थापना केली गेली.

राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांच्या अंमलबजावणीसाठी कायदे, धोरणे व योजनांच्या माध्यमातून शासन विविध पावले उचलते. असे असताना देखील अजूनही देशातील सामाजिक-आर्थिक न्यायाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी चोखपणे करणे गरजेचे आहे. गरिबी व श्रीमंती मधील विषमता, सामाजिक विषमता, समाजातील दुर्बल घटकांशी भेदभावाचे प्रश्न, पर्यावरणाचा ऱ्हास इ. गंभीर प्रश्न आज भेडसावत आहेत.

२.२.७. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांवर टीका

भारतीय संविधानातील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे हा खूप महत्वाचा भाग आहे. संविधान सभेत नीती मार्गदर्शक तत्वाबाबत चर्चा करताना यावर टीका झालेली दिसून येते. भारतीय संविधानातील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वावरील टीका पुढीलप्रमाणे :

१. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ही महत्वाची आहेत. परंतु तिला न्यायिक संरक्षण नाही. कारण त्यावेळेस या तत्वांची अंमलबजावणी करण्यासाठी देशाकडे पुरेसे आर्थिक भांडवल व संसाधने नव्हते तसेच देशात एका बाजूला प्रचंड विविधता आणि दुसऱ्या बाजूला खोलवर रुजलेली विषमता होती त्यामुळे या तत्वांची अंमलबजावणी करण्यात संभाव्य अडथळे जास्त होते तसेच राज्याला सामाजिक गरजेनुसार या तत्वांची अंमलबजावणी करण्यास स्वातंत्र्य मिळावे म्हणून या तत्वांना न्यायालयीन संरक्षण नाही. संविधान सभेचे सदस्य प्रो. के. टी. शहा यांनी राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांबाबत बोलताना म्हणाले होते की "ही तत्त्वे बँकेच्या धनादेशासारखे आहेत जी बँकेकडे पैसे असतील तरच वटू शकतील".

२. काही तरतुदी यातील कालबाह्य आहेत. त्याचा एकविसाव्या शतकाच्या तत्वज्ञानाशी संबंध नाही. उदा. मादक पेयांवर बंदी घालणे.

३. ही तत्त्वे अस्थिरता आणि संघर्षास कारणीभूत ठरू शकतात. या तत्वांच्या अंमलबजावणीने राज्य आणि केंद्रामध्ये संघर्ष होऊ शकतो. भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीच्या सुरुवातीच्या काळात मूलभूत अधिकार आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांच्यातील संघर्षामुळे घटनात्मक प्रकरणे जास्त होती. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्यासाठी केलेले कायदे हे मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करत असल्यास पेच उभा राहू शकतो.

४. या तत्वांची मांडणी ही अतार्किक पद्धतीने केली आहे असे म्हटले जाते. कोणत्याही सुसंगत तत्वाज्ञानाशिवाय मांडणी केली आहे असे दिसून येते. सामाजिक दार्शनिक एम. श्रीनिवास यांनी देखील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांची व्यवस्था तर्क हीन आहे अशी टीका केली आहे. ही तत्त्वे पूर्णपणे आधुनिक नाहीत किंवा पूर्णपणे पुरातन नाहीत. ही दोघांचे मिश्रण असल्याने राबविताना अडचणी तयार होत आहेत.

५. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ही सर्वांगीण सुंदर वाटणारी पण प्रत्यक्षात न उतरणारी तत्त्वे आहेत असे म्हटले जाते.

६. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांमुळे सांविधानिक संघर्ष उभा राहणार आहे. यामुळे केंद्र व राज्य यांचे संबंध यांच्यामध्ये, राष्ट्रपती व प्रधान मंत्री यांच्यामध्ये, राज्यपाल व मुख्यमंत्री यांच्यामध्ये, सांविधानिक संघर्ष होऊ शकतो.

राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेमध्ये वेळोवेळी केलेले भाष्य महत्त्वाचे आहे. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार स्वीकारून संविधान सभेने राजकीय लोकशाहीची किंवा राजकीय समानतेची भूमिका घेतली. प्रत्येक व्यक्तीला एकच मत आणि प्रत्येक व्यक्तीच्या मताची समान किंमत ही राजकीय

लोकशाही संविधान सभेने महत्त्वाची मानली मात्र त्याचवेळी भारतीय समाजात खोलवर रुजलेल्या आर्थिक विषमतेचा मुद्दा बाबासाहेबांनी महत्त्वाचा मानला. संसदीय लोकशाहीमध्ये दर पाच वर्षानी नव्याने अस्तित्वात येणाऱ्या सरकारच्या इच्छाशक्तीवर आर्थिक विषमता कमी करण्याचा मुद्दा सोडू नये असे बाबासाहेब मानत होते. म्हणूनच राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे जरी न्यायालयाद्वारा अंमलबजावणी योग्य नसली तरी अनुच्छेद सदतीस मध्ये या तत्त्वांचे महत्त्व जोरकसपणे स्पष्ट केले गेले आहे. जरी ही तत्त्वे न्यायालयाद्वारा अंमलबजावणी योग्य नसली तरी कायदेमंडळाने कायदे करताना ही तत्त्वे मूलभूतच मानावेत अशी शब्दरचना संविधान निर्मात्यांनी अनुच्छेद ३७ मध्ये केलेली आपल्याला दिसते. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वामधील बहुतेक अनुच्छेद हे कल्याणकारी, समाजवादी राज्यव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करणारी आहेत यांना न्यायालयाचे संरक्षण नाही मग या नीती मार्गदर्शक तत्वांचा काय उपयोग असा सवाल करणाऱ्या संविधान सभेच्या सदस्यांना बाबासाहेबांनी दिलेले उत्तर समजून घेण्याजोगे आहे. बाबासाहेबांची भूमिका अशी होती की प्रत्येक मुद्द्द्याचे उत्तर न्यायालयाकडून मिळेल असे मानणे योग्य नाही. संसदीय लोकशाहीमध्ये सत्तेत येण्याची इच्छा असणाऱ्या लोकांना दर पाच वर्षानी जनतेसमोर जावे लागते, म्हणजेच जनतेच्या न्यायालयात जावे लागते. तिथे आपण काय केले किंवा आपण काय करणार याची उत्तरे सत्तेत येऊ इच्छिणाऱ्या लोकांनी देणे अपेक्षित असते. मतदारांनी आपले मत कोणाला टाकणार याचा निर्णय घेण्यासाठी ही उत्तरे मागणे अपेक्षित असते. त्यामुळे काही मुद्द्यांचा निपटारा जनतेच्या न्यायालयात होणे योग्य राहील ही बाबासाहेबांची भूमिका प्रत्यक्षात उतरवावयाची असेल तर सजग व सक्रिय मतदार बनवण्याची गरज आहे. मतदारांचे प्रबोधन हा एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा असून संविधानातील कुठल्याही अनुच्छेदाची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने सजग आणि सक्रिय मतदार बनावेत यासाठीचे प्रबोधन महत्त्वाचे आहे.

२.२.८ मूलभूत हक्क आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांच्यातील संघर्ष संदर्भातील खटले

भारतात संविधानामुळे लोकशाही अस्तित्वात आहे. लोकशाहीची प्रमुख तीन अंगे आहेत. कायदेमंडळ, न्यायमंडळ आणि कार्यकारी मंडळ. कायदेमंडळ हे कायदे बनविण्याचे काम करते. कार्यकारी मंडळ हे कायद्याच्या अंमलबजावणीचे काम करते तर न्यायमंडळ हे कायद्याचा अर्थ लावण्याचे काम करते. न्यायालय आपले काम करत असताना मूलभूत हक्क आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांच्यात संघर्ष उभा राहू शकतो. न्याय आणि समानता तत्वांमध्ये सतत संघर्ष होत असतो. एकाच्या न्यायामुळे दुसऱ्यासोबत असमानतेचा व्यवहार होऊ शकतो. याचा मेळ साधण्याची जबाबदारी ही न्यायालयावर असते. यातून मूलभूत हक्क आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांच्यात संघर्ष उभा राहतो. या संदर्भातील महत्वाचे खटले समजून घेणे गरजेचे आहे.

- **चंपकम दोरायराजन खटला** : या खटल्यामध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की मूलभूत अधिकार आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे या दोघांमधील संघर्षाच्या बाबतीत मूलभूत अधिकार हे राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांच्या वरचढ असतील. परंतु राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांना प्रभावी करण्यासाठी कायदेमंडळ मूलभूत हक्कांमध्ये सुधारणा करू शकते. याद्वारे पहिले संविधान संशोधन, चौथे संविधान संशोधन व सहावे संविधान संशोधन करण्यात आले.
- **गोलखनाथ खटला** : या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने चंपकम दोरायराजन खटल्यामधील विचार अधिक स्पष्ट केला. या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे असे म्हणणे आहे की मूलभूत हक्क हे पवित्र स्वरूपाचे असून डीपीएसपीच्या अंमलबजावणीसाठी त्यात सुधारणा करता येणार नाहीत. २४ वे संविधान संशोधन, २५वे संविधान संशोधन यांबाबत सदर खटल्यामध्ये टिपणी केली गेली होती.

- **केशवानंद भारती खटला :** या खटल्याला भारतीय न्याय व्यवस्थेतील ध्रुवतारा समजले जाते. या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांना प्रभाव देणाऱ्या कायद्यांना संपूर्ण प्रतिकारशक्ती प्रदान करणारे अनुच्छेद ३१ ग रद्दबातल मानण्यात आले. या खटलामध्ये मुलभूत हक्काना राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वापेक्षा अधिक महत्व दिलेले आहे.
- **मिनर्व्हा मिल्स खटला :** या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले आहे कि मूलभूत हक्क आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांमधील संतुलनाच्या पृष्ठभूमीवर संविधानाची स्थापना झाली आहे. मूलभूत हक्का एवढेच राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे मूलभूत आणि महत्वाची आहेत. सध्या मूलभूत हक्क हे राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांपेक्षा वर आहेत. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्यासाठी मूलभूत अधिकारांमध्ये संसद बदल करू शकते. परंतु संविधानाचा मूलभूत गाभा बदलू शकत नाही.

  मूलभूत हक्कांचे राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांवर वर्चस्व आहे. परंतु राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे हे लागू अनुच्छेद ३७ नुसार महत्वाचे आहेत. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांची प्रभावी अंमलबजावणी करणे ही नागरिकांची देखील जबाबदारी आहे. उदा. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे मध्ये अनुच्छेद ४७ मध्ये सार्वजनिक आरोग्य बाबत म्हटले आहे. याची अंमलबजावणी करायची असेल तर सार्वजनिक आरोग्य हा मुद्दा मुलभूत हक्काच्या व्यक्तीच्या जगण्याच्या अधिकाराशी म्हणजे अनुच्छेद २१ शी जोडता येतो.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न.

एका वाक्यात उत्तरे लिहा.

[१] राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यावर कोणत्या देशाच्या संविधानाचा प्रभाव आहे ?

[२] राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे संविधानाच्या कोणत्या भागात समाविष्ट केलेली आहेत ?

[३] भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदामध्ये राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत ?

[४] राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांना न्यायालयाचे संरक्षण आहे का?

[५] अनुच्छेद ३९ क च्या अंमलबजावणी साठी कोणता कायदा बनविला गेला ?

२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- मार्गदर्शक : दिशा देणारे
- परराष्ट्र : स्वतःच्या राष्ट्रापेक्षा वेगळे राष्ट्र; इतर राष्ट्रे;
- दिव्यांग :अपंग
- विवक्षित : निश्चित असे पण वेगवेगळे
- खटला : न्यायालयीन याचिका / प्रकरण

२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१] आयर्लंड २] भाग चार ३] अनुच्छेद ३६ ते ५१

४] नाही ५] विधी सेवा प्राधिकरण कायदा १९८७

२.५ सारांश

राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे या घटकामधून आपण राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे याबाबत सखोल माहिती घेतली आहे. संविधान सभा, आयर्लंड चे संविधान, भारत सरकार कायदा १९३५ आणि सप्रू अहवाल यातून आपण राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहिली. तसेच भारतीय संविधानातील भाग चार मधील राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे ही अनुच्छेद ३६ ते ५१ मध्ये दिलेली आहेत. त्यांची विस्ताराने माहिती घेतली. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वामध्ये आजपर्यंत झालेल्या संविधान सुधारणा बघितल्या. न्यायालयीन संरक्षण, कायदे बनविण्यास आधार,अत्यंत आवश्यक, कल्याणकारी राज्य, समाजवाद रुजवणे या मुद्द्यांच्या आधारे राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांची वैशिष्ट्ये समजून घेतली. राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांचे विचारधारांच्या आधारे समाजवादी तत्त्वे, गांधीवादी तत्त्वे आणि उदारमतवादी तत्त्वे या तीन भागात वर्गीकरण करता येऊ शकते. शासनाने कायदे किंवा धोरण बनविताना राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे महत्त्वाची मानली पाहिजेत. त्यामुळे विविध कायदे, योजना, धोरणे राबवून शासन राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांची अंमलबजावणी करायचा प्रयत्न करत आहे. मूलभूत अधिकार व राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांच्यात संघर्ष होत असतात. चंपकम दोरायराजन खटला, गोलखनाथ खटला, केशवानंद भारती खटला आणि मिनर्व्हा मिल्स खटला यामधे मूलभूत अधिकार आणि राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांच्यात संघर्ष होत असला तरी दोन्ही घटक अत्यंत महत्वाचे आहेत हे आपण पाहिले. मूलभूत हक्क व राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे दोन्ही मिळून नागरी समाजात एक उत्तम संतुलन आणतात.

२.६ सरावासाठी स्वाध्याय

खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा

१] राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांची पार्श्वभूमी व इतिहास लिहा.

२] राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे विस्ताराने लिहा.

३] राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांची वैशिष्ट्ये लिहा.

४] राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांची अंमलबजावणी कशी झाली आहे ते लिहा.

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१] चौधरी रा. अ. [२०२४]. भारताचे संविधान. पुणे, चौधरी लॉ पब्लीशर्स

२] पठाण नु. [२०२३]. आपले संविधान, प्रियदर्शी पब्लीकेशन

3] Lakshmikant M [2022]. Indian Polity. Chennai, McGraw Hill Education [India] Private Limited

4] Basu D. D. [2018]. Introduction of Indian Constitution. Gurgaon, LexisNexis.

घटक ३ : मूलभूत कर्तव्ये

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय-विवेचन

- ३.२.१ मूलभूत कर्तव्ये : पार्श्वभूमी आणि इतिहास
- ३.२.२ मूलभूत कर्तव्ये व त्याचे महत्व यांचे विवेचन
- ३.२.३ मूलभूत कर्तव्यांची अंमलबजावणी
- ३.२.४ मुलभूत कर्तव्ये वरील टीका
- ३.२.५ मूलभूत कर्तव्ये व मूलभूत हक्क यांचे परस्पर संबंध

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.४ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके व इतर साधने

३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

- भारतीय संविधानातील मुलभूत कर्तव्यांची पार्श्वभूमी व इतिहासाची माहिती मिळेल
- भारतीय संविधानातील मूलभूत कर्तव्ये व त्याचे महत्व कळेल.
- भारतीय संविधानातील मुलभूत कर्तव्ये यांच्या अंमलबजावणीची स्थिती कळेल.
- भारतीय संविधानातील मूलभूत कर्तव्ये वरील टीका कळू शकेल.
- मुलभूत कर्तव्ये आणि मुलभूत अधिकारांशी संबंध आहे हे कळेल

३.१ प्रास्ताविक

भारताची प्राचीन काळापासून वैभवशाली परंपरा आहे. प्राचीन वैभवशाली परंपरा लाभलेल्या जगातील काही देशांपैकी भारत एक आहे. प्राचीन काळात व्यक्तीची ओळख ही ती व्यक्ती इतरांप्रति कर्तव्ये पार कसे पाडते यावर ठरत असे. भगवद्गीता आणि रामायणा,कुराण मध्ये देखील लोकांना त्यांची कर्तव्ये पार पाडण्यास सांगितले आहे. गीतेत भगवान श्रीकृष्णांनी म्हटले आहे की, कोणत्याही फळाची अपेक्षा न करता आपले कर्तव्य पार पडावे.

आपला भारत देश समृद्ध बनावा, संपन्न बनावा, सर्वांना न्याय देणारा बनावा आणि जगातील इतर देशांना त्याची दखल घ्यावी लागेल असा भारत बनावा यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकाने आपले दैनंदिन काम शिस्तीत, वेळेत आणि अधिक चांगल्या पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला पाहिजे हा या अनुच्छेदाचा अर्थ दिसतो. एका अर्थाने आपल्या देशावरील आपले प्रेम सिद्ध करण्याची ही कसोटी या अनुछेदाने दिली आहे असे दिसते. भारतीय नागरिक या नात्याने तुम्ही जर आपले दैनंदिन काम प्रामाणिकपणे, वेळेत आणि अधिक चांगल्या पद्धतीने करत असाल तर तुम्हाला तुमचे राष्ट्रप्रेम सिद्ध करण्यासाठी अन्य कुठल्याही गोष्टी करण्याची गरज नाही.स्वातंत्र्य चळवळीच्या दरम्यान देखील कर्तव्याबाबत बोलले जात होते. संविधान निर्मितीच्या काळात देखील कर्तव्ये संविधानात असावेत, असे मत काही संविधान सभेतील सदस्यांनी मांडले. त्यामुळे प्राचीन काळापासून आतापर्यंत कर्तव्यांना खूप महत्व आहे.

भारतीय संविधान हे भारतातील व्यक्ती आणि भारतातील राजकीय व्यवस्था यांचे नियमन करणारा कायदा आहे. भारतातील व्यक्तींसाठी सर्वात महत्वाचे नियम म्हणून मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये भारतीय संविधानात दिलेली आहेत. मूलभूत कर्तव्ये ही भारतीय संविधानाचा महत्वाचा भाग आहे. मूलभूत कर्तव्ये ही भारतीय नागरिकांची व्यवहार संहिता आहे, त्यामुळे आपण मूलभूत कर्तव्ये समजून घेणे गरजेचे आहे. भारतीय संविधान हे मानवी मूल्यांवर आधारित आहे. मूलभूत हक्क, राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये याच्या गाभ्याशी मानवी मूल्ये आहेत. उदाहरण :- स्वातंत्र्य हे मूल्ये समजून घेऊ लागलो की प्रत्येकाला आपले म्हणणे मांडण्याचा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आहे हे कळते, तसेच कोणी बोलताना आपल्याला ऐकून घेतले पाहिजे आणि त्याला बोलताना मधेच तोडता कामा नये हे आपले कर्तव्य आहे हे कळते. त्यामुळे मूल्यावरची आपली समज वाढवणे गरजेचे आहे. यावरून कळते की मूल्ये, अधिकार आणि कर्तव्ये यांचा एकमेकांशी परस्पर संबंध आहे.

३.२ मूलभूत कर्तव्ये विवेचन

मुलभूत कर्तव्ये हे भारतीय संविधानामध्ये भाग चार क मध्ये अनुच्छेद ५१ क मध्ये दिलेली आहेत. भारतीय संविधानात एकूण अकरा मूलभूत कर्तव्ये आहेत. १९७६ च्या ४२व्या संविधान दुरुस्ती द्वारे भारतीय संविधानामध्ये १० मूलभूत कर्तव्ये सामील केली होती. ८६ व्या संविधान दुरूस्ती २००२ द्वारे ११ वे कर्तव्य भारतीय संविधानात समाविष्ट करण्यात आले. संविधानाच्या निर्मितीच्यावेळी कर्तव्यांवर चर्चा केली गेली, परंतु त्यांना संविधानात सामील केले गेले नाही. त्यामुळे मूलभूत कर्तव्ये याचा इतिहास आणि पार्श्वभूमी समजून घेणे खूप गरजेचे आहे.

३.२.१ मूलभूत कर्तव्यांची पार्श्वभूमी आणि इतिहास

प्राचीन ग्रंथांनुसार, भारतीय सभ्यतेने सुरुवातीपासूनच व्यक्तीच्या कर्तव्यावर जोरदार लक्ष केंद्रित केले आहे. विविध धर्म ग्रंथामध्ये देखील कर्तव्याला महत्व आहे. पूर्वीच्या सोव्हिएत युनियनच्या राज्यघटनेनुसार अधिकार आणि कर्तव्ये समान मानली गेली आहेत. महात्मा गांधींच्या मते कर्तव्याची कामगिरीच आपल्याला आपला हक्क मिळवून देते. अधिकारांना कर्तव्यापासून दूर करता येणार नाही. महात्मा गांधीनी असे म्हटले होते की, "सत्याग्रहाचा जन्म झाला, कारण माझे कर्तव्य काय आहे हे ठरविण्यासाठी मी नेहमीच प्रयत्नशील होतो" त्यामुळे इतिहासात देखील कर्तव्यांना महत्व होते तसेच सध्याच्या काळात देखील कर्तव्यांना महत्व आहे.

भारतीय संविधान हे संविधान सभेमध्ये तयार करण्यात आले. त्यावेळी मूलभूत कर्तव्यांबाबत चर्चा झाली परंतु मुलभूत कर्तव्ये यांचा संविधानात समवेश झाला नाही. त्यानंतर १९७६ मध्ये ४२ व्या घटना दुरुस्ती नुसार मूलभूत कर्तव्ये ही भारतीय संविधानात अंतर्भूत करण्यात आली.

- **संविधान सभेचे सदस्य :** संविधान सभेमध्ये संविधानावर चर्चा करताना काही संविधान सभेतील सदस्यांनी कर्तव्यांबाबत आपले मत मांडले होते. संविधान सभेचे सदस्य नामवंत वकील, अर्थतज्ञ, समाज शास्त्रज्ञ, प्राध्यापक श्री. कुशल तलक्शी शाह (के टी शाह) यांनी मूलभूत कर्तव्यांबाबत आपले विचार संविधान सभेत मांडले होते. तसेच पश्चिम बंगालचे प्रतिनिधी संविधान सभेचे सदस्य प्रभू दयाल हीमतसिंगका ह्यांनी देखील संविधान सभेत मूलभूत कर्तव्यांबाबत सूचना मांडली होती. १८ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधानाच्या मसुद्यावर चर्चा करताना संविधान सभेचे सदस्य प्रभू दयाल हीमतसिंगका म्हणाले की *"मूलभूत हक्कांसह काही मूलभूत कर्तव्येही असायला पाहिजे अशी माझी इच्छा आहे. जर आपण आपल्या हक्कांपेक्षा आपल्या कर्तव्यांचा अधिक विचार केला, तर आपल्या बऱ्याच अडचणी संपतील आणि हक्क स्वतःची काळजी घेतील आणि त्या हक्कांच्या अभावी कोणतीही अडचण जोगावण्या कोणताही प्रसंग येणार नाही".* असेच म्हणणे संविधान सभेचे सदस्य क्रिशन चंदर शर्मा, ठाकूर दास भार्गव, अरुण चंद्रा गुहा, नंद किशोर दास, दुर्गाबाई देशमुख, हर गोविंद पंत, बी पट्टाभी सीतारामय्या, शिब्बन लाल सक्सेना, हृदय नाथ कुंझरू, काका भगवंत रॉय, यांनी देखील असे मांडले होते.
- **जागतिक प्रभाव :** जगभरातील काही देशांनी मूलभूत कर्तव्यायांना देशाच्या संविधानात मोलाचे स्थान दिले आहे. जपानच्या संविधानामध्ये मूलभूत कर्तव्यांची यादी दिलेली आहे. तसेच भारतीय संविधानातील मूलभूत कर्तव्येयांच्यावर सोव्हियत रशियाच्या संविधानाचा आणि जागतिक मानवी हक्काचा जाहीरनामा व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करार ह्यांचा प्रभाव दिसून येतो.
- **सरदार स्वर्ण सिंह समिती :** मूलभूत कर्तव्ये संविधानात असली पाहिजेत याची मागणी सरदार स्वर्ण सिंह समितीने केली. आणीबाणीच्या काळात माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी त्यावेळचे संरक्षण मंत्री सरदार स्वर्ण सिंह यांच्या नेतृत्वाखाली सरदार स्वर्ण सिंह समिती गठीत केली. संविधानामध्ये कोणकोणते बदल केले गेले पाहिजे याच्या सूचना देणे हा ह्या समितीचा उद्देश होता. या समितीच्या अहवालामध्ये मूलभूत कर्तव्ये संविधानात असली पाहिजेत असे म्हटले होते. त्यानुसार आणीबाणीच्या काळात ४२ व्या घटना दुरुस्तीद्वारे संविधानामध्ये मूलभूत कर्तव्ये समाविष्ट करण्यात आली. आणीबाणीचा काळ राजकीयदृष्ट्या वादग्रस्त होता. आणीबाणीनंतर जे नवे सरकार आले, त्याने ४२व्या घटना दुरुस्तीचे बहुतेक सर्व तपशील रद्दबातल केले; पण जे काही बदल कायम ठेवले त्यापैकी एक म्हणजे मूलभूत कर्तव्ये. त्यामुळे या वादग्रस्त राजकीय इतिहासातून अधिकार आणि कर्तव्ये यांची सांगड घालणाऱ्या युक्तिवादाला संविधानात स्थान मिळाले. सरदार स्वर्ण सिंह समिती मध्ये सरदार स्वर्ण सिंह, रजनी पटेल, सी. एम. स्टीफन, वी. ए. सैयद मुहम्मद, डी. पी. सिंह, ए. आर. अंतुले, वसंत साठे, वी. एन. गाडगीळ, दिनेश गोस्वामी, एच. आर. गोखले, बी. एन. बानर्जी आणि सिद्धार्थ शंकर रे हे सदस्य होते
- सरदार स्वर्ण सिंह समितीच्या शिफारशींवरून मुलभूत कर्तव्यांचा स्वीकार केला गेला. स्वर्ण सिंह समितीने शिफारस केलेल्या पण घटनेत न स्वीकारलेल्या देखील काही सूचना होत्या. त्या पुढील प्रमाणे

१. जर कोणी मूलभूत कर्तव्यांचे पालन करण्यास नकार दिला तर संसद आर्थिक दंड किंवा शिक्षेची तरतूद करू शकते.
२. कर भरणे नागरिकांचे मूलभूत कर्तव्य असले पाहिजे.

पण काही कारणास्तव सदर शिफारस केलेली मुलभूत कर्तव्ये संविधानात अंतर्भूत केली नाहीत. तसेच मूलभूत कर्तव्यासाठी संविधानामध्ये वेगळा भाग असावा अशी शिफारस सदर समितीने केली होती. त्यानुसार भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ५१ (क) भाग चार (क) मध्ये नागरिकांची मूलभूत कर्तव्ये नमूद केलेली आहे.

३.२.२ मुलभूत कर्तव्ये आणि त्यांचे महत्व

मूलभूत कर्तव्ये ही भारतीय नागरिकांची आचार संहिता किंवा जीवन संहिता आहे. 'भारताच्या विकासात आणि प्रगतीत योगदान देणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे', असे निरीक्षण स्वामी विवेकानंद यांनी नोंदवले आहे. १९७६ रोजी भारतीय संविधानामध्ये १० मूलभूत कर्तव्ये समाविष्ट केली होती. ८६ व्या घटना दुरुस्तीने २००२ साली ११ वे कर्तव्य भारतीय संविधानात समाविष्ट करण्यात आले. काही कर्तव्ये ही नैतिक तर काही कर्तव्ये ही नागरी स्वरुपाची आहेत. भारतात मूलभूत कर्तव्ये ही ३ जानेवारी पासून लागू करण्यात आली म्हणून भारतात ३ जानेवारी हा नागरिकांची मूलभूत कर्तव्ये दिन म्हणून पाळला जातो. भारतीय संविधानाच्या भाग चार-क मध्ये अनुच्छेद ५१ क मध्ये मूलभूत कर्तव्ये दिली आहेत. भारतीय संविधानात एकूण १० कर्तव्ये दिलेली आहेत.

- **मूलभूत कर्तव्ये**

(क) **संविधानाचे पालन करणे आणि संविधानात्मक आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत यांचा आदर करणे :** याचा अर्थ संविधानाचे पालन करणे, संविधान बाबतची समज नागरिकांमध्ये वाढवणे तसेच सांविधानिक संस्था आणि आदर्श यांच्याबाबत लोकामंध्ये जागृती तयार करणे हा आहे. तसेच देशाचे प्रतीक म्हणून राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करून नागरिकांच्या मनात राष्ट्रप्रेम वाढविण्याचा प्रयत्न या मूलभूत कर्तव्यातून केला आहे.

(ख) **ज्यांच्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे :** या मुलभूत कर्तव्याचा उद्देश हा स्वातंत्र्य लढा सर्वाना माहिती असावा आणि त्याप्रति सर्व जागरूक असावे हा आहे. स्वातंत्र्य लढ्यात स्वातंत्र्याची चळवळ आणि सामाजिक सुधारणांची चळवळ याबाबत माहिती असणे आणि त्यातून निर्माण झालेले आदर्श यांची जोपासना केली पाहिजे. या लढ्यातून विविध आदर्श तयार झाले आहे त्याप्रति ऋणी राहणे गरजेचे आहे.

(ग) **भारताची सार्वभौमत्व, एकता व एकात्मता उन्नत ठेवणे व त्यांचे संरक्षण करणे :** भारताची सार्वभौमता, एकता आणि एकात्मता टिकून राहिली पाहिजे हा उद्देश या मूलभूत कर्तव्याचा आहे. यातून व्यक्तींनी भारतातील विविधतेचा आदर ठेवला पाहिजे. विविधतेत एकता हे भारताचे वैशिष्ट्य आहे. त्यासाठी विविधतेचा आदर करून व विषमता कमी करून एकता व एकात्मता जोपासली पाहिजे.

(घ) **देशाचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे :** याचा उद्देश देशाप्रति प्रेम वाढवून गरज पडेल तेव्हा देशप्रेम दाखविण्यासाठी पुढे येणे हा आहे. देशात विविध नैसर्गिक किंवा मानवनिर्मित संकटे येत असतात त्यावेळी नागरिकांनी एकत्रितपणे पुढे येवून संकटाचा सामना करणे ह्या कर्तव्याने होऊ शकते.

(ड) **धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीस लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे :** या मूलभूत कर्तव्याचा उद्देश हा धर्म, भाषा, प्रदेश किंवा वर्ग इत्यादींच्या भेद, अडथळ्यांच्या पलीकडे जाऊन सद्भावना आणि बंधुत्वाच्या भावनेला चालना देण्याचा प्रयत्न करणे हा आहे. तसेच लिंग आधारित विषमतेच्या बळी ह्या स्त्रिया असतात. धर्म, जात, समाज आधारित रूढी परंपरेच्या जोखडात स्त्रिया अडकल्या आहेत. ज्या रूढी, परंपरा किंवा प्रथामुळे स्त्रियांची प्रतिष्ठा धोक्यात येते अश्या रूढी, परंपरा किंवा प्रथा यांचा त्याग करणे हे नागरिकांचे कर्तव्य आहे.

(च) **आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृध्द वारशाचे मोल जाणून तो जतन करणे :** भारताची संस्कृती संमिश्र आहे "वसुधैव कुटुंबकम" हा प्राचीन संस्कृतीचा विचार आहे. परंतु लिंग, जात, धर्म, वर्ग, प्रदेश विषमतावादी वातावरणामुळे सध्या भारतीय समाजात असहिष्णुता, मॉब लिंचिंग इत्यादी प्रकरणे वाढत असल्याचे दिसून

येत आहे. यावर उपाय म्हणजे आपल्या संमिश्र संस्कृतीचा वारसा जपला पाहिजे. वर्चस्ववादी विचार नाकारला पाहिजे. सर्वांनी एकमेकांशी प्रेमाने, करुणेने बंधुतेने वागले पाहिजे.

(छ) **वने, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे आणि प्राणीमात्रांबद्दल दयाबुद्धी बाळगणे :** या कर्तव्यामध्ये पर्यावरण रक्षणाचा उद्देश दिसून येतो. यामध्ये वने, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यांचे रक्षण झाले पाहिजे हा हेतू आहे. निसर्गचक्र हे व्यवस्थित चालले पाहिजे म्हणून प्रत्येक निसर्गातील जीव जपला गेला पाहिजे. यासाठी प्राणिमात्रांबद्दल दयाभाव दाखवणे गरजेचे आहे. वृक्ष तोड आणि जंगल तोडमुळे वने कमी होत आहेत. वायू आणि जल प्रदूषणामुळे निसर्गाची हानी होत आहे याचे परिणाम म्हणून हवामान बदलाचे गंभीर प्रभाव दिसत आहेत.

(ज) **विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे :** या कर्तव्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद, शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे हे अभिप्रेत आहे. याची अंमलबजावणी म्हणून शाळेत वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा यासाठी विविध कार्यक्रम घेतले जातात. लहान मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद, शोधकबुद्धी व सुधारणावाद याचा विकास होणे हे संवेदनशील नागरिक बनण्यासाठी गरजेचे आहे.

(झ) **सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपुर्वक त्याग करणे :** नागरिकाच्यामध्ये राष्ट्रप्रेम जागृत होऊन सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होणार नाही, हिंसाचार होणार नाही यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे. भारतात आंदोलनाची परंपरा आहे. परंतु कधी कधी ह्या आंदोलन, निदर्शन विरोध यामध्ये हिंसा होवून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होते. प्रत्येक नागरिकांनी हिंसाचाराचा त्याग करून सार्वजनिक मालमत्तेचं रक्षण करणे अपेक्षित आहे.

( ) **राष्ट्र सतत, उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशा प्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे :** या कर्तव्याद्वारे नागरिकांचा, समाजाचा पर्यायाने देशाचा विकास होईल हा उद्देश आहे. नागरिकांच्या प्रत्येक कृत्यामध्ये देशाचा, समाजाचा आणि व्यक्तिगत विकासाचा विचार असणे गरजेचे आहे. यातूनच देशाचा आणि नागरिकांचा विकास होवू शकतो. आपला भारत देश समृद्ध बनावा, संपन्न बनावा, सर्वांना न्याय देणारा बनावा आणि जगातील इतर देशांना त्याची दखल घ्यावी लागेल असा भारत बनावा यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकाने आपले दैनंदिन काम शिस्तीत, वेळेत आणि अधिक चांगल्या पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला पाहिजे हा या अनुच्छेदाचा अर्थ दिसतो. एका अर्थाने आपल्या देशावरील आपले प्रेम सिद्ध करण्याची ही कसोटी या अनुछेदाने दिली आहे असे दिसते. भारतीय नागरिक या नात्याने तुम्ही जर आपले दैनंदिन काम प्रामाणिकपणे, वेळेत आणि अधिक चांगल्या पद्धतीने करत असाल तर तुम्हाला तुमचे राष्ट्रप्रेम सिद्ध करण्यासाठी अन्य कुठल्याही गोष्टी करण्याची गरज नाही.

(ट) **माता पित्याने किंवा पालकाने सहा ते चौदा वर्षादरम्यानचे आपले अपत्य किंवा, यथास्थिती, पाल्य याला शिक्षणाच्या संधी देणे :** हे मूलभूत कर्तव्य 86 व्या घटनादुरुस्तीने 2002 मध्ये समाविष्ट करण्यात आले. या कर्तव्याचा संबंध हा मूलभूत हक्कातील अनुच्छेद २१ क शी आहे. सहा ते चौदा वर्षातील मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळाले पाहिजे हा शिक्षणाचा हक्क आहे. परंतु हा हक्क पालकांच्या कर्तव्यावर अधिक अवलंबून आहे. सहा ते चौदा वर्षाच्या अपत्याचा पालकांनी त्यांच्या मुलांना शिक्षणाची संधी खुली केलीतरच शिक्षणाच्या हक्काची कठोर अंमलबजावणी होईल. त्यामुळे हे कर्तव्य शिक्षणाच्या हक्काशी संबंधित आणि अंमलबजावणी योग्य आहे.

मूलभूत कर्तव्ये ही आपल्याला देशाप्रति जबाबदारीची जाणीव करून देतात. मुलभूत कर्तव्ये ही फक्त नागरिकांसाठी लागू आहेत. काही मूलभूत कर्तव्ये ही अपुरी, अस्पष्ट आणि संदिग्ध आहेत. मूलभूत कर्तव्ये

नागरिकांकडून अपेक्षा दर्शवतात. त्यामुळे नागरिक हे राष्ट्र निर्मितीच्या प्रक्रियेत सह हिस्सेदार आहेत ह्याची जाणीव करून देतात. परंतु ह्याची कठोर अंमलबजावणी शासनाकडून झालेली नाही. काही प्रमाणात शासन जागरूकतेचे कार्यक्रम घेते परंतु त्यात देखील निरंतरता नाही. मूलभूत कर्तव्ये ही न्यायालयाद्वारे अंबलबजावणी योग्य नसली तरी संसद त्यावर कायदे करू शकते. उदाहरणार्थ – सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे हे भारतीय संविधानातील मूलभूत कर्तव्य आहे त्या संदर्भात सार्वजनिक मालमत्ता नुकसान विरोधी कायदा १९८४ अस्तित्वात आहे. अश्या प्रकारे बहुंतांश मूलभूत कर्तव्यांबाबत विविध कायदे अस्तित्वात आहेत. त्यामुळे काही मूलभूत कर्तव्यांचे पालन झाले नाही तर त्या विरोधात न्यायालयात जाता येत नसले तरी कायद्याद्वारे संबंधित मूलभूत कर्तव्याचे पालन करणे अनिवार्य झाले आहे.

भारतीय संविधान आणि नागरिकांची मूलभूत कर्तव्य याकडे आणखी एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहता येते. अनुच्छेद 51 क नागरिकांच्या काही कर्तव्यांची माहिती देतो मात्र संविधानातील इतरही अनेक अनुच्छेदांमध्ये नागरिकांची कर्तव्य निहीत आहेत. उदाहरणार्थ, अनुच्छेद 39 (4) नुसार स्त्री आणि पुरुषांना समान कामासाठी समान वेतन मिळावे ही अपेक्षा व्यक्त झालेली आहे. आता हा अनुच्छेद वीट भट्टीवर काम करणाऱ्या महिलेसाठी अधिकार देणारा आहे मात्र त्याच बरोबर वीट भट्टीच्या मालकासाठी मात्र हा अनुच्छेद कर्तव्याची जाणीव करून देणारा आहे. आणखी एक उदाहरण घेता येईल. अनुच्छेद 25 एका बाजूला नागरिकांना आपल्या पसंतीप्रमाणे धर्म स्वातंत्र्य बहाल करतो पण त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला अन्य नागरिकांच्या आपल्यापेक्षा वेगळ्या श्रद्धेचा आदर करण्याचे कर्तव्य सुद्धा अधोरेखित करतो. या दृष्टिकोनातून विचार करता संविधानातील अनेक अनुच्छेद नागरिकांना काही अधिकार बहाल करत असतानाच नागरिकांच्या कडून काही कर्तव्यांची अपेक्षा करतात.

- **मुलभूत कर्तव्यांचे महत्व :** भारतीय संविधानातील मूलभूत कर्तव्यांचे महत्त्व नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना, देशभक्ती आणि सामाजिक एकसंधता निर्माण करण्याच्या त्यांच्या भूमिकेत आहे. भारतीय संविधानातील मूलभूत कर्तव्ये यांना विशेष महत्व आहे. जगातील विविध देशांनी कर्तव्यांना अधिक महत्व दिलेले आहे. सिंगापूर, अमेरिकेसारख्या देशांनी कर्तव्यांची अंमलबजावणी करणारी यंत्रांना उभी केली आहे. त्याचा परिणाम म्हणून सिंगापूर येथे, तेथील नागरिकांकडून कर्तव्यांचा अविरत पाठपुरावा करण्यावर भर देण्यात आला आहे त्यामुळे सिंगापूरचे रूपांतर कमी विकसित देशातून अल्पावधीतच अत्यंत विकसित राष्ट्रात झाले आहे. सर्वोच्च न्यायालय यांनी बिजो इमॅन्युएल विरुद्ध केरळ राज्य (1986), एम सी मेहता वि युनियन ऑफ इंडिया (१९८८), एम्स स्टुडंट्स युनियन विरुद्ध एम्स (२००१), अरूणा रॉय विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (२००२) आणि रंगनाथ मिश्रा विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (2003) या खटल्यांमध्ये मूलभूत हक्कांचे महत्व अधोरेखित केले आहे. मुलभूत कर्तव्यांचे महत्त्व अधोरेखित करणारे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत:
- **नैतिक मूल्यांचा समावेश :** मूलभूत कर्तव्यांचा आधार मानवतेची मूल्ये व संविधानाच्या प्रस्तावनेतील मूल्ये आहेत. त्यामुळे ही कर्तव्ये प्रामाणिकपणा, बंधुभाव आणि इतरांबद्दल आदर वाढवून नागरिकांमध्ये नैतिक मूल्ये जोपासण्यास प्रोत्साहित करतात. या नैतिक मूल्यांच्या आधारे भारतातील एकता आणि एकात्मता जोपासली जात आहे.
- **मूलभूत अधिकारांना पूरक:** मूलभूत अधिकार व्यक्तींना सक्षम करतात, तर मूलभूत कर्तव्ये ही नागरिकांना नैतिक बनवितात. नैतिक व्यक्ती इतरांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करू शकते. तसेच नैतिक व्यक्ती इतरांच्या मूलभूत हक्कांना तडा देत नाही. मूलभूत हक्क व नागरिकांच्या जबाबदाऱ्या यांचा समतोल साधणे महत्वाचे आहे. मूलभूत कर्तव्ये संविधानात दिलेल्या मूलभूत अधिकारांना पूरक आहेत. मूलभूत अधिकार नागरिकांना हक्क प्रदान करतात, तर मूलभूत कर्तव्ये त्यांना समाज आणि राष्ट्राप्रति असलेल्या त्यांच्या परस्पर जबाबदाऱ्यांची आठवण करून देतात. भारतीय संविधान हे नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये यांचा समतोल राखते.

- **न्यायपालिकेला मदत :** एखाद्या कायद्याची घटनात्मकता ठरवताना सर्वोच्च न्यायालय मूलभूत कर्तव्यांचा विचार करते. एखाद्या कायद्याची घटनात्मक वैधता तपासण्यात आणि निर्धारित करण्यात मूलभूत कर्तव्ये न्यायपालिकेला मदत करतात. मूलभूत कर्तव्ये यांची माहिती लोकांपर्यंत पोहचावी यासाठी शासनाने १९९८ मध्ये न्यायमूर्ती जे. एस. वर्मा समितीची स्थापना केली. १९९९ मध्ये या समितीचा अहवाल आला. यामध्ये शैक्षणिक संस्थांमध्ये मूलभूत कर्तव्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्याची शिफारस करण्यात आली. तसेच निवडणुकीत मतदान करणे आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे हे कर्तव्य मूलभूत कर्तव्य म्हणून समाविष्ट केले पाहिजे अशी सूचना मांडण्यात आली. २००३ सालच्या श्री रंगनाथ मिश्रा विरुद्ध भारत संघ या याचिकेमध्ये सर्वोच्च न्यायालयाने या समितीच्या अहवालानुसार शासनाने पावले उचलली पाहिजेत असे निर्देश दिले आणि शासनाला अंमलबजावणी करण्यास सांगितले. यामुळे न्यायालय मूलभूत कर्तव्यांच्या अंमलबजावणीसाठी देखील प्रयत्न करत असते.
- **राष्ट्रवादाची भावना वाढविते :** मूलभूत कर्तव्ये संविधानाच्या आदर्शांचा आदर करण्याच्या आणि वैयक्तिक हिताच्या पलीकडे देशाच्या कल्याणासाठी सामायिक वचनबद्धतेला प्रोत्साहन देण्याच्या महत्त्वावर भर देतात. तसेच ही कर्तव्ये राष्ट्र आणि समाजाप्रति नागरिकांमध्ये नागरी चेतना आणि जबाबदारीची भावना निर्माण करतात. मूलभूत कर्तव्यांमुळे राष्ट्राप्रती प्रेम जागृत होते व आदरभाव तयार होतो.
- **सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक हित :** भारतीय संविधानातील काही मूलभूत कर्तव्ये ही भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची जपणूक करताना शिक्षण, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि वैज्ञानिक ज्ञानाच्या विकासाच्या महत्त्वावर भर देतात. तसेच काही मूलभूत कर्तव्ये नागरिकांना सामाजिक एकसंधता आणि सर्वसमावेशकता वाढवून सामंजस्य आणि समान बंधुत्वाच्या भावनेला प्रोत्साहन देण्यासाठी प्रोत्साहित करतात. मूलभूत कर्तव्य समाजाच्या सुधारणेसाठी कायदे आणि धोरणे तयार करण्यासाठी कायदे आणि धोरणकर्त्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे म्हणून काम करतात. मूलभूत कर्तव्ये समाजातील एकोपा आणि बंधुभाव वाढीस कारणीभूत ठरतात. मूलभूत कर्तव्ये ही नागरिकांमध्ये अशी भावना निर्माण करतात की ते केवळ प्रेक्षक नसून राष्ट्रीय उद्दिष्टांच्या पूर्ततेमध्ये सक्रिय सहभागी आहेत. कर्तव्ये नागरी सहभाग आणि जबाबदार नागरिकत्वाद्वारे लोकशाहीच्या तत्त्वांना बळकटी देतात. थोडक्यात, मुलभूत कर्तव्ये ही केवळ जबाबदाऱ्यांचा संच नाही, तो समृद्ध लोकशाहीचा कणा आहे, नागरिक देशाच्या प्रगतीमध्ये सक्रीय सहभागी आहेत आणि केवळ त्यांच्या हक्कांचा निष्क्रिय लाभार्थी नाहीत, हे ती सिदध करतात.

३.२.३ मूलभूत कर्तव्यांची अंमलबजावणी

मूलभूत कर्तव्यांची अंमलबजावणी पाहताना मूलभूत अधिकार भाग III, राज्याचे नीती मार्गदर्शक तत्त्वे भाग IV आणि मूलभूत कर्तव्ये भाग IVक असे एकत्रितपणे वाचणे आवश्यक आहे. मूलभूत अधिकार, राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे आणि मूलभूत कर्तव्ये असे एकत्रितपणे "सर्वांसाठी सर्व मानवी हक्क" सुनिश्चित करू शकतात. तसेच कायद्याचा केवळ अर्थच नाही तर त्याची घटनात्मकता देखील ठरवताना, मूलभूत अधिकार, राज्याचा नीती मार्गदर्शक तत्त्वे यांच्या बरोबरीने मूलभूत कर्तव्ये महत्त्वपूर्ण आहेत, कारण त्याच्याशी सुसंगत कोणताही कायदा त्याची घटनात्मक वैधता कायम ठेवण्यासाठी वाजवी मानला जातो. पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन, पर्यावरणशास्त्र आणि जंगले, वन्यजीव, वनस्पती आणि प्राणी इत्यादींचा ऱ्हास रोखण्याशी संबंधित अनेक प्रकरणांमध्ये ही मूलभूत कर्तव्ये विचारात घेतली आहेत. पर्यावरणाचे रक्षण आणि पर्यावरणीय समतोल राखणे ही केवळ सरकारचीच नव्हे तर प्रत्येक नागरिकाची मूलभूत कर्तव्ये असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. न्यायालयाने विविध खटल्यांमध्ये मूलभूत कर्तव्यांबाबत मते नोंदविली आहेत हे मूलभूत कर्तव्यांच्या अंमलबाजवणीला चालना देणे आहे.

- **मूलभूत कर्तव्यांची अंमलबजावणीक्षमता :** संविधानाच्या अनुच्छेद ५१ क मध्ये अंतर्भूत केलेली मूलभूत कर्तव्ये ही नागरिकांसाठी केवळ स्मरणपत्रे आहेत. ज्यांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी कोणतीही अंमलबजावणीक्षम यंत्रांना नाही. जिथे कायदा आहे तेथील संबंधित मूलभूत कर्तव्ये पालन करणे बंधनकारक ठरते. परंतु सध्याचे कायदेही योग्य अंमलबजावणीच्या अभावी कुचकामी आहेत. त्यामुळे गरज म्हणजे कायद्याची विश्वासू आणि प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. प्रभावी कायद्याची तातडीची गरज असलेली अनेक क्षेत्रे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने आपल्या काही निर्णयांमध्ये सांगितली आहेत. "देशातील नागरिकांना मूलभूत कर्तव्ये शिकवण्यासाठीच्या सूचना कार्यान्वित करणे" ही सर्वात महत्त्वाची गरज सर्वोच्च न्यायालयाने दर्शवली आहे.
- **कायदेशीर तरतुदी :** मूलभूत कर्तव्यांचे पालन हे कायदेशीर तरतुदी करून आणि मूलभूत कर्तव्यांची नीतिमूल्ये बिंबवून होऊ शकते. मूलभूत कर्तव्यांसंबंधात शासनाचे काही कायदे आहेत.

i. राष्ट्रध्वज, भारतीय राज्यघटना आणि राष्ट्रगीताचा अनादर होणार नाही याची खात्री करण्यासाठी, राष्ट्रीय सन्मानाचा अपमान प्रतिबंधक कायदा १९७१ लागू करण्यात आला आहे.

ii. राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीताचा अयोग्य वापर रोखण्यासाठी स्वातंत्र्यानंतर लगेचच Emblems and Names (अयोग्य वापर प्रतिबंध) कायदा १९५० लागू करण्यात आला.

iii. राष्ट्रध्वजाच्या प्रदर्शनासंबंधीचा योग्य वापर चांगल्या प्रकारे समजला जावा यासाठी, या विषयावर वेळोवेळी जारी केलेल्या सूचना फ्लॅगकोड इंडियामध्ये मूर्त स्वरुपात देण्यात आल्या आहेत.

iv. धर्म, वंश, जन्मस्थान, निवासस्थान, भाषा इत्यादींच्या आधारावर लोकांच्या विविध गटांमध्ये शत्रुत्व निर्माण करणाऱ्या कृतींना पुरेशी शिक्षा मिळावी यासाठी विद्यमान फौजदारी कायद्यांमध्ये अनेक तरतुदी आहेत. भारतीय न्याय संहिता (IPC) च्या कलम १५३ अ अन्वये इतर समुदायातील सदस्यांमध्ये असुरक्षिततेची भावना किंवा दुर्भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने केलेले लेखन, भाषण, हावभाव, क्रियाकलाप, व्यायाम, कवायती इत्यादींवर बंदी घालण्यात आली आहे.

v. राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणारे आरोप आणि प्रतिपादन हे भारतीय न्याय संहिता (IPC) च्या कलम १५३ B नुसार दंडनीय गुन्हा आहे.

vi. बेकायदेशीर क्रियाकलाप (प्रतिबंध) कायदा १९६७ च्या तरतुदीनुसार जातीय संघटना बेकायदेशीर संघटना म्हणून घोषित केली जाऊ शकते.

vii. धर्माशी संबंधित गुन्हे भारतीय न्याय संहिता च्या कलम 295-298 मध्ये समाविष्ट आहेत.

viii. भेदभाव आणि अस्पृश्यता नाहीशी करण्यासाठी नागरी हक्क संरक्षण अधिनियम, 1955, ऍट्रॉसिटी कायदा आहे.

ix. लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ चे कलम १२३(३) आणि (३अ) धर्माच्या आधारावर मत मागणे आणि भारतातील विविध वर्गातील नागरिकांमध्ये शत्रुत्व किंवा द्वेषाच्या भावनांना प्रोत्साहन किंवा प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न बेकायदेशीर असल्याचे घोषित करते. लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम ८अ अन्वये भ्रष्ट व्यवहारात गुंतलेली व्यक्ती संसद सदस्य किंवा राज्य विधानमंडळ सदस्य होण्यासाठी अपात्र ठरू शकते.

- **न्यायमूर्ती जे.एस वर्मा समिती :** मूलभूत कर्तव्यांची माहिती लोकांपर्यंत पोहचावी यासाठी शासनाने १९९८ मध्ये न्यायमूर्ती जे. एस. वर्मा समितीची स्थापना केली. १९९९ मध्ये या समितीचा अहवाल आला. यामध्ये शैक्षणिक संस्थांमध्ये मूलभूत कर्तव्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्याची शिफारस करण्यात आली. निवडणुकीत मतदान करणे आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे हे कर्तव्य मूलभूत कर्तव्य म्हणून समाविष्ट केले पाहिजे अशी सूचना मांडण्यात आली. २००३ सालच्या श्री रंगनाथ मिश्रा विरुद्ध भारत संघ या

याचिकेमध्ये सर्वोच्च न्यायालयाने या समितीच्या अहवालानुसार शासनाने पावले उचलली पाहिजेत असे निर्देश दिले आणि शासनाला अंमलबजावणी करण्यास सांगितले.

अनुच्छेद 51क मधील काही कर्तव्यांच्या अंमलबजावणीसाठी अनेक न्यायालयीन निर्णय उपलब्ध आहेत. शिक्षण व्यवस्थेने शिक्षणाच्या सुरुवातीच्या वर्षापासून ते उच्च आणि व्यावसायिक स्तरापर्यंत योग्य आणि दर्जाबद्ध अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत. या प्रकरणात काहीही अंतिम नाही परंतु कलमांच्या अंतर्निहित मूल्यांशी संबंधित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सतत प्रयत्न करणे आवश्यक आहे. निरोगी राष्ट्राच्या वाढीसाठी आवश्यक असलेले चांगले आणि चांगले नागरिकत्व वर्तन प्रदर्शित करण्यासाठी प्रयत्नशील राहण्यासाठी प्रत्येक नागरिकाला सतत स्मरण करून देण्याची आवश्यकता असते. शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे,औपचारिक आणि माध्यमांच्या हस्तक्षेपांद्वारे या पैलूंचे पालनपोषण केले जाऊ शकते .

३.२.४ मूलभूत कर्तव्यांवरील टीका

मूलभूत कर्तव्यांचा समावेश नागरिकांना त्यांच्या जबाबदाऱ्यांची आठवण करून देण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल असताना, गेल्या काही वर्षांत त्यांच्यावर अनेक टीका करण्यात आल्या आहेत. मूलभूत कर्तव्यांवरील टीका पुढील प्रमाणे.

- **न्यायालयाचे संरक्षण :** मूलभूत अधिकारांना जसे न्यायालयाचे संरक्षण आहे तसे संरक्षण मूलभूत कर्तव्यांना नाही. त्यामुळे मूलभूत कर्तव्यांना कायदेशीर समर्थन नसते. याचा अर्थ असा की एखाद्या व्यक्तीने कर्तव्यांचे पालन केले नाही तर त्याच्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई केली जाऊ शकत नाही. यामुळे मूलभूत कर्तव्यांच्या परिणामकारकतेबद्दल प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे मूलभूत कर्तव्यांचे गांभीर्य निघून जाते. काही मुलभूत कर्तव्ये ही लागू करणे कठीण आहे, त्यांचा अर्थ अनेक प्रकारे लावला जाऊ शकतो त्यामुळे देखील मूलभूत कर्तव्यांना न्यायालयीन संरक्षण देणे कठीण आहे.
- **अपूर्ण कर्तव्ये यादी :** काही टीकाकारांचे असे म्हणणे आहे की मूलभूत कर्तव्यांची यादी संपूर्ण नाही कारण त्यात काही महत्वाच्या मूलभूत कर्तव्यांचा समावेश नाही. उदाहरणार्थ, कर भरणे, लोक प्रशासनात सक्रिय सहभाग नोंदविणे किंवा मताधिकार बजावणे यासारख्या कर्तव्यांचा उल्लेख नाही, जे लोकशाहीच्या कार्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. अशा अत्यावश्यक कर्तव्यांच्या अनुपस्थितीमुळे यादीची व्यापकता कमी होते. त्यामुळे मूलभूत कर्तव्ये ही अपुरी वाटत आहेत.
- **अस्पष्ट कर्तव्ये :** भारतीय संविधानातील मूलभूत कर्तव्यांपैकी काही कर्तव्ये, जसे की "वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करणे" किंवा "उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करणे", अस्पष्ट आणि स्पष्टीकरणासाठी खुले मानले जातात. या स्पष्टतेच्या अभावामुळे विविध अर्थ लावणे, समजून घेणे आणि त्यांचे पालन करणे आव्हानात्मक होऊ शकते. त्यामुळे काही तरतुदी ह्या अपूर्ण वाटतात.
- **पारंपरिक मूल्यांवर भर :** टीकाकारांचे असे म्हणणे आहे की मूलभूत कर्तव्ये ही पारंपरिक मूल्ये व पद्धतींवर जोर देतात, जी आधुनिक, प्रगतीशील विचारांशी जुळत नाहीत. उदाहरणार्थ, समृद्ध वारशाचे मूल्य आणि जतन करण्याचे कर्तव्य आधुनिकतेपेक्षा पारंपारिकतेवर भर म्हणून पाहिले जाऊ शकते. यामुळे काही मूलभूत कर्तव्ये कालबाह्य वाटत आहेत.
- **जागरुकतेची कमी :** मूलभूत कर्तव्ये ही भारतीय संविधानाचा एक महत्त्वाचा भाग असूनही, मूलभूत कर्तव्यांबद्दल सामान्य जनतेमध्ये जागरूकतेचा अभाव आहे. मूलभूत अधिकारांप्रमाणे मूलभूत कर्तव्यांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी किंवा त्यांना शिक्षित करण्यासाठी कोणतीही यंत्रणा नाही. यामुळे मूलभूत कर्तव्ये ही कमी प्रभावी ठरतात.

मूलभूत कर्तव्ये सादर करण्यामागील कल्पना उदात्त आणि चांगल्या हेतूने असली तरी, त्यांचे सध्याचे स्वरूप आणि अंमलबजावणी अभावामुळे टीका करण्यासाठी जागा उरली आहे आणि अधिक व्यापक आणि कृती करण्यायोग्य दृष्टिकोन आवश्यक आहे.

३.२.५ मूलभूत हक्क आणि मूलभूतकर्तव्ये यातील संबंध

मुलभूत हक्कांप्रमाणे मुलभूत कर्तव्ये ही महत्वाची आणि अत्यावश्यक आहेत. मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये परस्परसंबंधी असतात. प्रत्येक प्रकारच्या हक्काबरोबर काही कर्तव्यांचे पालन करणे अपरिहार्य असते. समाजात कर्तव्यांची जाणीव नसेल, तर हक्कांचाही उपभोग सर्व व्यक्तींना घेता येणार नाही. म्हणून हक्क व कर्तव्ये या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हटले जाते. हक्क हा समाजजीवनाचा एक भाग आहे. सामाजिक संदर्भाशिवाय हक्कांचा विचार करता येत नाही. इंदिरा गांधी यांच्या मते, मूलभूत कर्तव्यांचे नैतिक मूल्य हे मूलभूत अधिकारांना धक्का लावणे नव्हे, तर लोकांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देऊन लोकशाही समतोल प्रस्थापित करणे हे आहे.

नागरिकाला जसे हक्क प्राप्त होतात, तशी त्याची काही कर्तव्येही असतात. आपल्या हक्कांबाबत नागरिकांनी जसे जागरूक असले पाहिजे, तसेच आपल्या कर्तव्यांबाबतही असले पाहिजे. हक्क आणि कर्तव्ये परस्परांवर अवलंबून असतात. एकाचा हक्क हे दुसऱ्याचे कर्तव्य असते. आपले हक्क सुरक्षित राहावेत, अशी आपली अपेक्षा असते. त्याचप्रमाणे दुसऱ्यालाही त्याचे हक्क उपभोगता आले पाहिजेत याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. व्यक्ती आणि राज्य यांतील संबंधांबाबतही हेच म्हणता येईल. त्याचप्रमाणे राज्यासंबंधीची आपली कर्तव्येही प्रत्येकाने पार पाडली पाहिजेत. तरच शासनाचे कार्य सुरळीतपणे चालू शकेल, समाजात सुव्यवस्था निर्माण होईल आणि राज्याचा विकास होऊ शकेल.

व्यक्तीला जे हक्क प्राप्त होतात स्वाभाविकच व्यक्तीने समाजासंबंधीची आणि राज्यासंबंधीची आपली कर्तव्ये पार पाडणे आवश्यक असते. स्वत:च्या हक्कांचा उपभोग घेताना इतरांचे हक्क डावलले जाणार नाहीत, याची खबरदारी व्यक्तीने घेणे आवश्यक असून ते तिचे कर्तव्य असते. ज्या समाजाचा घटक म्हणून आपण वावरत असतो, त्या समाजाला हानिकारक ठरेल असे कृत्य आपल्याकडून होणार नाही याची काळजी प्रत्येक नागरिकाने घेतली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीकडून समाज विशिष्ट प्रकारच्या वर्तनाची अपेक्षा करतो. समाजाची ही अपेक्षा म्हणजेच व्यक्तीचे कर्तव्य होय. जी व्यक्ती आपल्या कर्तव्य पालनाबाबत दक्ष असते तिलाच हक्कांची मागणी करण्याचा नैतिक अधिकार प्राप्त होतो. केवळ हक्कांचा लाभ घेऊन कर्तव्यांकडे दुर्लक्ष केल्यास समाजाचे स्वास्थ धोक्यात येईल. जी गोष्ट व्यक्ती आणि समाज यांतील संबंधांबाबत खरी आहे, तीच व्यक्ती आणि राज्य यांतील संबंधांबाबतही खरी आहे. राज्याकडून नागरिकांच्या अनेक प्रकारच्या अपेक्षा असतात. कायदा आणि सुव्यवस्था राखणे, नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करणे, समाजाचा सर्वांगीण विकास साध्य करणे अशा अनेक जबाबदाऱ्या राज्याला पार पाडाव्या लागतात. अशी विविध कार्ये राज्याने योग्य प्रकारे पार पाडावीत, अशी अपेक्षा असेल, तर नागरिकांनी राज्यासंबंधीची आपली कर्तव्येही पार पाडलीच पाहिजेत.

मूलभूत हक्क हे संविधानाने दिलेले स्वातंत्र्य आहे जे नागरिकांकडून हिरावून घेतले जाऊ शकत नाही तर मुलभूत कर्तव्ये ही नागरिकांनी पार पाडण्यासाठी दिलेल्या कायदेशीर जबाबदाऱ्या आहेत. तसेच मुक्त व विकसित जीवनशैली प्राप्त करण्यासाठी मुलभूत हक्क आहेत तर मूलभूत कर्तव्ये ही राष्ट्रीय एकता व एकात्मतेसाठी आवश्यक आहेत. त्याप्रमाणे, मुलभूत हक्क यांना न्यायालयीन संरक्षण आहे तर मूलभूत कर्तव्ये ह्यांना न्यायालयाचे संरक्षण नाही. काही मूलभूत कर्तव्ये ही मूलभूत हक्क व राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे यांच्याची संबंधित आहेत. उदाहरणार्थ. मूलभूत कर्तव्यांमधील अनुच्छेद ५१क [ड] हे स्त्रियांच्या प्रतिष्ठेला, अपमानास्पद प्रथांना परावृत्त करणे हे

आहे ह्याचा संबंध मुलभूत हक्कांमधील समानतेच्या हक्काचे अनुच्छेद १४, १५ शी आहे. तसेच अनुच्छेद ५१क [झ] हे सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे आणि हिंसाचार टाळण्याचे मूलभूत कर्तव्य आहे ज्याचा संबंध मूलभूत हक्क मधील अनुच्छेद २१ जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या हक्काशी संबंधित आहे. त्याचप्रमाणे काही मूलभूत कर्तव्ये ही राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांशी संबंधित आहेत. उदाहरणार्थ, आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे जतन करण्याचे कर्तव्य अनुच्छेद ५१क [च] मध्ये दिलेले आहे जे अनुच्छेद ४६ अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंधांना प्रोत्साहन देणे या राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्वांच्या उद्दिष्टाशी संरेखित आहे. त्याचप्रमाणे, मुलभूत कर्तव्ये अनुच्छेद ५१क [छ] नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करण्याचे कर्तव्य सांगते व राज्य धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे अनुच्छेद ४८ क हे पर्यावरणाचे रक्षण आणि सुधारणा करण्याशी संबंधित आहे.

मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये हे संविधानाचे दोन्ही भाग अत्यंत महत्वाचे आहेत. मूलभूत हक्क हे मुलभूत कर्तव्यापेक्षा जास्त महत्वाचे आहेत असे म्हणणे चुकीचे आहे किंवा मूलभूत कर्तव्यांचे पालन केल्यावरच मूलभूत हक्क मागता येऊ शकतात किवा मिळू शकतात असे म्हणणे देखील चुकीचे आहे. याउलट मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत किंवा मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये ही दोन्ही नागरिकांच्या विकासासाठी महत्वाची आहेत.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न.

एका वाक्यात उत्तर लिहा.

१] भारतीय संविधानामध्ये मूलभूत कर्तव्ये कुठे समाविष्ट केलेली आहेत?

२] कोणत्या समितीच्या शिफारशींमुळे मुलभूत कर्तव्य संविधानामध्ये आली?

३] भारतात कोणत्या दिवशी मूलभूत कर्तव्ये दिन साजरा केला जातो ?

४] संविधानात किती मूलभूत कर्तव्ये आहेत ?

५] न्यायमूर्ती जे. एस. वर्मा समितीने कोणत्या शिफारसी केल्या आहेत?

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- संविधान दुरुस्ती : संविधानामध्ये कायदेशीर बदल करण्याची प्रक्रिया
- निग्रहपूर्वक : संकल्प करून, ठोस विचारपूर्वक
- उणेपणा : कमीपणा
- परावृत्त करणे: दूर करणे
- न्यायप्रविष्ट : न्यायालयात दाखल असलेले प्रकरण

३.४ स्वयं-अध्ययना प्रश्नांची उत्तरे

१] भाग चार क, अनुच्छेद ५१ क २] सरदार स्वर्ण सिंह समिती ३] ३ जानेवारी

४] ११ ५] निवडणुकीत मतदान करणे आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे

३.५ सारांश

मूलभूत कर्तव्ये या घटकामधून आपण मूलभूत कर्त्तव्यांबाबत माहिती घेतलेली आहे. मूलभूत कर्तव्ये हा भारतीय संविधानातील महत्वाचा भाग आहे. संविधान तयार झाले तेव्हा मूलभूत कर्तव्ये नव्हती तर सन १९७६ च्या ४२ व्या संविधान दुरुस्ती याचा समावेश संविधानात झाला. आजच्या घडीला ११ मूलभूत कर्तव्ये भारताच्या संविधानात आहेत. मूलभूत कर्तव्ये ही नैतिक मूल्ये असून नागरिकांमध्ये शिस्त व जबाबदारीच्या वर्तणुकीस प्रोत्साहन देण्यासाठी मूलभूत कर्तव्ये महत्वाची आहेत. मूलभूत कर्तव्यांची अंमलबजावणी व्हावी असा प्रयत्न शासनाने विविध कायदे करून केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने देखील विविध खटल्यांमार्फत मूलभूत अधिकाराचे महत्व अधोरेखित करून शासनाला मूलभूत कर्तव्यांची अंमलबजावणी करण्यास सांगितले आहे. संविधान सभेच्या सदस्यांनी संविधान सभेमध्ये मूलभूत कर्तव्ये असली पाहिजेत यावर चर्चा घडवून आणली होती. तसेच जगभरातल्या विविध देशाच्या संविधानामध्ये कर्तव्यांचा समावेश आहे. १९७६ च्या सरदार स्वर्ण सिंह समितीच्या शिफारसीनंतर संविधानामध्ये मुलभूत कर्तव्ये समविष्ट करण्यात आली. मुलभूत कर्तव्ये ही मुलभूत हक्काशी पूरक आहेत. मुलभूत कर्तव्ये ही न्यायालयाद्वारे अंमलबजावणी योग्य नसली तरी एखाद्या कायद्याची घटनात्मक वैधता तपासण्यात आणि निर्धारित करण्यात मूलभूत कर्तव्ये न्यालयपालिकेला मदत करतात. नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत करण्याचे काम मूलभूत कर्तव्ये करतात. परंतु मूलभूत कर्तव्ये ही काही प्रमाणात अपूर्णव अस्पष्ट वाटतात. सरकार कडून मूलभूत कर्तव्यांबाबत अंमलबजावणी नीट होत नसल्याने कर्तव्यांबाबत नागरिकांना गांभीर्य नाही. परंतु मूलभूत हक्क हे मूलभूत कर्तव्यांपेक्षा जास्त महत्वाचे आहेत असे म्हणणे चुकीचे आहे किंवा मूलभूत कर्तव्यांचे पालन केल्यावरच मूलभूत हक्क मागता येऊ शकतात किवा मिळू शकतात असे म्हणणे देखील चुकीचे आहे. याउलट मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत किंवा मूलभूत हक्क आणि मूलभूत कर्तव्ये ही दोन्ही नागरिकांच्या विकासासाठी महत्वाची आहेत.

३.६ सरावासाठी स्वाध्याय

खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा

१] मुलभूत कर्तव्यांची पार्श्वभूमी व इतिहास लिहा

२] संविधानातील मूलभूत कर्तव्ये आणि त्यांचे महत्व लिहा

३] मूलभूत कर्तव्ये व मूलभूत हक्क यांच्यातील परस्पर संबंध लिहा

४] टीपा लिहा : i] मूलभूत कर्तव्यांची अंमलबजावणी

ii] मूलभूत कर्तव्यांवरील टीका

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१] चौधरी रा. अ. [२०२४]. भारताचे संविधान. पुणे, चौधरी लॉ पब्लीशर्स

२] पठाण नु. [2०2३]. आपले संविधान, प्रियदर्शी पब्लीकेशन

३] Lakshmikant M [2०22]. Indian Polity. Chennai, McGraw Hill Education [India] Private Limited

४] Basu D. D. [2०18]. Introduction of Indian Constitution. Gurgaon, LexisNexis.
५] देशातील नागरिकांना मुलभूत कर्तव्ये शिकवण्याच्या सूचना कार्यान्वित करण्यासाठी भारत सरकारने स्थापन केलेल्या न्यायमूर्ती जेएस वर्मा समितीचा अहवाल

घटक ४ : भारतीय शासन व्यवस्था

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय- विवेचन

- ४.२.१ राष्ट्रपती
- ४.२.२ राज्यसभा
- ४.२.३ लोकसभा
- ४.२.४ सर्वोच्च न्यायालय
- ४.२.५ घटना दुरुस्तीची प्रक्रिया

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं -अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला....

- भारताच्या राष्ट्रपती पदाची निवडणूक प्रक्रिया तसेच अधिकार व कार्यांची माहिती मिळेल.
- राज्यसभेची रचना तसेच त्यांचे अधिकार आणि कार्य समजतील.
- लोकसभेची रचना तसेच त्यांचे अधिकार आणि कार्य समजतील.
- सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र स्पष्ट होईल.
- भारतीय राज्यघटना दुरुस्तीच्या पद्धती विषयी माहिती मिळेल.

४.१ प्रास्ताविक

भारतातील शासन व्यवस्था पाहिल्यास त्यात केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य शासन व्यवस्था हे स्तर दिसून येतात. तसेच भारतीय लोकशाही ही कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्याय मंडळ या तीन स्तंभावर उभी आहे. केंद्र स्तरावर राष्ट्रपती, उप राष्ट्रपती, मंत्रिमंडळ, संसद, लोकसभा, राज्यसभा, सर्वोच्च न्यायालय इत्यादी आहेत. राज्यासाठी राज्यपाल, विधिमंडळ, उच्च न्यायालय याबाबतच्या प्रशासकीय तरतुदी संविधानात दिलेल्या आहेत. तसेच केंद्रशासित प्रदेशासाठी देखील प्रशासकीय तरतुदी आहेत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था

स्तरावर दोन विभागण्या केलेल्या आहेत. ग्रामीण व शहरी भागासाठी वेगवेगळी रचना दिलेली आहे. ग्रामीण भागासाठी ग्राम पंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद अश्या प्रशासकीय व्यवस्था आहेत तर शहरी विभागासाठी नगर पंचायत, नगर परिषद आणि नगरपालिका किंवा महानगर पालिका ह्या व्यवस्था आहेत तसेच लष्कर क्षेत्रासाठी कटक मंडळे सारखी प्रशासन व्यवस्था असते.

भारतीय लोकशाहीव्यवस्था ही संविधानाच्या चौकटीत कार्यरत असलेली एक सशक्त आणि संतुलित व्यवस्था आहे. या व्यवस्थेचे केंद्रस्थान म्हणजे भारतीय संविधान, जे जगातील सर्वांत मोठे लिखित संविधान आहे. या संविधानात केंद्र व राज्य सरकारांची भूमिका, नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये, तसेच विविध घटनात्मक संस्थांची कार्यपद्धती याचे स्पष्ट व शिस्तबद्ध वर्णन करण्यात आले आहे. यामध्ये राष्ट्रपती, राज्यसभा, लोकसभा, सर्वोच्च न्यायालय आणि घटना दुरुस्तीची प्रक्रिया हे घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत. राष्ट्रपती हे घटनात्मक प्रमुख आहेत. राष्ट्रपती यांना विविध अधिकार प्राप्त झाले असून त्यामध्ये कार्यकारी, विधीमंडळीय, न्यायिक आणि आणीबाणीविषयक अधिकारांचा समावेश आहे. राज्यसभा ही संसदेचे वरिष्ठ सभागृह असून ते कायमस्वरूपी आहे. या सभागृहाचे सदस्य अप्रत्यक्ष पद्धतीने निवडले जातात. राज्यसभेत प्रामुख्याने राज्यांचे प्रतिनिधित्व असते. लोकसभा ही संसदेचे कनिष्ठ सभागृह असून ते थेट जनतेचे प्रतिनिधित्व करते. हे सभागृह सरकार बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.

सर्वोच्च न्यायालय हे संविधानाचे अंतिम संरक्षक म्हणून कार्य करते. ते मूलभूत हक्कांचे रक्षण करते, कायद्याचे योग्य अर्थ लावते आणि विविध घटनात्मक विवादांवर निर्णय देते. घटना दुरुस्तीची प्रक्रिया ही भारतीय संविधानातील लवचिकतेचे प्रतीक आहे. ही प्रक्रिया संसदेमार्फत घडवली जाते आणि काही वेळा राज्यांच्या संमतीनेच ती पूर्ण केली जाते. यामुळे संविधान कालानुरूप बदल घडवून आणण्यात सक्षम ठरते. या सर्व घटकांचे परस्परसंबंध, परस्पर नियंत्रण आणि समन्वय हेच भारतीय लोकशाहीच्या यशाचे मर्म आहे. ही व्यवस्था देशातील एकता, अखंडता, कायद्याचे राज्य आणि नागरी स्वातंत्र्य सुनिश्चित करते. त्यामुळे भारतीय लोकशाही ही एक गतिशील, सक्रिय आणि जबाबदार व्यवस्था म्हणून जगासमोर आदर्श ठरली आहे.

४.२ विषय-विवेचन

भारतीय संविधानाच्या भाग पाच मध्ये संघराज्याची तरतूद आहे. संघराज्य व्यवस्थेत केंद्र स्तरावरील कार्यकारी यंत्रणा, संसद आणि न्याय यंत्रणेचा समावेश होतो. संघराज्य मधील प्रकरण एक मध्ये कार्यकारी यंत्रणा येते. भारतीय संविधान हे दोन बाबीमध्ये विभागलेले दिसून येते. एक, भारतातील लोक किंवा नागरिकांबाबत तरतुदी आहेत. तसेच दोन, भारताच्या व्यवस्थेबाबत तरतुदी आहेत. अनुच्छेद ५२ नंतर भारताच्या व्यवस्थेबाबत तरतुदी दिसून येतात. भारतीय शासन व्यवस्थेमध्ये भारतीय संसद आणि न्याय यंत्रणा यांचा समावेश होतो. भारतीय संविधानाने निर्माण केलेल्या कायदेमंडळाला 'संसद' (Parliament) असे म्हणतात. आपले कायदेमंडळ द्विगृही असून घटनेच्या भाग ५ मधील कलम ७९ नुसार संसदेत राष्ट्रपती तसेच राज्यसभा आणि लोकसभा या दोन सभागृहांचा समावेश होतो. राष्ट्रपती या दोन्ही सभागृहाचे सदस्य नसतात. तरीही संसदेचा एक अविभाज्य घटक म्हणून ते ओळखले जातात. कारण राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय कोणतेही विधेयक (Bill) कायद्यात रुपांतरित होऊ शकत नाही. काही लेखक याला संसदेचे तिसरे सभागृह असेही म्हणतात.

भारताच्या घटनात्मक दृष्टीने भारतीय संसदेला विशेष स्थान व अनन्यसाधारण महत्व आहे. जनतेच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करणारे व जनतेच्या भावनांचे प्रतीक म्हणून संसदेकडे पाहिले जाते. भारतीय संसदेत प्रत्येक राज्यातील व विभागातील जनतेचे प्रतिनिधी असल्यामुळे संसद केवळ जनतेचे प्रतिनिधीत्व करीत नसून ती विविधतेतून एकता

निर्माण करणारी महत्त्वाची प्रतिनिधी संस्था आहे. या संसदेमधील दोन सभागृहे म्हणजे राज्यसभा व लोकसभा, राज्यसभा हे राज्यांचे प्रतिनिधीत्व करणारे व वरिष्ठ सभागृह आहे. तर लोकसभा हे जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे व कनिष्ठ सभागृह आहे. यावरुन लक्षात येते की राज्यांच्या, जनतेच्या समस्या अडचणी यांची सोडवणूक करण्याचे माध्यम म्हणून संसदेकडे पाहिले जाते. भारतीय संविधानाच्या कलम ७९ ते १२२ मध्ये भारतीय संसदेसंबंधीची तरतूद केलेली आहे.

स्वातंत्र्यानंतर भारतीय शासन आणि प्रशासनात आमूलाग्र बदल झाला. भारतीय घटनाकारांनी विविध देशाच्या संविधानाचा अभ्यास करुन त्या घटनेतील चांगल्या तत्वांचा स्वीकार करुन आपल्या देशासाठी एक स्वतंत्र संविधान निर्माण केले. हे संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताच्या संविधान सभेने स्वीकृत केले. २६ जानेवारी १९५० रोजी संविधानाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीस प्रारंभ झाला. भारतीय संविधानात राज्यकारभार व्यवस्थित चालावा यासाठी घटनाकारांनी महत्त्वाच्या बाबींकडे आवर्जून लक्ष दिले. त्यापैकी संघराज्य शासन पध्दती होय. भारताने संघराज्य शासन पध्दतीचा स्वीकार केला असल्यामुळे केंद्र शासन व राज्य शासन असे दोन स्तरावर वेगवेगळे सरकार कार्यरत असते. केंद्र स्तरावर कार्यकारी प्रमुख म्हणून राष्ट्रपती हे पद निर्माण करण्यात आलेले आहे.

४.२.१ भारताचे राष्ट्रपती (The President of India)

भारतीय राज्यघटनेच्या कलम ५२ मध्ये भारतासाठी एक राष्ट्रपती असेल अशी तरतूद करण्यात आलेली आहे. राष्ट्रपती हा देशाचा प्रथम नागरिक म्हणून ओळखला जातो. देशाचा संपूर्ण राज्यकारभार राष्ट्रपतीच्या नावाने चालतो. ते भारतीय सैन्याचे प्रमुख असतात. भारताचे राष्ट्रपती हे ब्रिटिश संसदीय पध्दतीतील राजा किंवा राणी प्रमाणे नामधारी प्रमुख आहेत. राष्ट्रपती हे घटनात्मक प्रमुख असल्याने त्यांच्या नावाने देशाचा संपूर्ण राज्यकारभार चालतो. परंतु राष्ट्रपती स्वतः कार्य न करता पंतप्रधान प्रमुख असलेल्या मंत्रिमंडळामार्फत देशाचा कारभार पाहतात. म्हणून राष्ट्रपती हे नामधारी प्रमुख आहेत. तर वास्तविक प्रमुख हे पंतप्रधान आहेत. भारताचा राष्ट्रपती हा इंग्लंडच्या राणी प्रमाणे राज्यप्रमुख असला तरी अमेरिकेच्या अध्यक्षाप्रमाणे तो देशाचा वास्तविक शासक नसतो.मुकूटधारी आणि सत्ताधारी असलेल्या फ्रान्सच्या राष्ट्रपतीशी मात्र आपल्या राष्ट्रपतीची तुलना करता येईल.

भारतीय राज्यघटनेच्या भाग पाच मध्ये पहिल्या प्रकरणातील कलम ५२ ते ६२, भाग १८ मधील कलम ३५२ ते ३६०, तसेच कलम ७२ आणि १२३ या शिवाय घटनेच्या इतर कलमातून भारताच्या राष्ट्रपती संबंधीची पात्रता, कार्यकाल, अधिकार व कार्ये इत्यादीच्या तरतुदी केल्या गेल्या आहेत.

पात्रता

भारताचा राष्ट्रपती म्हणून निवडणूक लढविण्यासाठी उमेदवाराला लागणारी पात्रता खालील प्रमाणे-

१) तो भारताचा नागरिक असला पाहिजे.

२) त्याने वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असली पाहिजे.

३) लोकसभेला निवडून येण्यास तो पात्र असला पाहिजे.

४) तो केंद्र, राज्य अथवा स्थानिक शासनाच्या आर्थिक लाभाच्या पदावर नसावा.

५) तो संसद किंवा राज्य विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य नसावा (कलम ५९) असल्यास राजीनामा द्यावा लागतो.

राष्ट्रपतीसाठी सूचक : अनुमोदक

राष्ट्रपतीपद घटनेनुसार सर्वश्रेष्ठ पद आहे. या पदाचे श्रेष्ठत्व टिकून राहावे, कोणीही या पदासाठी उमेदवारी अर्ज करु नये म्हणून राष्ट्रपतीपदाचा उमेदवारी अर्ज दाखल करतांना संसदेच्या १०० निर्वाचित सभासदांनी त्याच्या नावाची सुचना करावी लागते व ५० निर्वाचित सभासदांनी त्याला अनुमोदन द्यावे लागते. पूर्वी ही संख्या १० सूचक १०

अनुमोदक अशी होती. राष्ट्रपती पदासाठी उमेदवार आपला उमेदवारी अर्ज सूचक व अनुमोदकांच्या स्वाक्षरीसह केंद्रीय निर्वाचन आयोगाकडे सादर करतो.

राष्ट्रपती पदासाठी अनामत रक्कम

राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी उमेदवाराला उमेदवारी अर्ज दाखल करतांना १५,००० रुपये अनामत रक्कम भरावी लागते. पूर्वी ही मर्यादा २५०० रुपये एवढी होती. राष्ट्रपती पदाच्या उमेदवाराला निवडून येण्यास आवश्यक असणाऱ्या एकूण मत संख्येच्या १/६ मते न मिळाल्यास त्याची अनामत रक्कम जप्त होते.

राष्ट्रपतीची निवडणूक पध्दत

भारतीय राज्यघटनेतील कलम ५४ नुसार भारतीय राष्ट्रपतीची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होते. राष्ट्रपतीची निवडणूक ही अप्रत्यक्ष निवडणूक पध्दतीने घेण्यात येते. भारतीय जनतेकडून प्रत्यक्ष मतदान पध्दतीने राष्ट्रपतीची निवड केली जात नसून जनतेच्या प्रतिनिधींकडून राष्ट्रपती निवडला जातो. राष्ट्रपतीच्या निवडणुकीसाठी एक निर्वाचन मंडळ निर्माण करण्यात येते. त्याला निर्वाचन मंडल - (Electoral College) असेही म्हणतात. या मध्ये खालील सदस्यांचा समावेश होतो.

१) संसदेच्या दोन्ही सभागृहाचे निर्वाचित सदस्य (लोकसभा, राज्यसभा)

२) घटक राज्यांच्या विधानसभांचे निर्वाचित सदस्य.

३) दिल्ली आणि पाँडेचेरी या केंद्रशासित प्रदेशांच्या विधानसभांचे निर्वाचित सदस्य(७० वी घटनादुरुस्ती - १९९२)

वरील सर्व सदस्य भारताच्या राष्ट्रपतीची निवड करण्यास पात्र असतात व त्यांना प्रत्येकी एक मत द्यावयाचे असते. परंतु सर्व सभासदांच्या मताचे मूल्य सारखे नसते. संसद सदस्याच्या मताचे मूल्य एकदा ठरविल्यानंतर सर्व सदस्यांच्या मताचे मूल्य सारखे राहते. घटक राज्यातील विधानसभांच्या सर्व सदस्यांच्या मताचे मूल्य सारखे नसते, संसद सदस्य हे आपले मतदान देशाच्या राजधानीच्या ठिकाणी करतात तर राज्य विधानसभेचे निर्वाचित सदस्य हे आपआपल्या राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी मतदान करतात. जर एखाद्या संसद सदस्याला आपल्या राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी मतदान करायचे असेल तर दहा दिवआधी एखाद्या त्याची सूचना निर्वाचन आयोगाला देणे आवश्यक असते. देशातील लोकसंख्या हा घटक आधार मानून सर्व सदस्यांच्या मताचे मूल्य निश्चित केले जाते. यासाठी विशिष्ट सूत्राचा अवलंब केला जातो.

१. घटक राज्यातील विधानसभेच्या सदस्याच्या मताचे मूल्य निश्चित करण्यासाठी पुढील सूत्राचा अवलंब केला जातो.

विधानसभा सदस्याच्या मताचे मूल्य :

$$\frac{\text{संबंधित घटक राज्याची लोकसंख्या}}{\text{संबंधित राज्य विधानसभेतील निर्वाचित सदस्यांची संख्या}} \times \frac{१}{१०००}$$

२. संसदेच्या दोन्ही सभागृहातील सदस्याचे मताचे मूल्य निश्चित करण्यासाठी पुढील सुत्राचा वापर केला जातो.

संसद सदस्याच्या मताचे मूल्य :

$$\frac{\text{सर्व राज्यांतील निर्वाचित विधानसभा सदस्यांच्या मताचे एकूण मूल्य}}{\text{संसदेच्या दोन्ही सभागृहातील निर्वाचित सदस्यांची एकूण संख्या}}$$

अशा प्रकारे राष्ट्रपतीच्या निर्वाचन मंडळातील मतदाराच्या मतांचे मुल्य निश्चित केले जाते व त्यानुसार मतमोजणी होते. राष्ट्रपती पदावर निवडून येण्यासाठी आवश्यक मतांची संख्या काढण्यासाठी पुढील सुत्राचा वापर करतात त्यास आवश्यक मतसंख्येला 'कोटा' म्हणतात.

$$\text{कोटा} = \frac{\text{झालेले एकून वैध मतदान}}{\text{१ (निवडून द्यावयाच्या प्रतिनिधीची संख्या) +१}} + १$$

वरील सूत्रानुसार राष्ट्रपती पदासाठी निवडून येण्यास आवश्यक मतसंख्या काढली जाते. मतमोजणी करताना प्रथम पहिल्या पसंतीक्रमाची मते मोजली जातात. ज्या उमेदवाराला आवश्यक संख्येएवढी मते मिळतात त्याची राष्ट्रपती म्हणून निवड केली जाते. परंतु कोणत्याच उमेदवाराला पहिल्या फेरीत आवश्यक संख्येएवढी मते मिळाली नसतील तर सर्वात कमी मते पडणाऱ्या उमेदवाराला यातून वगळले जाते आणित्याची दुसऱ्या क्रमांकाची मते मोजली जातात त्याच्या मतपत्रिकेत दूसऱ्या क्रमांकाची मते ज्याला मिळाली असतील त्याच्या पहिल्या पसंती क्रमांकाच्या मतात ती मते मिळविली जातात आणि आवश्यक मताची संख्या मिळविणारा उमेदवार निवडून आला असे जाहीर केले जाते.

राष्ट्रपतीचे वेतन व भत्ते

भारताच्या राष्ट्रपतीचे वेतन व भत्ते निश्चित करण्याचा अधिकार संसदेला असतो. सध्या राष्ट्रपतीचे वेतन दरमहा पाच लाख रुपये आहे. परन्तु, संसद ठरवील तेव्हा वेळोवेळी यात वाढ केली जाते. राष्ट्रपतीचे वेतन व भत्ते भारताच्या संचित निधीतून दिले जातात. तसेच इच्छेनुसार सेवानिवृत्तीनंतर देशाच्या कोणत्याही भागात स्वतंत्र निवासाची सोय केली जाते.

राष्ट्रपतीचा शपथविधी

राष्ट्रपती म्हणून निवड झाल्यानंतर पदग्रहण करण्यापूर्वी त्याला भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशामार्फत गोपनीयतेची शपथ दिली जाते. मी ईश्वराची शपथ घेवून सत्य निष्ठापूर्वक प्रतिज्ञा करतो की, राष्ट्रपती पदाची कामे प्रामाणिक पणे पार पाडीन, घटनेचे व विविध नियमांचे पालन व संरक्षण करीन. तसेच भारतीय जनतेची कायम सेवा करण्यासाठी प्रयत्नशील राहीन. अशी राज्यघटनेतील कलम ६० नुसार त्यांना शपथ घ्यावी लागते.

राष्ट्रपतीचा कार्यकाल

भारतीय राज्यघटनेच्या कलम ५६ नुसार भारताच्या राष्ट्रपतीचा कार्यकाल पाच वर्ष एवढा निश्चित केला आहे. त्याला परत निवडणुकीसाठी उभे राहता येते (कलम ५६-५७). त्याच्या कार्यकाळात तो आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतो. त्याला आपला राजीनामा स्वतःच्या हस्ताक्षरात सही करुन उपराष्ट्रपतीच्या नावाने दयावा लागतो. उपराष्ट्रपती हा राजीनामा तात्काळ लोकसभेच्या सभापतीकडे पाठवितात. नंतर तो संसदेपुढे येतो. राष्ट्रपतीच्या गैरहजेरीत उपराष्ट्रपती त्याचा पदभार साभाळतो. राष्ट्रपती व उपराष्ट्रपतीच्या गैरहजेरीत सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश राष्ट्रपती पद सांभाळतो. राष्ट्रपतीपद रिकामे झाल्यास सहा महिन्याच्या आत नवीन राष्ट्रपतीची निवडणूक घेणे बंधनकारक असते.

राष्ट्रपतीवरील महाभियोग

राष्ट्रपतीला पदावरुन हटविण्यासाठी महाभियोगाचा खटला चालवावा लागतो. त्यावर घटनाभंग केल्याचा आक्षेप ठेवून त्याच्यावर महाभियोगाचा खटला चालविला जाऊ शकतो. भारतीय राज्यघटनेतील कलम ६१ नुसार संसदेला राष्ट्रपतीवर महाभियोगाचा खटला चालवून त्यास बडतर्फ करता येते. संसदेच्या कोणत्याही सभागृहाने राष्ट्रपतीला १४ दिवस पूर्व सूचना देवून, एकूण सभागृहाच्या बहुमताने घटना भंगाच्या आरोप ठेवण्यास व २/३ बहुमताने तो पास केल्यास दुसरे सभागृह राष्ट्रपतीला आपली बाजू सभागृहासमोर मांडण्यास सांगते व त्याच्यावरील आरोपाची चौकशी करते. आरोप खरा असल्यास २/३ बहुमताने राष्ट्रपतीवरील महाभियोग ठरावाला संमती देते. दोन्ही सभागृहांनी महाभियोग ठराव संमत केल्यास राष्ट्रपतीला पदत्याग करावा लागतो. सुदैवाने आजपर्यंत अशी घटना भारताच्या इतिहासात घडलेली नाही.

भारताच्या राष्ट्रपतीचे अधिकार आणि कार्य

राष्ट्रप्रमुख तसेच संविधानात्मक प्रमुख या नात्याने भारतीय संविधानाने राष्ट्रपतीला व्यापक स्वरुपाचे अधिकार दिलेले आहेत. संसदेच्या कायद्यानुसार काही अधिकार राष्ट्रपतींना प्राप्त झालेले असल्यामुळे संविधानात्मक दृष्टीने राष्ट्रपती हा देशाचा कार्यकारी प्रमुख आहे. त्यांच्या नावाने देशाचा संपूर्ण राज्यकारभार चालतो. परंतु राष्ट्रपतीची सत्ता मात्र नाममात्र असते. राज्यघटनेने राष्ट्रपतीला अत्यंत व्यापक प्रमाणात अधिकार दिलेले आहेत. ते पुढील प्रमाणे

१) **प्रशासन विषयक अधिकार :** राज्यघटनेच्या कलम ५३ नुसार केंद्र शासनाची कार्यकारी सत्ता राष्ट्रपतीला देण्यात आली आहे. हे अधिकार तो स्वतः अथवा आपल्या सहाय्यक अधिकाऱ्यामार्फत वापरु शकतो. केंद्राची संरक्षणविषयक सर्वोच्च सत्ता त्याला प्राप्त झाली आहे. केंद्र शासनाची कार्यकारी सत्ता तो वापरु शकतो. म्हणजेच सर्व कायद्याची अंमलबजावणी तो करतो.

१) राष्ट्रपती पंतप्रधानाची नेमणूक करतो. तसेच पंतप्रधानाच्या सल्ल्यानुसार इतर मंत्र्याच्या नेमणूका करतो व खातेवाटप करतो.

२) राष्ट्रपती संसदेने केलेल्या सर्व कायद्याची अंमलबजावणी करण्याचे कार्य करत प्रशासकीय यंत्रणेवर नियंत्रण ठेवतात.

३) भारताचा महालेखा परीक्षक, भारताचा महान्यायवादी, केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य, राज्यपाल, परराष्ट्रात पाठवावयाचे राजदूत व प्रतिनिधी, मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या नेमणूका राष्ट्रपती करतो. निवडणूक आयोग, नियोजन मंडळ, वित्तमंडळ, भाषा आयोग, राष्ट्रीय अल्पसंख्यांक आयोग, राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, राष्ट्रीय महिला आयोग यांचे अध्यक्ष व सदस्यांची नेमणूक राष्ट्रपती करीत असतो.

४) तिन्ही सैनादलांचा प्रमुखपती म्हणून भूदल, नौदल व हवाईदल प्रमुखांच्या नेमणुका करणे. राष्ट्रीय संरक्षण समितीचा अध्यक्ष म्हणून देशाच्या संरक्षणासंबंधी निर्णय घेणे.

५) आंतरराष्ट्रीय सभा संमेलनात भारताचे प्रतिनिधीत्व करणे, विदेशी पाहुण्यांचे स्वागत करणे इत्यादी.

२) **कायदेविषयक अधिकार :** भारताचा राष्ट्रपती हा संसदेचा अविभाज्य घटक आहे. देशाच्या कायदा निर्मिती प्रक्रियेचा एक अविभाज्य भाग म्हणून राष्ट्रपतीचे स्थान घटनेने मान्य केले आहे. त्यामुळे राष्ट्रपतीला व्यापक प्रमाणात कायदेविषयक अधिकार प्राप्त झाले आहेत. ते पुढील प्रमाणे -

१) संसदेने पास केलेले विधेयक राष्ट्रपतीकडे पाठविले जाते. राष्ट्रपतीची संमती मिळाल्यानंतरच ते विधेयक कायद्यात रुपांतरीत होत असते. संसदेने बहुमताने मंजूर करून राष्ट्रपतींच्याकडे सहीसाठी पाठवलेल्या विधेयकाशी राष्ट्रपती जर असहमत असतील तर ते एकदा हे विधेयक संसदेकडे माघारी पाठवू शकतात मात्र संसदेने पुन्हा दुसऱ्यांदा तेच विधेयक जसेच्या तसे मंजूर करून सहीसाठी राष्ट्रपतींच्याकडे पाठवले तर राष्ट्रपतींना त्यावर सही करणे बंधनकारक असते. अशाच पद्धतीने राज्यांच्या विधीमंडळाने बहुमताने मंजूर केलेल्या विधेयकाला राज्यपाल एकदा विधिमंडळाकडे माघारी पाठवू शकतात मात्र विधिमंडळाने पुन्हा तेच विधेयक आहे त्याच स्वरूपात मंजूर करून पुन्हा राज्यपालांच्याकडे पाठवले तर त्यावर सही करणे राज्यपालांसाठी बंधनकारक असते. परंतु संसदीय शासनाचा एक प्रघात म्हणून सहसा असे घडत नाही. तरीपण के. आर. नारायणन आणि डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांनी त्यांच्या काळात काही विधेयके परत केली होती.

२) संसदेच्या लोकसभा, राज्यसभा या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन बोलावणे, तहकूब करणे व ते संपविणे या संबंधीचा अधिकार राष्ट्रपतीला आहे.

३)संसदेचे अधिवेशन चालू नसेल आणि राज्यकारभारासाठी एखादा नियम करणे आवश्यक आहे, अशी राष्ट्रपतीला खात्री झाल्यास राष्ट्रपती कलम १२३ नुसार वटहुकूम (अध्यादेश) काढतात. वटहुकूम संसदेचे

अधिवेशन सुरु झाल्यानंतर संसदेसमोर मांडावे लागतो. संसदेचे अधिवेशन सुरु झाल्यानंतर सहा आठवड्यात त्या वटहुकूमाला मान्यता न मिळाल्यास तो रद्द समजला जातो.

४) संसदेच्या दोन्ही सभागृहांत एखाद्या विधेयकावर मतभेद निर्माण झाल्यास दोन्ही सभागृहांचे संयुक्त अधिवेशन बोलावण्याचा अधिकार राष्ट्रपतीला असतो. पण संसदेच्या संयुक्त अधिवेशनाचा अध्यक्ष मात्र लोकसभेचा सभापती असतो.

५) सार्वत्रिक निवडणुकीनंतर व प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला संसदेत अभिभाषण करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला असतो. राष्ट्रपतीचे अभिभाषण हे केंद्रीय मंत्रिमंडळाचे ध्येय धोरण असते.

६) साहित्य, कला, क्रीडा, विज्ञान, समाजसेवा या क्षेत्रातून १२ नामांकित व्यक्तींची राज्यसभेवर नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे.

७) नवीन घटक राज्याची निर्मिती, संचित निधीतून करावयाचा खर्च, धन विधेयक, एखाद्या घटक राज्याच्या सीमा किंवा नाव बदलण्यासंबंधीचे विधेयक यासारख्या काही विधेयकांना संसदेत मांडण्यापूर्वी राष्ट्रपतीची पूर्वसंमती आवश्यक असते.

८) विविध आयोग, संस्था, यांचे अहवाल चर्चेसाठी संसदेपुढे ठेवणे.

९) मंत्रिमंडळाने शिफारस केल्यास राज्यघटनेतील कलम ८५ नुसार लोकसभा विसर्जित करणे वा तिचा कार्यकाल वाढवण्याचा अधिकार राष्ट्रपतीला आहे.

३) **आर्थिक अधिकार :** शासनाचा घटनात्मक प्रमुख या नात्याने राष्ट्रपतीला आर्थिक बाबतीत बरेच अधिकार प्राप्त झाले आहेत. राष्ट्रपतीच्या पूर्वसंमतीशिवाय कोणतेही वित्तविषयक विधेयक लोकसभेत मांडता येत नाही. देशाचे वार्षिक अंदाजपत्रक राष्ट्रपतीच्या वतीनेच लोकसभेत सादर केले जाते. म्हणजेच राष्ट्रपती व संसद यांच्या संमतीशिवाय एकही पैसा खर्च करता येत नाही. म्हणून असे म्हटले जाते की, देशाच्या तिजोरीची एक चावी राष्ट्रपतीकडे तर दुसरी चावी संसदेकडे असते.

संकटकाळात खर्च करावयाचा निधी (Contingency Fund of India) राष्ट्रपतीच्या नियंत्रणात असतो. केंद्र सरकारचे जे उत्पन्न असते त्यातील किती हिस्सा राज्य सरकारला द्यावयाचा, कशा प्रकारे द्यावयाचा, हे देण्याचे निकष काय असावेत इत्यादी गोष्टी ठरविण्यासाठी प्रत्येक पाच वर्षांसाठी एका वित्त आयोगाची नियुक्ती केली जाते. राज्यघटनेतील कलम २८० प्रमाणे हा आयोग नेमले जातो. आणि या आयोगाने केलेल्या शिफारशींच्या आधारे केंद्र आणि राज्य सरकारात एकूण उत्पन्नाची वाटणी केली जाते.

४) **न्यायविषयक अधिकार :** भारताच्या राष्ट्रपतीला संविधानाने काही न्यायविषयक अधिकार दिलेले आहेत ते पुढीलप्रमाणे :

१) भारतीय संविधानाच्या कलम १२४ प्रमाणे राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाच्या व उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाच्या नेमणुका करतो.

२) न्यायालयाने एखाद्या व्यक्तीला मृत्युदंडाची किंवा इतर गंभीर स्वरुपाची शिक्षा दिली असेल आणि त्या व्यक्तीने राष्ट्रपतीकडे दयेचा अर्ज केला असेल तर राष्ट्रपती त्या व्यक्तीची शिक्षा कमी अथवा माफ करु शकतात. इतकेच नाही तर लष्करी न्यायालयाने दिलेली शिक्षा कमी करण्याचा अथवा माफ करण्याचा अधिकार देखील राष्ट्रपतीला आहे.

अजमल कसाब व अफजल गुरु यांनी राष्ट्रपतीकडे दया अर्ज सादर केला होता. परंतु राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी तो अर्ज नाकारल्यामुळे त्यांना फाशी देण्यात आली.

४) संघराज्य शासनाच्या शासन कारभारात एखादा विवाद निर्माण झाला असेल अथवा एखाद्या प्रकरणात सार्वजनिक हिताचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असेल तर त्याच्या सोडवणुकीसाठी सर्वोच्च न्यायालयाकडून घटनेच्या कलम १४३ नुसार कायदेविषयक सल्ला राष्ट्रपती मागवू शकतो.

५) **सैन्यविषयक अथवा लष्करी अधिकार :** भारताचे राष्ट्रपती हे देशाच्या सैन्याचे प्रमुख (Commander in Chief) असतात. मात्र प्रत्यक्षात लष्कराचे सर्व कार्य कायद्यानुसार चालते. केवळ शासन प्रमुख या नात्याने त्यांना हा दर्जा मिळाला आहे. सैन्याच्या सर्व दलाच्या प्रमुखांच्या नेमणुका राष्ट्रपती करतात. परराष्ट्राबरोबरच्या युध्दविषयक धोरणाला मान्यता देतात, तसेच युध्दाची सुरुवात किंवा युध्दबंदीविषयी घोषणा राष्ट्रपतीच करीत असतात. परराष्ट्राबरोबरचे तह किंवा करार करण्याचा अधिकार इत्यादी कार्य कायद्याच्या सत्तेने तेच करतात.

६) **परराष्ट्रासंबंधीचे अधिकार :**

१. परराष्ट्राचे सर्व व्यवहार, करार राष्ट्रपतीच्या नावाने केले जातात.

२. विदेशात भारताचे राजदूत, विदेशी राजदूतांना आपल्या देशात स्वीकृती देणे.

३. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधीत्व करणे किंवा शिष्टमंडळ पाठविणे.

४. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची प्रतिमा उंचावण्याचे कार्य करणे.

७) **आणीबाणी विषयक अधिकार :** संकटकालीन परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी राष्ट्रापतीला काही विशेष अधिकार असावेत म्हणून भारतीय राज्यघटनेतील १८ व्या भागात कलम ३५२ ते ३६० अंतर्गत तीन प्रकारचे आणिबाणी विषयक अधिकार दिलेले आहेत ते पुढीलप्रमाणे :

अ) राष्ट्रीय आणीबाणी संबंधी अधिकार (कलम ३५२) : परकीय आक्रमण, अंतर्गत सशस्त्र बंड इत्यादी कारणांमुळे युध्दसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यास राष्ट्रपती कलम ३५२ नुसार राष्ट्रीय आणीबाणी घोषित करु शकतात. आणीबाणी संसदेच्या परवानगी शिवाय दोन महिने व परवानगीने सहा महिने लागू करता येते. आतापर्यंत १) इ.स. १९६२ २) १९६५ ३) १९७१ ४) १९७५ मध्ये आणीबाणी लागू झाली होती.

अशी आणीबाणी लागू झाल्यास देशातील राज्यसत्तेसह सर्व सत्ता केंद्राच्या हातात जाते, संसद राज्यसूचीतील विषयांवर कायदा करु शकते. मूलभूत अधिकारांवर बंधने येतात.

आ) राज्यातील आणीबाणी संबंधी अधिकार कलम २५६ राष्ट्रपती राजवट : घटक राज्यातील कार्य घटनात्मक दृष्ट्या असमर्थ असल्यास म्हणजेच घटनेच्या नियमाप्रमाणे चालत नसल्यास अशा राज्यामध्ये कलम ३५६ नुसार आणीबाणी लागू करु शकतात. त्यालाच राष्ट्रपती राजवट सुध्दा म्हणतात. अशी आणीबाणी राज्यात लागू झाल्यास उच्च न्यायालय सोडून राज्यातील सर्व सत्ता केंद्राच्या ताब्यात व नियंत्रणात येते. हा आणीबाणीचा कालावधी सुरुवातीस सहा महिने असू शकतो. आवश्यकता पडल्यास संसदेच्या परवानगीने तो वाढविता येतो. राज्य विधिमंडळाचे सर्व अधिकार संसदेला प्राप्त होतात. अशा प्रकारची आणीबाणी अनेक वेळा अनेक राज्यांत लागू झाली आहे.

इ) आर्थिक आणीबाणी संबंधी अधिकार (कलम ३६०) : देशाची आर्थिक व्यवस्था कोलमडलेली असेल व त्यामुळे देशाला आर्थिक संकटातून जावे लागत असेल अशा वेळी देशाला आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याच्या दृष्टीने राष्ट्रपती आर्थिक आणीबाणी जाहीर करु शकतात.

आर्थिक आणीबाणीचे खालील परिणाम होतात :

१. केंद्र व राज्य सरकारमधील सर्व सेवक वर्गाचे वेतन व भत्ते कमी करण्याचे आदेश दिले जाऊ शकतात.

२. राज्य विधिमंडळाने संमत केलेल्या आर्थिक बाबींना राष्ट्रपतींची मान्यता घेणे आवश्यक असते.

३. केंद्र व राज्य-सरकार मधील आर्थिक उत्पन्न विभागणीत फेरबदल सुचविणे. अशा प्रकारची आणीबाणी भारतामध्ये अद्याप तरी घोषित करण्यात आलेली नाही.

वास्तविक स्थिती

भारताच्या राष्ट्रपतीचे वरील सर्व अधिकार व कार्य पाहिल्यानंतर त्याच्या अधिकाराची व्याप्ती खूपच मोठी आहे असे लक्षात येते. राष्ट्रपतीच्या स्थानाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीत असे मत व्यक्त

केले होते की, भारताच्या राष्ट्रपतीचे स्थान इंग्लंडच्या राजासारखे आहे. राष्ट्रपतीला घटनात्मक भरपूर अधिकार दिलेले असले तरी हे सर्व अधिकार पंतप्रधान व मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसारच वापरावे लागतात. वास्तविकपणे हे सर्व कार्य पंतप्रधानाकडून केले जाते. म्हणून राष्ट्रपतीला नामधारी प्रमुख व पंतप्रधान हा वास्तविक प्रमुख समजले जाते. सन १९७८ मध्ये ४४ वी घटना दुरुस्ती करुन कलम ७४ (१) मध्ये अशी तरतूद करण्यात आलेली आहे की, पंतप्रधान प्रमुख असलेले मंत्रिमंडळ राष्ट्रपतीला सल्ला व मदत करण्यासाठी असेल. मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसारच राष्ट्रपतीने कर्तव्य पालन व कार्य करावे.

४.२.२ राज्यसभा

भारताच्या केंद्रीय कायदेमंडळाला संसद (Parliament) असे म्हणतात. आपले कायदेमंडळ द्विगृही कायदेमंडळ आहे संविधानाच्या कलम ७९ नुसार संसदेमध्ये राष्ट्रपती, संसदेची दोन सभागृहे १) राज्यसभा २) लोकसभा असतील असे स्पष्ट केले आहे. राज्यसभा हे संसदेचे वरिष्ठ सभागृह आहे. हे सभागृह घटक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशाचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह आहे. तसेच या सभागृहाला वरिष्ठ सभागृह असे म्हटले जाते. अनुभवी, ज्ञानी व विचारवंतांना निवडणूक प्रक्रियेत यश मिळेलच असे सांगता येत नाही, म्हणून त्यांना संधी देण्यासाठी, समाजातील विविध घटकांना सामावून घेण्यासाठी व प्रत्येक राज्याच्या हितसंवर्धनासाठी राज्यसभेची निर्मिती करण्यात आली आहे. घटनाकारांनी लोकसभेच्या मानाने राज्यसभेची सदस्य संख्या कमी ठेवली आहे. काही महत्वपूर्ण बाबतीत मात्र सभागृहाला लोकसभेइतकेच अधिकार दिले आहेत.

राज्यसभेची रचना

भारतीय राज्यघटनेच्या कलम ८० नुसार राज्यसभेत जास्तीत जास्त २५० सदस्य असतील असे ठरविण्यात आले. त्यापैकी १२ सदस्य राष्ट्रपतीकडून नियुक्त केले जातील आणि राहिलेले २३८ सदस्य हे विविध घटक राज्यांच्या विधानसभेच्या निर्वाचित सभासदांकडून आणि केंद्रशासित प्रदेशातील निर्वाचित सदस्यातून अप्रत्यक्षपणे निवडले जातील.

१) **नियुक्त सदस्य** : भारताचे राष्ट्रपती राज्यसभेवर १२ सदस्यांची नियुक्ती करतात. साहित्य, शास्त्र,कला,क्रीडा,आणि सामाजिक सेवेच्या क्षेत्रांतील विशेष ज्ञानी अथवा अनुभवी व्यक्तींची त्यांच्याकडून नियुक्ती केली जाते. भारतीय राज्यघटना अशा प्रकारे नियुक्तीचे तत्त्व स्वीकारते आणि त्यांच्या अभ्यासाचा, कर्तृत्वाचा फायदा तसेच त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ देशाचे कायदे करतांना घेऊ शकते.

२) **घटक राज्याचे प्रतिनिधी** : प्रत्येक घटकराज्याच्या विधान सभेच्या निर्वाचित सदस्यांकडून राज्यसभेसाठी काही सदस्य निवडले जातात. निवडणुकीसाठी, प्रमाणशीर प्रतिनिधीत्व, एकल संक्रमणीय मतदान पध्दतीचा अवलंब केला जातो. कोणत्या राज्याने किती प्रतिनिधी राज्यसभेवर पाठवावे हे ढोबळमानाने लोकसंख्येच्या आधारावर ठरले असले तरी आता लोकसंख्या वाढली तरी त्या घटक राज्याला राज्यसभेवर पाठविण्याच्या सदस्य संख्येत वाढ होत नाही. परंतु नवीन घटक राज्य व केंद्रशासित प्रदेश निर्माण झाल्यास या सदस्य संख्येत बदल होतो.

३) **केंद्रशासित प्रदेशाचे प्रतिनिधी** : केंद्रशासित प्रदेशांच्या निर्वाचित सदस्यांतून अप्रत्यक्षपणे राज्यसभेच्या सदस्यांची निवड केली जाते. तेथेही प्रमाणशीर प्रतिनिधीत्व व एकल संक्रमणीय मतदान पध्दतीचे तत्त्व अंगिकारले जाते. सध्या फक्त दिल्ली आणि पाँडेचेरी या दोनच केंद्रशासित प्रदेशांना राज्यसभेत प्रतिनिधीत्व देण्यात आलेले आहे.

राज्यसभेच्या सदस्यांची पात्रता

१) तो भारताचा नागरिक असावा.

२) त्याचे वय ३० वर्षे पूर्ण असावे.

३) सनदी सेवक किंवा सरकारी आर्थिक लाभ मिळवणारा नसावा.

५) संसदेने वेळोवेळी ठरविलेल्या अटी पूर्ण करणारा असावा.

राज्यसभा निवडणुकीची प्रक्रिया

राज्यसभा सदस्याची निवड ही प्रत्येक घटक राज्याच्या विधानसभेत निवडून आलेल्या प्रतिनिधीमार्फत होते. केंद्रशासित प्रदेशातील सदस्य कसे निवडावेत हे संसद कायदा करुन ठरविते. राज्यसभेची निवडणूक एकल संक्रमणीय मतदान पध्दतीने व पसंतीक्रमाने केली जाते. राज्यसभेसाठी निवडून येण्यासाठी निश्चित मताचा कोटा ठरविला जात असतो ते खालील सूत्रानुसार ठरवितात.

$$\text{कोटा} = \left\{ \frac{\text{एकूण वैध मते}}{\text{निवडायचे सदस्य} + १} \right\} + १$$

उदा. एखाद्या राज्यात १०० आमदार आहेत आणि ३ राज्यसभा सदस्य निवडायचे आहेत, तर:

$$\text{कोटा} = \left\{ \frac{१००}{३ + १} \right\} + १ = २६$$

म्हणजेच उमेदवाराला निवडून येण्यासाठी किमान २६ मते लागतील.

केंद्रीय निवडणूक आयोग (Election Commission of India) ही संस्था राज्यसभा निवडणुका आयोजित करते. निवडणुकीची पद्धत ही प्रमाणात्मक प्रतिनिधित्व प्रणाली (Proportional Representation System) वापरून एक हस्तांतरणीय मत प्रणाली (Single Transferable Vote System) द्वारे निवड होते. याचा अर्थ असा की: प्रत्येक आमदाराला एका मताचा हक्क असतो. पण मतदान करताना तो **प्राधान्यक्रमाने (१, २, ३...)** उमेदवारांची निवड करतो. जर एखाद्या उमेदवाराला निवडून येण्यासाठी आवश्यक मते मिळाली नाहीत, तर त्याची मते दुसऱ्या प्राधान्याच्या उमेदवाराकडे वळवली जातात.

कार्यकाल

राज्यसभा हे सभागृह स्थायी सभागृह आहे. राज्यसभेचे कधीही विसर्जन केले जाऊ शकत नाही. राज्यसभा हे सभागृह कायम असले तरी राज्यसभा सदस्याचा कार्यकाल मात्र सहा (६) वर्षांचा असतो. परंतु सर्व सदस्यांचा कार्यकाल एकाचवेळी सुरु होत नाही किंवा संपत नाही. दर दोन वर्षांनी १/३ सदस्य निवृत्त होतात आणि तेवढेच नवीन सदस्य निवडले जातात.

अधिवेशन

राज्यसभेची वर्षातून तीन अधिवेशने होतात. दोन अधिवेशनांतील अंतर १८० दिवसापेक्षा (६ महिने) जास्त असू नये. राष्ट्रपती आवश्यकता असल्यास इतर वेळी सुध्दा सर्वसाधारणपणे राज्यसभेचे अधिवेशन बोलवितात. सर्वसाधारण अधिवेशनामध्ये

१) पावसाळी अधिवेशन (जुलै-ऑगस्ट)

२) हिवाळी अधिवेशन (ऑक्टोबर-नोव्हेंबर)

३) अंदाजपत्रकीय अधिवेशन (फेब्रुवारी-मार्च) यांचा समावेश असतो.

गणसंख्या

राज्यसभेच्या कामकाजासाठीची गणसंख्या राज्यसभाच ठरविते. राज्यसभेला आपले कामकाज सुरु करण्यासाठी कमीत कमी एकूण सभासदांच्या १०% (टक्के) सभासद उपस्थित असले पाहिजेत.

राज्यसभेचे पदाधिकारी

राज्यसभेचा अध्यक्ष : उपाध्यक्ष

लोकसभा ज्याप्रमाणे आपला सभापती निवडते, त्याप्रमाणे राज्यसभेला आपला अध्यक्ष निवडता येत नाही. राज्यसभेचा पदसिध्द अध्यक्ष म्हणून भारताचा उपराष्ट्रपती हाच कार्य पाहतो. उपराष्ट्रपतीच्या अनुपस्थितीमध्ये राज्यसभा आपल्यापैकी एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड केलेल्या राज्यसभेच्या सदस्याला कामकाज पाहण्याची अनूमती देते. राज्यसभेच्या अध्यक्षाला संसदेने केलेल्या कायद्यानुसार वेतन व भत्ते दिले जातात.

उपराष्ट्रपती राज्यसभेचे सदस्य नसल्यामुळे त्यांना सभागृहात मतदानाचा अधिकार नाही. परंतु एखाद्या विधेयकावर समसमान मते पडल्यास ते निर्णायक मत देऊ शकतात.

अध्यक्षाचे कार्य

१) कामकाजावर नियंत्रण ठेवणे
२) सभागृहात शांतता व सुव्यवस्था ठेवणे
३) सदस्यांच्या तक्रारीचे निवारण करणे.
४) विधेयक मांडण्यास किंवा मत व्यक्त करण्यास परवानगी देणे.
५) गणसंख्या पाहणे
६) निर्णायक मत देणे.

राज्यसभेचे अधिकार आणि कार्ये

राज्यसभा हे द्वितीय सभागृह असले तरी अनेक अधिकारांच्या बाबतीत लोकसभेइतके अधिकार या गृहाला मिळाले आहेत. त्याचबरोबर राज्यसभेला काही विशिष्ट स्वरुपाची कार्ये पार पाडावी लागतात. ती पुढील प्रमाणे :

१) **कायदेविषयक अधिकार :** देशासाठी एखादा कायदा करावयाचा असल्यास त्या संबंधीचे विधेयक राज्यसभेमध्ये मांडता येते. फक्त अर्थविषयक विधेयक राज्यसभेमध्ये मांडले जाऊ शकत नाही. राज्यसभेत मान्यता मिळाल्यानंतर ते विधेयक लोकसभेकडे पाठविले जाते. ज्याप्रमाणे लोकसभेस अधिकार आहेत, त्याचप्रमाणे कायदे निर्मितीचे अधिकार राज्यसभेस आहेत. केंद्र सूचीतील, समवर्ती सूचीतील विषयांसंबंधी कायदे करण्याचा अधिकार राज्यसभेला आहे. नवीन कायद्याची निर्मिती करणे, जुन्या कायद्यात दुरुस्त्या करणे, अनावश्यक कायदे रद्द करणे हे अधिकार राज्यसभेलाही असतात. धन विधेयक सोडून इतर विधेयके लोकसभेकडून आल्यानंतर राज्यसभा त्या विधेयकाला मंजुरी द्यावयाची किंवा नाही हे ठरवू शकते. अथवा दुरुस्त्या सुचवून ते विधेयक लोकसभेकडे परत पाठविले जाते. लोकसभेने एखादे विधेयक मंजूर करुन राज्यसभेकडे पाठविल्यास राज्यसभा असे विधेयक सहा महिन्यांपर्यंत आपल्याकडे संमती न देता ठेवू शकते. म्हणजेच जास्तीत जास्त सहा महिन्यापर्यंत रोखून ठेवता येऊ शकते. यावरुनच असे दिसून येते की, लोकसभेच्या तुलनेत राज्यभेचा कमी प्रभाव दिसून येतो.

२) **अर्थविषयक अधिकार :** अर्थविषयक अधिकाराच्या बाबतीत राज्यसभेचे स्थान दुय्यम स्वरुपाचे आहे. धन विधेयक हे फक्त लोकसभेतच मांडता येते. लोकसभेत ते मंजूर झाल्यास ते राज्यसभेकडे मंजुरीसाठी पाठविले जाते. राज्यसभेला १४ दिवसांच्या आत मंजुरी देऊन परत पाठवावे लागते. जर राज्यसभेने १४ दिवसात ते विधेयक मंजूर करुन परत न पाठवल्यास ते राज्यसभेला मान्य आहे असे समजले जाते. राज्यसभेने दुरुस्त्या सुचवल्यानंतर त्या मान्य करणे किंवा अमान्य करणे लोकसभेच्या मर्जीवर अवलंबून असते. धन

विधेयकाबाबत लोकसभा व राज्यसभेत वाद निर्माण झाल्यास तो मिटविण्यासाठी संयुक्त अधिवेशन घेण्याची तरतूद राज्यघटनेत नाही. म्हणजेच केवळ चौदा दिवस धनविधेयकाला विलंब करण्याचा अधिकार राज्यसभेला आहे.

३) **प्रशासन विषयक अधिकार :** लोकसभेच्या तुलनेत राज्यसभेला प्रशासनविषयक अधिकार कमी प्रमाणात आहेत. लोकसभा व राज्यसभा हे प्रत्यक्षात प्रशासन चालवित नाहीत पण ते प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याचे काम मात्र करतात. घटनेप्रमाणे मंत्रिमंडळ लोकसभेलाच जबाबदार असते, राज्यसभेला नाही. राज्यसभेचे सदस्य प्रशासन विषयक प्रश्न मांडणे, उपप्रश्न विचारणे, चर्चा घडवून आणणे, स्थगन प्रस्ताव आणणे, निंदाव्यंजक ठराव आणणे आणि अविश्वासाचा ठराव आणणे हे मार्ग अवलंबून प्रशासनावर नियंत्रण ठेवू शकतात. म्हणून आपापल्या खात्याचे मंत्री आपापले खाते व्यवस्थित सांभाळतात. मंत्रिमंडळ हे लोकसभेला जबाबदार असल्याने प्रशासकीय बाबतीत राज्यसभेला कमी अधिकार असल्याचे दिसून येते. परंतु राज्यसभा शक्य तेवढे प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करते.

४) **घटनादुरुस्ती संबंधीचा अधिकार :** राज्यघटनाकारांनी राज्यघटना दुरुस्ती करण्याच्या बाबतीत राज्यसभेला लोकसभेच्या बरोबरीचे अधिकार दिले आहेत. संविधानाच्या कलम ३८६ नुसार घटना दुरुस्तीचे विधेयक प्रथम राज्यसभेतही चर्चेस येऊ शकते. राज्यघटना दुरुस्ती होण्यासाठी दोन्ही सभागृहांचे स्वतंत्रपणे २/३ बहुमत आवश्यक असते. राष्ट्रपतीने घटनादुरुस्तीवर स्वाक्षरी केल्यास घटनादुरुस्ती होते. लोकसभा व राज्यसभेत राज्यघटना दुरुस्ती बाबत मतभेद झाले तर घटना दुरुस्ती विषयक विधेयक अस्वीकृत होत असते. यासाठी संयुक्त बैठक बोलावण्याची तरतूद नाही. राज्यसभेने पाठिंबा दिला तरच घटना दुरुस्ती होते. जर पाठिंबा नाही दिला तर घटनादुरुस्ती होत नाही. घटना दुरुस्ती विधेयकावर दोन्ही सभागृहात मतभेद होऊन पेचप्रसंग निर्माण झाल्यास राष्ट्रपतीला संयुक्त बैठक बोलविता येत नाही. म्हणून राज्यसभेचा हा अधिकार महत्त्वाचा समजला पाहिजे.

५) **निवडणुकीसंबंधी अधिकार :** राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती यांना निवडून देण्याचे अधिकार लोकसभेबरोबर राज्यसभेलाही प्राप्त झाले आहेत. निवडणुकीसंबंधीचा हा अधिकार दोन्ही सभागृहांना समान अधिकार आहे. तसेच राज्य सभेचे सदस्य आपल्यातूनच एकाची उपसभापती म्हणून निवड करतात. परंतु लोकसभेतील राष्ट्रपती नियुक्त सदस्य व राज्यसभेतील राष्ट्रपती नियुक्त सदस्यांना राष्ट्रपतीच्या निवडणूक प्रक्रियेत भाग घेता येत नाही.

६) **महाभियोगाच्या खटल्यासंबंधी अधिकार :** भारताच्या संविधानातील महत्त्वाच्या पदावरील व्यक्ती त्यामध्ये राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, निर्वाचन आयुक्त, नियंत्रक व महालेखा परीक्षक इत्यादींवर आरोप ठेवून २/३ बहुमताने त्यांना पदावरुन पदच्युत करण्याचा अधिकार लोकसभेप्रमाणेच राज्यसभेला आहे. उपराष्ट्रपतीला पदच्युत करण्यासाठी राज्यसभा प्रस्ताव मंजूर करते व लोकसभा त्यास मान्यता देण्याचे कार्य करते. त्यात राज्यसभेला जास्त अधिकार आहेत. उदा. कोलकता उच्च न्यायालयाचे सौमित्र सेन यांच्यावरील महाभियोग खटला खा. माकन यांनी प्रथम राज्यसभेत मांडला होता.

७) **घटक राज्यसंबंधीचा अधिकार :** राज्यसभा घटक राज्याचे प्रतिनिधीत्व करते. भारतीय संघराज्यात घटक राज्यांना आपला कारभार करण्यासंबंधीचे अधिकार राज्यसूचीमध्ये ६१ विषयांचा समावेश करुन दिलेला आहे. राज्य सूचीतील एखादा विषय राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे म्हणून त्या विषयावर संसदेने कायदा करावा असा ठराव राज्यसभेने मंजूर केल्यास संसद राज्यसूचीतील विषयावर देखील कायदा करु शकते. असा कायदा फक्त एक वर्षासाठी अंमलात राहू शकतो.

अशा प्रकारे आपणास असे म्हणता येईल की, संसदेचे राज्यसभा हे सभागृह वरिष्ठ व द्वितीय सभागृह आहे. राज्यसभेस लोकसभेच्या तुलनेत काही अधिकार कमी आहेत. म्हणून हे सभागृह निरुपयोगी आहे असे म्हणता येणार नाही. यासंदर्भात असे म्हणता येईल की, भारताची राज्यसभा इंग्लंडच्या हाऊस ऑफ लॉर्डस या सभागृहाएवढी कमकुवत नाही आणि अमेरिकेच्या सिनेट सभागृहाएवढी शक्तिशाली नाही.

४.२.३ लोकसभा

आपल्या भारत देशाने संसदीय शासन पध्दतीचा स्वीकार केला आहे. भारतीय संसद ही द्विगृही आहे. यामध्ये राज्यसभा (वरिष्ठ अथवा दुसरे सभागृह) व लोकसभा (कनिष्ठ अथवा पहिले सभागृह) आहे. लोकसभा हे सभागृह जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे सभागृह म्हणून ओळखले जाते. कारण प्रत्यक्ष मतदान पध्दतीने जनता मतदान करुन आपला प्रतिनिधी लोकसभेमध्ये पाठवतात.

लोकसभेची रचना

भारतीय राज्यघटनेच्या कलम ८१ (१) (अ) अन्वये भारताच्या लोकसभेत घटक राज्यातून निवडून येणारे जास्तीत जास्त ५३० सदस्य आणि कलम ८१ (१) (ब) नुसार केंद्रशासित प्रदेशाचे प्रतिनिधीत्व करणारे जास्तीत जास्त २० सदस्य अशी लोकसभेची एकूण सदस्य संख्या ५५० असेल अशी तरतूद करण्यात आली आहे.

१) घटक राज्याचे जास्तीत जास्त = ५३०

२) केंद्रशासित प्रदेशाचे जास्तीत जास्त = २०

३) अँग्लो इंडियन = ०२ (पूर्वी अँग्लो-इंडियन समाजाचे सदस्य निवडून आले नसतील तर राष्ट्रपतीकडून २ सदस्य नियुक्त केले जात होते, पण आता ही तरतूद १०४ व्या घटना दुरुस्ती नुसार २०१९ मध्ये रद्द केली गेली आहे.)

लोकसभेचे सदस्य प्रौढ मतदारांकडून प्रत्यक्ष मतदान पध्दतीने निवडले जातात.

लोकसभेचे मतदार संघ तसेच अनुसूचित जाती, जमातीचे आरक्षण लोकसंख्येच्या प्रमाणानुसार राज्यनिहाय ठरविले जाते.

लोकसभा सदस्यांची पात्रता

भारतीय संविधानाच्या कलम ८४ नुसार लोकसभेचा सदस्य होण्यासाठी खालील पात्रता आवश्यक आहे.

१) तो भारताचा नागरिक असावा.

२) त्याचे वय २५ वर्षे पूर्ण असावे.

३) तो सनदी सेवक नसावा.

४) त्याचे नाव कोणत्याही लोकसभेच्या मतदार संघात नोंदविलेले असले पाहिजे.

५) राखीव जागेतून निवडणूक लढविणारा उमेदवार त्याच संवर्गाचा असावा.

सदस्यांची निवड

लोकसभेच्या सदस्याची निवड जनतेकडून व सार्वत्रिक प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे होते. प्रत्येक मतदार संघातून एक सदस्य बहुमताने निवडला जातो. त्यास संसद सदस्य किंवा खासदार (M.P.) म्हटले जाते.

लोकसभा सदस्यांचा राजीनामा व बडतर्फी

लोकसभेचा सदस्य आपला राजीनामा केव्हाही देऊ शकतो, पण तो राजीनामा स्वखुशीने, स्वअक्षरात व स्वाक्षरी करुन असला पाहिजे. तो राजीनामा लोकसभेच्या सभापतीकडे द्यावा लागतो.

लोकसभेमध्ये परवानगी न घेता सतत साठ (६०) दिवस बैठकांना गैरहजर राहणाऱ्या सदस्यांचे सदस्यत्व आपोआप रद्द होते. तसेच सभागृहात अयोग्य वर्तन किंवा मोठा गुन्हा केल्यास संबंधित सदस्याला बडतर्फ करण्यात येते. उदा. चारा घोटाळा प्रकरणी न्यायालयाने शिक्षा केल्यामुळे लालुप्रसाद यादव यांचे सदस्यपद रद्द झाले होते.

कार्यकाळ

लोकसभेचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो. राष्ट्रपतीने लोकसभा भंग केल्यास कार्यकाळ कमी होऊ शकतो. तसेच आणीबाणीच्या काळात लोकसभेचा कार्यकाळ एका वेळी एका वर्षापर्यंत वाढविण्याचा अधिकार संसदेला आहे, परंतु आणीबाणी संपताच लोकसभेच्या निवडणुका ६ महिन्यांच्या आत घेतल्या जाव्यात अशी तरतूद आहे.

अधिवेशन

राष्ट्रपती राज्यघटनेच्या कलम ८५ नुसार वर्षातून दोन वेळेस लोकसभेचे अधिवेशन बोलावतो. घटनात्मक तरतुदींनुसार दोन अधिवेशनांत ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीचे अंतर असता कामा नये.

सर्वसाधारण अधिवेशनांमध्ये १) पावसाळी अधिवेशन (जुलै ते ऑगस्ट) २) हिवाळी अधिवेशन (ऑक्टोबर ते नोव्हेंबर) ३) अंदाजपत्रकीय अधिवेशन (फेब्रुवारी ते मार्च) यांचा समावेश असतो.

पदाधिकारी - सभापती व उपसभापती

भारतीय राज्यघटनेच्या कलम ९३ नुसार लोकसभेचे पदाधिकारी म्हणून सभापती व उपसभापतीची निवड होते. लोकसभेचे सभासद हे आपल्यामधूनच सभापती व उपसभापतीची निवड करतात. याशिवाय सहजणांचे सभापती मंडळ तयार करण्यात येते. सभापती व उपसभापती गैरहजर असल्यास या मंडळातील सभासद क्रमाक्रमाने सभापतीचे काम पाहतात. लोकसभेचे सभापती पद सत्ताधारी पक्षाकडे असते. तर उपसभापती पद विरोधी पक्षाच्या सदस्याला द्यावे अशी परंपरा आहे.

सभापतीचे कार्य

१. कामकाजावर नियंत्रण ठेवणे
२. सभागृहात शांतता व सुव्यवस्था ठेवणे.
३. सदस्यांच्या तक्रारीचे निवारण करणे.
४. गणसंख्या पाहणे.
५. कोणते विधेयक धन विधेयक आहे किंवा नाही हे ठरविणे.
६. संयुक्त अधिवेशनाचे अध्यक्षस्थान भूषविणे.
७. एखाद्या विधेयकावर समान मते पडल्यास निर्णायक मत देणे.

गणसंख्या

लोकसभेचे कामकाज सुरु करण्यासाठी एकूण सदस्य संखेच्या १/२० सदस्य म्हणजेच १०% सदस्य उपस्थित असणे आवश्यक आहे. काही कारणामुळे गणसंख्या पूर्ण झाली नसल्यास सभापती काही काळ कामकाज पुढे ढकलतो किंवा स्थगित करु शकतो.

लोकसभेचे अधिकार आणि कार्ये

संसदीय शासन पध्दतीत लोकसभेस महत्त्वाचे स्थान आहे. लोकसभा जनतेचे प्रतिनिधीत्व करणारी भारतातील एक सर्वोच्च संस्था आहे. त्यामुळे जनतेच्या समस्या, अडचणी, इच्छा, आकांक्षा पूर्ण करणारे सभागृह म्हणून लोकसभेकडे पाहिले जाते. लोकसभेची कार्ये पुढील प्रमाणे :

१) **कायदेविषयक अधिकार :** राज्यसभेच्या तुलनेत लोकसभेला कायदे करण्याच्या बाबतीत व्यापक अधिकार मिळाले आहेत. कायदे करण्याचे अधिकार केंद्र सरकारप्रमाणे राज्य सरकारला सुध्दा मिळालेले आहेत. सामान्य परिस्थितीमध्ये लोकसभेला केंद्र सूचीतील आणि समवर्ती सूचीतील विषयावर कायदे तयार

करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. या बरोबर विशिष्ट परिस्थितीत राज्यसूचीतील विषयांवर देखील कायदा राज्यसभेच्या करु शकते. जनतेच्या गरजा सतत बदलत असतात. त्यामुळे लोकसभेला नवीन कायदे तयार करावे लागतात. कालबाह्य व जुने कायदे रद्द करावे लागतात. तसेच जुन्या कायद्यामध्ये दुरुस्ती करावी लागते. लोकसभेने मान्य केलेले विध्येयक राज्यसभेकडे पाठविले जाते किंवा राज्यसभेकडून लोकसभेकडे पाठविले जाऊ शकते. थोडक्यात लोकसभेच्या संमतीशिवाय कोणत्याही विधेयकाचे कायद्यात रुपांतर होऊ शकत नाही. एखादे वेळेस विधेयकाबाबत राज्यसभा व लोकसभेत जर वाद निर्माण झाला तर त्या विधेयकावर निर्णय घेण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांचे संयुक्त अधिवेशन बोलावतात. अशा वेळी लोकसभेच्या अधिक सदस्यसंख्येमुळे लोकसभेचा विजय होतो. घटनाकारांनी राज्यसभेच्या तुलनेत लोकसभेस कायदे विषयक बाबतीत उच्च स्थान दिले आहे असे दिसून येते.

२) **अर्थविषयक अधिकार :** अर्थविषयक बाबतचे जेवढे अधिकार संसदेला आहेत ते सर्व अधिकार खऱ्या अर्थाने लोकसभेच्याच मालकीचे आहेत. अर्थविषयक विधेयके प्रथम लोकसभेतच मांडली जातात. एखादे विधेयक धन विधेयक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार लोकसभेच्या अध्यक्षाला आहे. धन विधेयक राज्यसभेकडे पाठविले जाते. राज्यसभेला १४ दिवसांच्या आत ते विधेयक मंजूर किंवा नामंजूर करुन पाठवावे लागते. जर १४ दिवसाच्या आत राज्यसभेने अर्थ विधेयकाबाबत काही कळविले नाही तर ते विधेयक राज्यसभेलाही मंजूर आहे असे समजले जाते. धन विधेयकाबाबत दोन्ही सभागृहांत मतभेद झाल्यास संयुक्त बैठक बोलावण्याची तरतूद नाही.

अर्थविधेयके व अंदाजपत्रक मंजूर करण्याचा अधिकार लोकसभेलाच आहे. तसेच लोकसभेकडून शासनाच्या खर्चाला मान्यता मिळते. खर्च करण्यासाठी लागणारा पैसा उपलब्ध करुन देण्याचे कार्य लोकसभा करते. तसेच खर्चाची कायदेशीररित्या तपासणी यामुळे लोकसभा देशाच्या सर्व आर्थिक बाबींवर नियंत्रण ठेवते.

३) **प्रशासकीय अधिकार :** भारतीय घटनेच्या कलम ७५ (३) नुसार मंत्रिमंडळ सामूहिकरित्या लोकसभेला जबाबदार असते व लोकसभेचा विश्वास असेपर्यंतच मंत्रिमंडळ अधिकार पदावर असते. यामुळे केंद्रीय मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार लोकसभेला आहे. पंतप्रधान व मंत्रिमंडळातील जास्तीत जास्त सदस्य लोकसभेतील असतात. लोकसभा अनेक मार्गाने शासनावर नियंत्रण ठेवते. ते पुढील प्रमाणे-

अ) लोकसभेच्या अधिवेशन काळात रोज किमान एक तास प्रश्नोत्तराचा असतो. मंत्रिमंडळातील कोणत्याही मंत्र्याला लोकसभा सदस्य प्रश्न विचारु शकतात. या प्रश्न व उपप्रश्नाच्या माध्यमातून लोकसभा शासनावर नियंत्रण ठेवते.

ब) स्थगन प्रस्तावाद्वारे दैनंदिन कामकाज थांबवून विशिष्ट प्रश्नावर चर्चा घडवून आणली जाते.

क) अविश्वासाच्या ठरावाद्वारे मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवण्याचे हे सर्वात प्रभावी साधन लोकसभेजवळ आहे.

ड) चौकशी समित्याद्वारे मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवता येते.

४) **घटनादुरुस्ती संबंधी अधिकार :** भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३६८ नुसार संसद घटनादुरुस्ती करु शकते. संसद म्हणजेच लोकसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहांना घटनादुरुस्तीच्या बाबतीत सारखेच अधिकार असल्यामुळे घटनादुरुस्तीचे विधेयक कोणत्याही सभागृहात प्रथम मांडतात. परंतु मंजुरी मात्र दोन्ही सभागृहांची लागते. घटनादुरुस्ती विधेयक पुढील प्रकारे मंजूर केले जाते. १) दोन्ही सभागृहांतील साध्या बहुमताने २) दोन्ही सभागृहांत मतदान करणाऱ्या सदस्यांच्या २/३ बहुमताने ३) संसदेच्या दोन्ही सभागृहांत २/३ बहुमताने व निम्म्याहून अधिक घटक राज्यांच्या मान्यतेने यापैकी एका प्रकाराने ते मंजूर होते. घटना दुरुस्ती विधेयकाबाबत दोन्ही सभागृहात मतभेद झाल्यास संयुक्त बैठक बोलावण्याची तरतूद नाही.

५) **निवडणुकीसंबंधीचा अधिकार :** भारतीय राज्यघटनेतील कलम ५४ नुसार संसदेतील निर्वाचित सदस्य (म्हणजेच लोकसभा व राज्यसभा) व सर्व घटकराज्यांतील विधानसभेचे निर्वाचित सदस्य राष्ट्रपतीची निवड करतात. तर कलम ६६ नुसार लोकसभा व राज्यसभा यातील निर्वाचित सदस्य उपराष्ट्रपतीची निवड करतात तसेच लोकसभेचे सभापती व उपसभापती यांचीही निवड करण्याचे निवडणूक विषयक कार्य त्यांना करावे लागते.

६) **महाभियोगाचा खटला चालवण्याचा अधिकार :** देशातील उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनी घटना विरोधी कृत्य केल्यास त्यांच्या विरोधात लोकसभेला महाभियोगाचा खटला चालवून त्यांना पदच्युत करता येते. त्यामध्ये राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, निर्वाचन आयुक्त, लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य, नियंत्रक व महालेखापरीक्षक इत्यादींचा समावेश होतो. मात्र यासाठी राज्यसभेचीही मान्यता लागते.

७) **लोकसभेची इतर कार्ये :**

१) राष्ट्रपतीने घोषित केलेल्या वटहुकूमांना मान्यता देणे.

२) लोकसभेच्या कामकाजाची नोंद ठेवणे व त्यांना प्रसिध्दी देण्याचा अधिकार.

३) लोकसभेच्या प्रेक्षकांच्या दालनात इतरांच्या प्रवेशावर बंदी घालण्याचा अधिकार.

४) लोकसभेचा अपमान करणाऱ्यांना दंड करणे.

५) आपल्या कामकाजासाठी विविध समित्या नेमण्याचा अधिकार.

४.२.४ सर्वोच्च न्यायालय

भारतीय संविधानाच्या भाग पाच मधील प्रकरण चारमध्ये कलम १२४ ते १४६ अंतर्गत संघ न्याय व्यवस्थेची तरतूद केलेली आहे. तसेच भाग सहामधील प्रकरण पाचमध्ये कलम २१४ ते २३२ मध्ये राज्यातील उच्च न्यायालयाविषयी तरतूद करण्यात आली आहे आणि भाग सहामधील प्रकरण सहामध्ये कलम २३३ ते २३७ यात दुय्यम न्यायालयाविषयी तरतूद करण्यात आली आहे. भारतीय लोकशाहीचे महत्वपूर्ण तीन आधारस्तंभ आहेत. त्यामध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांचा समावेश होतो. कायदेमंडळ कायदे तयार करीत असते. कार्यकारी मंडळ या कायदयाची अंमलबजावणी करीत असते. तर न्यायमंडळ कायदयाचा अर्थ सांगून न्याय देण्याचे कार्य करते. म्हणून ही स्वतंत्र अस्तित्व असलेली न्यायव्यवस्था आहे. भारताची न्यायव्यवस्था एकेरी स्वरुपाची आहे. तर अमेरिकेत दुहेरी न्यायव्यवस्था आहे. भारतात सर्वोच्च पातळीवर सर्वोच्च न्यायालय आणि त्याच्या अधीन राज्यातील उच्च न्यायालये आहेत. म्हणजे तालुका न्यायालयापर्यंत एक श्रृंखला निर्माण केली गेली आहे.

कोणत्याही लोकशाही राष्ट्रामध्ये सर्वोच्च न्यायालय असते. व्यक्तिस्वातंत्र टिकवण्यासाठी, राज्यघटनेचे संरक्षण करणे, मूलभूत हक्कांचे रक्षण करणे, कायदेमंडळाने तयार केलेल्या कायद्याचा अर्थ लावणे, संघराज्याचे अस्तित्व टिकविणे, कायद्याचे अधिराज्य निर्माण करणे या कारणामुळे न्यायमंडळाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे.

ब्रिटीश संस्थानिकांमध्ये त्यांची स्वतंत्र न्यायालये होती. भारतातील या सर्व न्यायालयांचे अंतिम अधिकार इंग्लंडमधील प्रिव्ही कौन्सिलच्या न्यायालयीन मंडळाकडे होते. भारतात १८६० पासून उच्च न्यायालये कार्यरत होती. नंतर १९३५ च्या भारत प्रशासन कायद्यात प्रथमच संघ न्यायालयाची तरतूद करण्यात आली. त्या कायद्यातील संघराज्यविषयक भाग अंमलात येऊ शकला नाही. परंतु १ ऑक्टोबर १९३७ रोजी संघ न्यायालय (Federal Court) मात्र अस्तित्वात आले, हे स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेले संघीय न्यायालय होय. या न्यायालयाची रचना, न्यायाधीशांची पात्रता, न्यायालयाचे अधिकारक्षेत्र इत्यादी सर्व बाबीचा आधार आजच्या आपल्या सर्वोच्च न्यायालयास मिळालेला आहे. म्हणून आजची भारताची न्यायव्यवस्था ब्रिटिश राजवटीने दिलेली एक मोलाची देणगी आहे.

२६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात आली. त्याच दिवशी सर्वोच्च न्यायालयाच्या कार्याची सुरुवात झाली. 'भारताचे संघीय न्यायालय' (Federal Court of India) हे नाव बदलून 'भारताचे सर्वोच्च न्यायालय' असे नाव धारण करण्यात आले. प्रिव्ही कौन्सिलचे न्यायमंडळ आणि भारताचे पूर्वीचे संघीय न्यायालय या दोन्ही एकीकरणातून आजचे सर्वोच्च न्यायालय (Supreme Court) निर्माण झाले आहे.

सर्वोच्च न्यायालयाची रचना (Structure of Supreme Court)

राज्यघटनेच्या कलम १२४ - १४७ यात सर्वोच्च न्यायालयासंबधी सविस्तर वर्णन करण्यात आलेले आहे. घटनेतील कलम १२४ नुसार भारताचे एक सर्वोच्च न्यायालय असेल अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार भारतात सर्वोच्च न्यायालयाची २६ जानेवारी १९५० रोजी स्थापना झाली. भारताच्या सर्वोच्च न्यायालयास उच्चतम न्यायालय असे ही संबोधण्यात येते. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्यालय दिल्ली येथे आहे.

भारताच्या सर्वोच्च न्यायालयामध्ये एक सरन्यायाधीश व संसद ठरविल तितके इतर न्यायाधीश असतात. सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेच्या वेळी म्हणजे सन १९५० साली सर्वोच्च न्यायालयात पूर्वी एक सरन्यायाधीश व इतर सात न्यायाधीश असे एकूण आठ न्यायाधीश होते. सन १९५६ साली या कायद्यात बदल करुन न्यायाधीशांची संख्या दहा केली. नंतर सन १९६० मध्ये ती संख्या १३ करण्यात आली. सन १९७७ मध्ये ती संख्या १७ करण्यात आली. सन २००८ मध्ये पुन्हा दुरुस्ती करुन ही संख्या सर्वोच्च न्यायालयात एक सरन्यायाधीश व इतर ३० असे एकूण ३१ न्यायाधीश झाले होते. अलीकडे The Supreme Court (Number of Judges) Amendment Act, 2019 द्वारे सन १९५६च्या मूलभूत कायद्यातील कलम २ मध्ये बदल करण्यात आला. त्यानुसार, न्यायाधीशांची संशोधित मर्यादा (Chief Justice वगळता) ३३ केली गेली. मुख्य न्यायाधीशासह एकूण ३४ न्यायाधीश असतील असे मान्य करण्यात आले. हा कायदा ९ ऑगस्ट २०१९ रोजी लागू झाला.

- **न्यायाधीशांची पात्रता** : राज्यघटनेचे कलम १२४ (३) मध्ये भारतीय सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य व इतर न्यायाधीशांना पदावर नियुक्तीसाठी पात्रता सांगितल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे -
  १) तो भारताचा नागरिक असावा.
  २) किमान पाच वर्षे उच्च न्यायालयातील न्यायाधीशपदाचा अनुभव असावा.
  ३) किमान दहा वर्षे उच्च न्यायालयात खाजगी वकीलीचा अनुभव असावा.
  ४) राष्ट्रपतीच्या मते तो निष्णात कायदेपंडीत असावा.
- **न्यायाधीशाची नेमणूक** : सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाची नेमणूक राष्ट्रपती करतात, परंतु राज्यघटनेचे कलम १२४ (२) नुसार सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाची व इतर न्यायाधीशांची नेमणूक करताना सर्वोच्च न्यायालयात कार्यरत असलेल्या सरन्यायाधीशाचा सल्ला घेणे बंधनकारक राहील. जेष्ठतेनुसार न्यायाधीशांची नेमणूक करण्यात येते.
- **शपथविधी** : राज्यघटनेचे कलम १२४ (६) नुसार प्रत्येक न्यायाधीशाला राष्ट्रपती शपथ देत असतात किंवा राष्ट्रपतीने नियुक्त केलेली व्यक्ती शपथ देत असते.
- **कार्यकाल** : भारतीय राज्यघटनेचे कलम १२४ (२) नुसार मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीशांचा कार्यकाल वयाच्या ६५ वर्षांपर्यंत असतो. म्हणजे यांच्या सेवानिवृतीचे वय ६५ वर्षे ठरविण्यात आलेले आहे. राजीनामा, बडतर्फी, मुत्यू या कारणामुळे कार्यकाल कमी होऊ शकतो.
- **वेतन व भत्ते** : भारतीय राज्यघटनेच्या कलम १२५ नुसार मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीशांच्या वेतनासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. त्या संबंधीचा कायदा करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आलेला आहे. संसद कायदा करुन न्यायाधीशाचे वेतन व इतर भत्ते, सेवानिवृत्ती वेतन, रजा व इतर सेवाशर्ती ठरवित असते. सन १९९८ मध्ये वेतनात बदल करुन सरन्यायाधीशाचे वेतन ३३,००० व इतर न्यायाधीशांचे वेतन ३०,००० रु होते. परंतु त्यामध्ये सुध्दा बदल करुन १ जानेवारी २००६ पासून सरन्यायाधीशाचे वेतन

मासिक १,००,००० (एक लाख रुपये) करण्यात आले तर इतर न्यायाधीशाचे मासिक वेतन ९०,००० करण्यात आले. अलीकडे झालेल्या बदलानुसार सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांचे सध्याचे दरमहा वेतन २,८०,००० रु. तर इतर न्यायाधीशांना दरमहा २,५०,००० रु. वेतन मिळते, (१ जानेवारी २०१६ पासून लागू) याशिवाय इतर भत्ते, मोफत निवासस्थान, वाहन, आरोग्य सेवा इ. दिल्या जातात.

- **सेवानिवृत्तीनंतर व्यवसायावर बंदी :** राज्यघटनेनुसार सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश किंवा इतर न्यायाधीशांना सेवानिवृत्ती नंतर भारतातील कोणत्याही न्यायालयात वकिली करता येत नाही. परंतु शासन सेवानिवृत्त न्यायाधीशावर विशेष कामगिरी सोपवू शकते. उदा. - न्यायमुर्ती श्री. गजेन्द्रगडकर यांना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून नेमले होते. तसेच मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. कानडे यांची त्यावेळच्या मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून नेमणूक केली होती.
- **न्यायाधीशावरील महाभियोग प्रस्ताव :** सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना कार्य करताना स्वतंत्र व निष्पक्षपणे कार्य करता यावे यासाठी घटनात्मक संरंक्षण प्रदान करण्यात आले आहे. सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना पदावरुन दूर करण्यासाठी महाभियोगाची प्रणाली अवलंबिली जाते. भारतीय राज्यघटनेच्या कलम १२४ (४) मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश व कलम २१७ (ब) मध्ये उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावरुन दूर करण्यासाठी महाभियोगाची तरतूद आहे.

  दुराचार (Misbehaviour) व अकार्यक्षमता (Incapacity) या कारणावरुन संसदेत एकाच अधिवेशन काळात सदनाच्या सदस्य संख्येच्या बहुमताने व उपस्थित सदस्यांच्या २/३ बहुमताने महाभियोगाचा प्रस्ताव पास होतो व त्या आधारे राष्ट्रपती न्यायाधीशांना पदावरुन दूर करतात.
- **महाभियोग स्वरुप :** उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावरुन दूर करण्यासाठी केवळ संसदेत महाभियोग प्रस्ताव आणता येतो. सदनाच्या कोणत्याही सभागृहात (लोकसभा किंवा राज्यसभा) हा प्रस्ताव आणता येतो. लोकसभेत १०० सदस्य व राज्यसभेत ५० सदस्यांच्या मंजुरीने प्रस्ताव आणता येतो. त्या सदनाचा लोकसभा (अध्यक्ष) किंवा राज्यसभा (सभापती) एका समितीचे गठन (३ सदस्यीय) करतात. समितीत सर्वोच्च न्यायालयाचे वर्तमान न्यायाधीश, उच्च न्यायालयाचे न्यायाधीश व एक सदस्य हा कायदेतज्ञ असतो. समिती आरोपाची चौकशी करुन आपला अहवाल संसदेत मतदानासाठी ठेवते. सदनाच्या अधिवेशनाच्या एकाच सत्रात हा ठराव मंजूर होणे आवश्यक असते. यासाठी लोकसभा व राज्यसभेच्या संयुक्त अधिवेशनाची तरतूद नाही. स्वतंत्रपणे लोकसभा व राज्यभेत बहुमताने व उपस्थित सदस्यांच्या २/३ बहुमताने हा ठराव पास केला जातो. आरोपी न्यायाधीशास आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाते.

  उदा. १) स्वातंत्र्यानंतर १९९१ मध्ये पहिला महाभियोग प्रस्ताव न्या. वी रामास्वामी यांच्यावर आला जो असहमत झाला पण त्यांनी पुढे आपल्या पदाचा राजीनामा दिला.

  २) सन २००९ साली कोलकत्ता उच्च न्यायालयाचे न्यायाधीश सौमित्र सेन यांच्या विरुध्द महाभियोग प्रस्ताव आला. राज्यसभेत हा प्रस्ताव मंजूर झाला. लोकसभेत हा प्रस्ताव मंजूर होण्यापूर्वीच न्या. सौमित्र सेन यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

  ३) सिक्किमच्या उच्च न्यायालयाचे न्या.पी.डी. दिनाकरन यांच्या विरुध्द असाच प्रस्ताव आला. संसदेत हा प्रस्ताव येण्यापूर्वी त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र

आपल्या देशाचे सर्वोच्च न्यायालय अपीलाचे अंतिम न्यायालय आहे. यामुळे देशातील सर्व न्यायालयात सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय लागू होतात. घटनात्मक अधिकारासोबतच दिवाणी व फौजदारी दाव्यासंबंधीच्या पुनर्निर्णयविषयक अधिकार क्षेत्रामुळे अमेरिकेच्या न्यायालयाच्या तुलनेत सर्वोच्च न्यायालय श्रेष्ठ व अधिकार संपन्न

आहे. परंतु न्यायिक पुनरावलोकन अधिकाराबाबत मात्र ते अमेरिकन सर्वोच्च न्यायालयापेक्षा कमी अधिकाराचे आहे. असे असले तरी एकेरी न्यायव्यवस्थेमुळे भारताचे सर्वोच्च न्यायालय जगातील सर्वश्रेष्ठ व अधिकार संपन्न न्यायालयापेक्षा ब-याच प्रमाणात सरस ठरते. सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र पुढील प्रमाणे :

१) प्रारंभिक अधिकार क्षेत्र (Original Jurisdiction)

२) पुनर्निर्णयाचे अधिकार क्षेत्र (Appellate Jurisdiction)

३) सल्लादायी अधिकार क्षेत्र (Advisory Jurisdiction)

४) आदेशाचे अधिकार क्षेत्र (Writ Jurisdiction)

१) प्रारंभिक अधिकार क्षेत्र (Original Jurisdiction) : प्रारंभिक अधिकार क्षेत्र म्हणजे जे खटले सर्वप्रथम इतर कोणत्याही न्यायालयात दाखल न करता ते फक्त सर्वोच्च न्यायालयातच दाखल केले जातात त्यास सर्वोच्च न्यायालयाचे प्रारंभिक अधिकार क्षेत्र म्हटले जाते.

भारतीय घटनेच्या कलम १३१ नुसार प्रारंभिक अधिकार क्षेत्रात पुढील खटले समाविष्ट केले जातात.

१) केंद्र सरकार व एक किंवा अनेक घटकराज्ये यांतील वाद.

२) दोन किंवा अधिक घटकराज्यातील निर्माण झालेला वाद.

३) एका बाजूला केंद्र सरकार व एक किंवा अनेक राज्य सरकारे आणि दुस-या बाजूला एक किंवा अनेक राज्य सरकारे यांच्यातील वाद.

४) राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीसंबंधीचे वाद.

५) कोणत्याही केंद्रीय कायद्याच्या घटनात्मक वैधतेचा प्रश्न फक्त सर्वोच्च न्यायालयात प्रथम सुनावणीला येऊ शकतो.

६) भारतीय नागरिकांना मूलभूत हक्क दिलेले आहेत. त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर आहे.

या संदर्भातील घटनात्मक खटला चालवण्यासाठी कमीत कमी सात न्यायाधीश असावे लागतात. तसेच २/३ बहुमताने निर्णय घ्यावा लागतो. अशी घटनात्मक तरतूद करण्यात आली आहे.

अपवाद

१) आंतरराज्यीय नद्यांच्या पाणी वाटपासंबधीचे खटले.

२) वित्त आयोगाकडे सोपविलेल्या विषयांच्या सदर्भातील खटले.

३) केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यातील आर्थिक खर्चाच्या तडजोडीमुळे निर्माण होणारे वाद.

२) पुनर्निर्णयाचे अधिकार क्षेत्र (Appellate Jurisdiction) : सर्वोच्च न्यायालय हे पुनर्निर्णयाचे अंतिम व श्रेष्ठ न्यायालय आहे. भारतातील उच्च न्यायालयांनी दिलेल्या निर्णयावर पुनर्निर्णय किंवा पुनर्विचार करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयास आहे. पुढील तीन प्रकारचे दावे पुनर्निर्णयासाठी सर्वोच्च न्यायालयात दाखल केले जातात.

अ) घटनात्मक दावे (The cases involving the interpretation)

ब) दिवाणी दावे (Civil Cases)

क) फौजदारी दावे (Criminal Cases)

अ) घटनात्मक दावे (The cases involving the interpretation) : भारतीय राज्यघटनेने सर्वोच्च न्यायालयाकडे राज्यघटनेच्या संरक्षणाची आणि अर्थ लावण्याची जबाबदारी सोपविलेली असल्यामुळे यासंबधी असणारी सर्व खटले सर्वोच्च न्यायालयाकडे पुनर्निर्णयासाठी पाठविण्याची तरतूद केलेली आहे. एखाद्या खटल्यात उच्च न्यायालयाने निकाल दिलेला असेल आणि घटनेच्या एखाद्या कलमाचा अर्थ लावण्यासंबंधीचा प्रश्न त्यात असेल व असा दाखला उच्च न्यायालयाने दिला असेल तर तो खटला सर्वोच्च

न्यायालयाकडे पुनर्निर्णयासाठी पाठविला जाऊ शकतो. राज्यघटनेची चौकट भंग न होऊ देता, घटनेचे पावित्र्य टिकवून संसदेने व राज्य विधिमंडळांनी केलेले कायदे घटनेविरुध्द जात असल्यास ते अवैध ठरविण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे.

ब) दिवाणी दावे (Civil Cases) :संविधानाच्या कलम १३३ नुसार खालील प्रकारचे दिवाणी खटले सर्वोच्च न्यायालयात पुनर्निर्णयासाठी दाखल केले जाऊ शकतात. ते पुढील प्रमाणे -

१) दिवाणी दाव्याची किंमत २०,००० रु पेक्षा जास्त असेल.

२) दिवाणी दाव्यातील किंमत संसद ठरविल त्यापेक्षा कमी असू नये.

या दोन्ही अटी रद्द झालेल्या आहेत. तिसरी अट अपील करण्यासाठी आवश्यक आहे.

३) एखादा दावा कितीही किंमतीचा असला तरी किंवा कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय काहीही असला तरी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयात कायद्याच्या महत्त्वाचा प्रश्न अंतर्भूत आहे असे प्रमाणित केल्यास तो दावा पुनर्निर्णयासाठी सर्वोच्च न्यायालयात येऊ शकतो.

क) फौजदारी दावे (Criminal Cases) : भारतीय राज्यघटनेतील कलम १३४ मध्ये फौजदारी खटल्याच्या पुनर्निर्णयाबाबत पुढील प्रमाणे तरतुदी करण्यात आल्या आहेत.

१) उच्च न्यायालयाने आरोपीस निर्दोष सोडून दिले असेल तर,

२) उच्च न्यायालयाने आरोपीला फाशीची किंवा जन्मठेपेची शिक्षा दिली असेल तर,

३) कनिष्ठ न्यायालयाने निर्दोष ठरविलेल्या आरोपीस उच्च न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा सुनावली असेल तर,

४) न्यायालयाने एखादा खटला सर्वोच्च न्यायालयात चालविण्यास योग्य आहे असा दाखला दिला असेल तर, भारतातील सर्व न्यायालयाच्या शीर्षस्थानी सर्वोच्च न्यायालय असल्यामुळे इतर न्यायालयातील वरील स्वरुपाचे खटले पुनर्निर्णयासाठी येऊ शकतात.

३) **सल्लात्मक अधिकार क्षेत्र (Advisory Jurisdiction) :** घटनेतील कलम १४३ नुसार सर्वोच्च न्यायालयाला सल्ला देण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. एखादा कायद्याचा किंवा वस्तुस्थितीचा प्रश्न उपस्थित झाल्यास व तो प्रश्न सार्वजनिक महत्वाचा वाटल्यास राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाकडून त्याबाबत सल्ला मागवू शकतो.

४) **आदेशाचे अधिकार क्षेत्र: (मूलभुत हक्काचे संरक्षण) (Writ of Jurisdiction) :** भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीय नागरिकाला त्याच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत हक्क बहाल केलेले आहेत. या मूलभूत हक्कांच्या संरक्षणाची अंतिम जबाबदारी घटनेनेच सर्वोच्च न्यायालयावर टाकलेली आहे. हक्क व्यक्ती, संस्था, गट, शासन यांच्याकडून हिरावून घेण्याची किंवा हक्कांवर गदा येण्याची शक्यता असते अशावेळी घटनेतील कलम ३२ अन्वये मूलभूत हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडे व कलम २२६ अन्वये उच्च न्यायालयाकडे अर्ज करता येतो. यानुसार सर्वोच्च न्यायालय आदेश (Writ) देत असते ते आदेश (Writ) पुढील प्रमाणे आहेत.

अ) बंदी प्रत्यक्षीकरण (Habeas corpus) : व्यक्तीला बेकायदेशीररित्या अटक केली आहे किंवा अन्यायपूर्वक दंड केला आहे असे वाटल्यास अटकेसबंधी विचार करण्यासाठी तो किंवा त्याचे नातेवाईक किंवा मित्र अशा प्रकारचा अर्ज (Writ) न्यायालयात करु शकतात. असा अर्ज न्यायालयात मान्य केल्यास न्यायालय अटक करणा-या व्यक्तीला आदेश देते की, अटकेच्या वेळी न्यायालयात हजर करावे नंतर त्याची चौकशी करुन खरच त्या व्यक्तीला बेकायदेशीर अटक झाली असेल तर त्याची सुटका केली जाते.

आ) परमादेश (Mandamus) : एखादा सरकारी अधिकारी किंवा संस्था आपले कर्तव्य पार पाडीत नसेल व त्यामुळे एखाद्या व्यक्तीवर अन्याय होत असेल तर हा अन्याय दूर करण्यासाठी त्या व्यक्तीला हा अर्ज

न्यायालयात दाखल करता येतो. या आधारावर न्यायालय सरकारी अधिकारी किंवा संस्थेला ते कर्तव्य ताबडतोब पार पाडावे असे आदेश देतो.

इ) प्रतिषेध (Prohibition) : जेंव्हा एखादे कनिष्ठ न्यायालय आपल्या अधिकारक्षमतेबाहेर जाऊन कार्य करीत असेल म्हणजे एखादा न्यायाधीश एखादे कार्य आपल्या अधिकारात नसताना करत असेल तर सर्वोच्च व उच्च न्यायालय असे कार्य करण्यास मनाई करु शकते. म्हणजेच कामकाज थांबवू शकते.

ई) उत्प्रेषण (Certiorari) : कनिष्ठ न्यायालयामध्ये चालू असलेला एखादा खटला वरिष्ठ न्यायालयापुढे चालविला जावा अशा प्रकारचा उत्प्रेषण अर्ज न्यायालयाकडे केला जातो. वरिष्ठ न्यायालयाने अर्ज मंजूर केल्यास ते न्यायालय कनिष्ठ न्यायालयातील संबंधित खटल्याची सुनावणी बंद करुन त्या खटल्याशी संबधित कागदपत्रे (फाईल) वरिष्ठ न्यायालयाकडे पाठविण्याचा आदेश देते. हा आदेश मिळाल्यानंतर कनिष्ठ न्यायालय संबधित खटल्याची कागदपत्रे (फाईल) वरिष्ठ न्यायालयाकडे पाठवून देते.

उ) अधिकार पृच्छा - (Quo Warranto) : एखाद्या सार्वजनिक किंवा शासकीय पदावर अधिकार नसताना एखादी व्यक्ती ते पद भूषवित असेल, तर त्याविरुध्द व्यक्तीला अर्ज करता येतो. पण अर्जदार व्यक्तीचा त्या पदाशी हितसंबध असला पाहिजे व ते पद कायम असावे किंवा त्या पदाची पात्रता त्यांच्याकडे असावी लागते. तेव्हा न्यायालय आपण कोणत्या कायद्यानुसार अधिकार पदावर आहात ? अशी विचारणा पद भूषविणाऱ्या व्यक्तीकडे करते.

भारतीय संविधानात ५ प्रकारचे लेखी आदेश (Writs) दिले आहेत, जे न्यायालये जारी करू शकतात

Writ	**मराठी अर्थ**	**उपयोग**
Habeas Corpus	**शरीर हजर करा**	बेकायदेशीर अटकेविरुद्ध
Mandamus	**परमादेश**	कोणत्याही सार्वजनिक अधिकाऱ्याला कर्तव्य पार पाडण्याचा आदेश
Prohibition	**प्रतिबंध/ प्रतिषेध**	कनिष्ठ न्यायालयाला कार्य थांबवण्याचा आदेश
Certiorari	**उत्प्रेषण**	कनिष्ठ न्यायालयात चालू असलेला खटला थाबवून तो वरिष्ठ न्यायालयाकडे पाठविण्याचा आदेश
Quo Warranto	**अधिकार पृच्छा**	एखाद्या व्यक्तीला त्याच्या पदाच्या वैधतेबाबत विचारणा

५) **इतर अधिकार आणि कार्य :** सर्वोच्च न्यायालयाच्या वरील अधिकारक्षेत्राचा विचार केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाचे काही विशेष अधिकार आणि कार्ये अशी आहेत की, ज्याची वेगळी नोंद घेणे सर्वोच्च न्यायालयाच्या एकूण अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

अ) अभिलेख न्यायालय (Court of Record) : घटनेतील कलम १२९ नुसार सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या सर्व निर्णयांच्या नोंदी ठेवणे, त्याचे जतन करणे हा घटनात्मक अधिकार या न्यायालयास प्राप्त झाला आहे. या नोंदीचा भविष्यकाळात उद्भवणा-या तशाच प्रकारच्या खटल्याच्या वेळी मार्गदर्शक म्हणून उपयोग होतो.

आ) स्वतःच्या निर्णयावर पुनर्निर्णयाचा अधिकार (Review of Judgement) : राज्यघटनेच्या कलम १३७ नुसार सर्वोच्च न्यायालयाला आपल्या दिलेल्या निर्णयावर फेरनिर्णय करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. उच्च न्यायालयांनी केलेली चूक सर्वोच्च न्यायालयात दुरुस्त करता येते. पण सर्वोच्च

न्यायालयाचे कार्य करताना चूक होणारच नाही असे नाही. कारण पुराव्याअभावी चुकीचा निर्णय दिला जाऊ शकतो व निर्णय दिल्यानंतर अचूक पुरावा मिळू शकतो. अशा वेळी सर्वोच्च न्यायालयाला आपली झालेली चूक दुरुस्त करुन स्वतःच्याच निकालाची पुन्हा एकदा तपासणी करुन वेगळा निकाल देण्याचा अधिकार आहे.

इ) न्यायालयीन पुर्नविलोकन (Judicial Review) : न्यायालयीन पुर्नविलोकनाची संकल्पना भारतीय घटनाकारांनी अमेरिकेच्या राज्यघटनेवरुन घेतली आहे. कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्याकडून घटनेशी विसंगत असे वर्तन घडू नये यासाठी सर्वोच्च न्यायालयास हा अधिकार दिलेला आहे. न्यायालयीन पुर्नविलोकन म्हणजे एखादा कायदा घटनाबाह्य असल्यास तो गैरलागू ठरविण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार होय. संसदेने अथवा कोणत्याही राज्याच्या कायदेमंडळाने पास केलेले कायदे घटनेशी सुसंगत आहेत किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार म्हणजे न्यायालयीन पुर्नविलोकन होय. या अधिकाराचा वापर करते वेळी संबधित वाद सुनावणीसाठी कमीत कमी सात न्यायाधीशांचे बेंच बसले पाहिजे. एखादा कायदा अवैध आहे असा निर्णय २/३ बहुमताने दिल्यास संबधित कायदा रद्द होतो.

ई) न्यायालयीन श्रेष्ठत्व :सर्वोच्च न्यायालयाला सर्वोच्च स्थान व सर्वश्रेष्ठत्व मिळाले आहे. न्यायक्षेत्रात त्याचे श्रेष्ठत्व यासाठी आहे की, या न्यायालयाने जाहीर केलेले सर्व कायदे भारताच्या सर्व न्यायालयांवर बंधनकारक असतात. राज्यघटनेचे कलम १४१ अन्वये सर्वोच्च न्यायालयाला ही सर्वश्रेष्ठ सत्ता प्राप्त झाली आहे. याबाबतीत या सत्तेचा कोणतेही न्यायालय विरोध करु शकणार नाही.

उ) न्यायालयाच्या कामकाजाचे नियम (Rules of court) : घटनेचे कलम १४५ नुसार न्यायालयाचे कामकाज चालविण्यासाठी निश्चित स्वरुपाचे नियम असले पाहिजेत. त्यानुसार संसदेने केलेल्या कायद्याच्या तरतुदीच्या अधीन राहून व राष्ट्रपतीच्या मान्यतेने नियम तयार केले जातात. उदाः अपील स्वीकारण्याचे नियम, जामीन मंजूर करण्यासंबधीचे नियम, चौकशी करण्याचे नियम, न्यायालयात कामकाज चालू असेल त्यावर बंदी आणण्याबाबत नियम, कोर्ट फी ठरविण्याचे नियम इ. ठरवण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला प्राप्त झाली आहे. भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार आणि कार्य यासंबधीचे वरील वर्णन लक्षात घेतल्यास आपणास असे आढळून येते की, या अधिकारांची व्यवस्थित अंमलबजावणी करण्यासाठी राज्यघटनेने त्यांचे स्वातंत्र्य अबाधित राखण्याच्या दृष्टीने अनेक तरतुदी केलेल्या दिसतात.

न्यायालयीन सक्रियता (न्यायिक क्रियाशीलता) (Judicial Activism)

न्यायालयीन सक्रियता या संकल्पनेचा उगम, विकास अमेरिकेत झाला. शिक्षण तज्ज्ञ ऑर्थर श्लेसिंजर याने ही संकल्पना सर्वप्रथम मांडली. तर भारतामध्ये न्यायमूर्ती व्ही. आर. कृष्ण अय्यर, न्यायमूर्ती पी. एन. भगवती, न्यायमूर्ती ओ. चिनप्पा रेड्डी, न्यायमूर्ती डी. ए. देसाई यांनी देशातील न्यायिक सक्रियतेचा विचार मांडला. संविधानाची योग्य अंमलबजावणी व्हावी, संविधानाने दिलेल्या अधिकारांचा कोणत्याही सत्तेकडून अनुचित वापर केला जाऊ नये म्हणून या अधिकाराचे महत्व अनन्य साधारण असे आहे. न्यायालयीन सक्रियता म्हणजे नागरिकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आणि समाजात न्यायाला चालना देण्यासाठी न्यायालय स्वतःहून पुढाकार घेऊन सार्वजनिक हिताचे प्रश्न हाताळते आणि सरकार किंवा इतर संस्थांना आदेश देते.

बदलत्या परिस्थितीत कायदेमंडळ आपल्या कर्तव्यपूर्तीत उणीव ठेवत असेल, संविधानाच्या उद्देशाप्रती उदासीन असेल तर त्याकडे लक्ष कोणी द्यावे असे सामान्य नागरिकांना वाटणे सहाजिक आहे. राज्यघटना हा राज्य चालविण्याचा सर्वोच्च कायदा आहे. भारतीय लोकशाही कायम टिकवावयाची असल्यास आपणास सनदशीर मार्गाचा अवलंब करावा लागेल. लोकशाही प्रणाली आंतर व बाहय चांगली ठेवावयाची असल्यास संविधान निर्मित

प्रत्येक घटकाने आपआपल्या अधिकार क्षेत्रात कार्य केले पाहिजे, पण असे दिसत नाही. म्हणून न्यायालयीन सक्रियतेला एक प्रकारची गती मिळालेली आहे.

न्यायालयीन पुनर्विलोकनाची पुढची पायरी म्हणजे न्यायालयीन सक्रियता होय. दुर्गादास बसूच्या मते, गुलाबाच्या फुलाला ज्याप्रमाणे काटे असतात, त्या काट्यामुळेच फुलांचे संरक्षण होते. त्याप्रमाणे न्यायालयीन पुनर्विलोकन संविधानाची जोपासना करणारे काटेच आहेत. कायदेमंडळाच्या घटनादुरुस्तीचाच परिणाम म्हणून न्यायालयीन सक्रियतेचा उगम झाला. यात काही गुणदोष आहेत. यातील दोषाचे परिमार्जन करण्याची आजच्या राजकीय व्यवस्थेत व्यवस्था नाही यांचा एक गंभीर परिणाम संभवतो. तो म्हणजे कायदेमंडळ, न्यायमंडळ यात कटूता येऊ शकते. कारण कायदेमंडळास घटनेत दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे. ते त्यांच्या अधिकाराचा वापर जास्तीत जास्त करतील त्यामुळे न्यायालयाची सक्रियता अधिक गतिमान होईल. यामुळे एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रकार वाढेल, पण हे कोठेतरी थांबले पाहिजे. दोघांच्याही बाजू आपआपल्या परिने योग्य असल्या तरी त्यामुळे संपूर्ण शासकीय व्यवस्थेला तडा जायला नको. जेव्हा कायदे वा कार्यकारी मंडळ निष्क्रीय बनते तेव्हा न्यायालयीन सक्रियतेला अधिक वाव मिळतो. अशा वेळी न्यायालयीन सक्रियतेचे समर्थन केल्यास वावगे ठरणार नाही.

४.२.५ घटना दुरुस्तीच्या पद्धती

घटनेमध्ये वेळोवेळी बदल करण्यासाठी घटनाकारांनी दुरुस्तीच्या काही प्रक्रिया दिल्या आहेत. संविधानामध्ये बदल करण्यासाठी दोन प्रकारच्या पद्धती असतात.

१) **औपचारिक पद्धती :** म्हणजेच संविधानाने दिलेली घटनात्मक प्रक्रिया.

२) **अनौपचारिक पद्धती :** यामध्ये न्यायालयाने वेळोवेळी आपल्या निकालातून लावलेले अर्थ आणि दिलेल्या व्याख्या.

१) **औपचारिक पद्धती :** प्रत्येक राज्यघटनेमध्ये घटनादुरुस्तीसाठी थोड्याफार प्रमाणात औपचारिक पद्धतींचा समावेश केलेला असतो. या पद्धतीमध्ये बदलती सामाजिक परिस्थिती आणि गरजेनुसार राज्यघटनेतील तरतुदींमधील भाषा बदलणे किवा नवीन तरतुदींचा समावेश केला जातो. काही देशांमध्ये घटनादुरुस्तीची ही प्रक्रिया इतर देशांपेक्षा खूप सहज आणि सोपी असते. आणि काही देशांमध्ये ही प्रक्रिया 'लवचिक' आणि कठोर' यामध्ये विभागलेली असते

साधारणपणे सामान्य कायदे मंजूर करताना लवचिक राज्यघटनेमध्ये घटना दुरुस्तीची प्रक्रिया ही तुलनात्मकरित्या सहज आणि सोपी, त्याचे सगळ्यात सर्वोत्तम उदाहरण म्हणजे इंग्लंडच्या राज्यघटनेमध्ये घटनादुरुस्ती करताना ती ब्रिटीश संसदेने पारित केलेल्या सामान्य कायद्याने देखील होऊ शकते. ब्रिटीश राज्यघटनेमध्ये सामान्य कायदे बनविण्याची प्रक्रिया आणि घटनात्मक प्रक्रिया यामध्ये काही फरक नाही

२) **अनौपचारिक पद्धती :** या पद्धतीचा अवलंब करताना घटनेतील कोणत्याही तरतुदींमध्ये बदल होत नाही. परंतु तरतुदीमधील व्याख्येचा अर्थ मात्र बदलतो. उदा. भारतीय राज्यघटनेमधील कलम २१ चा न्यायालयाने आपल्या वेगवेगळ्या खटल्यांमध्ये अर्थ लावताना कलम २१ मधील मूळ व्याख्येला स्पर्श न करता त्यामध्ये विविध हक्कांचा समावेश केला. राज्यघटनेमधील एखाद्या कलमाचा अर्थ हा एक असू शकतो. परंतु त्याच्या संदर्भाचा विचार करता ते वेगळे असू शकतात.

कलम ३६८ (१) नुसार संसदेला घटनेतील कोणत्याही तरतुदीमध्ये भर घालणे, बदल करणे किंवा काढून टाकणे या मार्गांनी या कलमात सांगितलेल्या पद्धतीनुसार सुधारणा करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

केशवानंद भारती केस मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार संसद घटना दुरुस्ती करताना घटनेच्या मूलभूत संरचनेत बदल करू शकणार नाही असा निवाडा दिलेला आहे

घटनादुरुस्ती संबधी घटनेतील तरतुदी

घटना दुरुस्तीची पद्धत कलम ३६८ (२) मध्ये पुढीलप्रमाणे दिलेली आहे.

१) घटना दुरुस्तीची सुरुवात संसदेच्या कोणत्याही सभागृहात संबंधित विधेयक मांडूनच करता येईल. असे विधेयक राज्य विधिमंडळांना मांडता येणार नाही.

२) मंत्र्याला किंवा खाजगी सदस्याला विधेयक मांडता येईल. यासाठी राष्ट्रपतीच्या पूर्वसंमतीची आवश्यकता नाही.

३) हे विधेयक दोन्ही सभागृहांमध्ये विशेष बहुमताने संमत होणे गरजेचे असते. म्हणजेच हे विधेयक त्या-त्या सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने व त्या सभागृहाच्या उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी किमान दोन-तृतीयांश इतक्या सदस्यांच्या बहुमताने संमत होणे गरजेचे असते.

४) दोन्ही सभागृहांमध्ये हे विधेयक स्वतंत्ररित्या पारित होणे आवश्यक आहे यासाठी संयुक्त बैठकीची (कलम-१०८) तरतूद नाही.

५) घटनादुरुस्ती विधेयकामुळे घटनेतील संघराज्य तरतुदींमध्ये (Federal Provisions)बदल होणार असेल तर हे घटनादुरुस्ती विधेयक राष्ट्रपतींना संमतीसाठी सादर करण्यापूर्वी किमान निम्म्या राज्यांच्या विधिमंडळाने साध्या बहुमताने त्यास समर्थन देणे आवश्यक असेल.

६) दोन्ही सभागृहांमध्ये विधेयक पारित झाल्यानंतर आवश्यक असल्यास राज्य विधान मंडळांचे समर्थन घेतल्यानंतर राष्ट्रपतींच्या संमतीसाठी पाठवले जाईल.

७) राष्ट्रपतींच्या संमतीनंतर घटनादुरुस्ती विधेयकाचे घटनादुरुस्ती कायद्यात रूपांतर होईल आणि त्यानुसार घटनेत बदल केला जाईल.

घटनादुरुस्तीचे प्रकार

कलम ३६८ मध्ये घटना दुरुस्तीचे दोन प्रकार दिलेले आहेत. संसदेच्या विशेष बहुमताने आणि संसदेच्या विशेष बहुमताबरोबर निम्म्या राज्यांच्या साध्या बहुमताने. घटनेच्या काही तरतुदी मध्ये संसदेच्या साध्या बहुमताने दुरुस्ती करण्याची तरतूद देण्यात आली आहे. अशा घटना दुरुस्तींला घटनादुरुस्ती असे समजण्यात येत नाही. भारतीय राज्यघटनेत तीन प्रकारे दुरुस्ती करता येते

१) **संसदेच्या साध्या बहुमताने :** संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या साध्या बहुमताने घटनेत अनेक तरतुदींमध्ये दुरुस्ती करता येते. परंतु ही पद्धत कलम ३६८ अंतर्गत येत नाही, यामध्ये केवळ साधे बहुमत पुरेसे असते. उदाहरणार्थ: राज्यांमध्ये विधानपरिषद यांची निर्मिती किंवा नष्ट करणे, संसदेच्या कामकाजाचे नियम, केंद्रशासित प्रदेश, नागरिकत्व, संसदेची गणसंख्या, संसदेत इंग्रजीचा वापर, संसद सदस्यांचे वेतन व भत्ते इत्यादी.

२) **संसदेच्या विशेष बहुमताने :** कलम ३६८ अंतर्गत घटनेतील तरतुदी मध्ये संसदेच्या विशेष बहुमताने घटना दुरुस्ती करता येते. यासाठी दोन्ही सभागृहांमध्ये स्वतंत्ररीत्या सभागृहांच्या एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने व उपस्थित व मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश इतक्या सदस्यांच्या बहुमताने पारित होणे गरजेचे असते. यामध्ये मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे, प्रास्ताविक इत्यादी. पहिल्या व तिसऱ्या पद्धतीमध्ये न येणाऱ्या तरतुदींमध्ये दुरुस्ती या पद्धतीने केली जाते

३) **संसदेच्या विशेष बहुमताने सोबत निम्म्या राज्यांच्या साध्या बहुमताने :** भारतीय राज्यघटनेतील संघराज्य तरतुदींमध्ये दुरुस्ती करण्यासाठी घटना दुरुस्ती विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये विशेष बहुमताबरोबरच किमान निम्म्या राज्यांनी साध्या बहुमताने संमती देणे गरजेचे असते. यासाठी राज्यांवर कोणतीही कालावधीची मर्यादा घालण्यात येत नाही. यामध्ये राष्ट्रपती, उपराष्ट्रपतीची निवड, केंद्र व राज्यांमधील अधिकार वाटप, सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार आणि संसद व राज्य विधिमंडळाचे संबंध इत्यादी.

स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न.

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. भारताचे प्रथम नागरिक म्हणून कोणास ओळखले जाते ?
२. राज्यसभेचा पदसिद्ध अध्यक्ष कोण असतो ?
३. एखादे विधेयक धन विधेयक आहे किंवा नाही, हे ठरविण्याचा अधिकार कोणास आहे ?
४. राष्ट्रपतीच्या निवडीसंदर्भात विवाद निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार कोणास असतो?
५. भारतीय संसदेला राज्यघटनेच्या कोणत्या कलमानुसार घटनादुरुस्तीचा अधिकार प्राप्त झाला आहे?

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **Writ :** आदेश
- **महाभियोग :** घटनात्मक पदावरील व्यक्तींना पदावरून हटविण्याच्या प्रक्रियेला महाभियोग असे म्हटले जाते.
- **बरखास्त :** संपविणे किंवा नष्ट करणे
- **पृथक्करण:** विभागणी करणे

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. राष्ट्रपती २. उपराष्ट्रपती ३. लोकसभा अध्यक्ष
४. सर्वोच्च न्यायालय ५. कलम ३६८

४.५ सारांश

भारतीय लोकशाही व्यवस्था ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही आहे. या व्यवस्थेचा गाभा म्हणजे भारतीय संविधान, जे २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाले. संविधानाने भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही आणि प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून घोषित केले आहे. भारतीय शासनव्यवस्थेत तीन प्रमुख घटक आहेत - विधिमंडळ (Legislature), कार्यकारी (Executive), आणि न्यायपालिका (Judiciary). या व्यवस्थेच्या केंद्रस्थानी भारतीय संसद आहे. संसद ही सर्वोच्च विधिमंडळ संस्था असून ती दोन सभागृहांपासून — लोकसभा व राज्यसभा — बनलेली आहे. लोकसभा ही संसदेचे कनिष्ठ सभागृह आहे. ती थेट जनतेतून निवडली जाते. लोकसभेतील सदस्यांची कमाल संख्या ५५२ असून सध्या त्यात ५४५ सदस्य कार्यरत आहेत. लोकसभा ही पाच वर्षांसाठी निवडली जाते, मात्र काही वेळा ती विसर्जितही केली जाते. लोकसभेचा अध्यक्ष (Speaker) हा सभेच्या कामकाजाचा प्रमुख असतो.

राष्ट्रपती हा भारतीय गणराज्याचा सर्वोच्च घटनात्मक प्रमुख आहे. तो संसद, कार्यकारी आणि लष्कराचा प्रमुख मानला जातो. राष्ट्रपतीची निवड अप्रत्यक्ष पद्धतीने – राज्यसभा, लोकसभा आणि सर्व राज्यांच्या विधानसभा सदस्यांद्वारे केली जाते. राष्ट्रपतीचे कार्य कार्यकारी मंडळाच्या (म्हणजेच मंत्रिमंडळाच्या) सल्ल्यानुसार चालते. संसद सत्र बोलावणे, विधेयकांवर स्वाक्षरी करणे, आपत्कालीन सत्तेचा वापर करणे, राज्यपालांची नियुक्ती करणे हे त्याचे प्रमुख अधिकार आहेत.

सर्वोच्च न्यायालय हे भारतीय संविधानाचे संरक्षक मानले जाते. मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीस मिळून एक न्यायसंस्था बनते. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय संपूर्ण देशभर बंधनकारक असतात. ते मूलभूत अधिकारांचे संरक्षण करते. संविधानाने सर्वोच्च न्यायालयाला अपील न्यायालय, मूलभूत अधिकारांचे रक्षण करणारे न्यायालय म्हणून अधिकार दिले आहेत. जर सरकार किंवा संसदेने संविधानाच्या विरोधात काही निर्णय घेतले, तर सर्वोच्च न्यायालय त्याला घटनाविरोधी घोषित करू शकते.

घटना दुरुस्तीची प्रक्रिया संविधानाच्या कलम ३६८ मध्ये नमूद केली आहे. संविधान हे स्थिर असले तरी कालसुसंगत ठेवण्यासाठी त्यात दुरुस्त्यांची आवश्यकता असते. काही दुरुस्त्या फक्त संसदेमार्फत करता येतात, तर काहींसाठी अर्ध्या राज्यांच्या संमतीची आवश्यकता असते. दुरुस्ती करण्यासाठी दोन्ही सभागृहांतून त्या प्रस्तावाला दोन तृतीयांश उपस्थित सदस्यांचे आणि एकूण सदस्यांच्या किमान निम्म्यांचे बहुमत मिळणे आवश्यक असते. काही महत्वाच्या दुरुस्त्या- जसे की राष्ट्रपती अधिकार, राज्यांचा संरचना बदल, न्यायव्यवस्थेसाठी राज्य विधानसभांची मंजुरीही आवश्यक असते. आजपर्यंत १०० पेक्षा अधिक घटनादुरुस्त्या पार पडल्या आहेत. काही महत्त्वाच्या दुरुस्त्या म्हणजे -४२ वी दुरुस्ती (१९७६) जी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेमध्ये "समाजवादी" आणि "धर्मनिरपेक्ष" समाविष्ट केले ७३ वी आणि ७४ वी दुरुस्ती जी पंचायत राज व नगरपालिकाशी संबंधित आहे.

भारतीय शासन व्यवस्थेमुळे लोकशाही कार्यक्षम व गतिशील राहते. संसद कायदे बनवते, कार्यपालिका ते अंमलात आणते, तर न्यायपालिका त्यावर नियंत्रण ठेवते. भारतीय लोकशाहीची व्यवस्था ही सुसंवाद, समतोल आणि सहभागाच्या तत्त्वांवर आधारित आहे. संसद, राष्ट्रपती, न्यायालय आणि संविधान दुरुस्ती प्रक्रिया या सर्व एकमेकांशी निगडीत असून देशाच्या घटनात्मक बांधणीत महत्त्वाची भूमिका बजावतात. या संस्थांच्या प्रभावी कार्यप्रणालीमुळे भारतीय लोकशाही मजबूत व स्थिर राहते.

४.६. सरावासाठी स्वाध्याय

खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा

१. भारताच्या राष्ट्रपती पदाची निवडणूक प्रक्रिया विशद करा.
२. 'महाभियोग' यावर टीप लिहा.
३. भारताच्या राष्ट्रपतीचे अधिकार आणि कार्य स्पष्ट करा.
४. राज्यसभेची रचना सांगून त्यांचे अधिकार आणि कार्य विशद करा.
५. लोकसभेची रचना सांगून त्यांचे अधिकार आणि कार्य विशद करा.
६. सर्वोच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र स्पष्ट करा.
७. भारतीय राज्यघटना दुरुस्तीच्या पद्धतीचे विश्लेषण करा.

४.७. अधिक वाचनासाठी पुस्तके

१. चौधरी रा. अ. (२०२४). *भारताचे संविधान.* पुणे, चौधरी लॉ पब्लीशर्स.

२. लक्ष्मीकांत, एम. (मराठी) (२०१७). *इंडियन पॉलिटी.* पुणे, के. सागर पब्लिकेशन.

३. Lakshmikant, M. (2022). *Indian Polity*. Chennai, McGraw-Hill Education [India] Private Limited

४. Basu D. D. (2018). *Introduction of the Indian Constitution*. Gurgaon, LexisNexis.

५. R.R. Sethi and Vidya Dhar Mahajan (1954). *Indian Constitution and Administration*. Delhi, S. Publisher.

६. गावंडे, सु. ल. (२०१३*). भारतीय प्रशासन.* पुणे, शिवानी प्रकाशन.

७. सोनकांबळे, ह. नि. (२०२०). *भारतीय संविधान.* औरंगाबाद, पार्थ पब्लिकेशन.

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

ज्ञानगंगोत्री, गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - ४२२ २२२

दूरध्वनी : (०२५३) २२३१७१४ | २२३१७१५ | २२३०१०६ | २२३०४५९

फॅक्स : (०९१) (०२५३) २२३१७१६

http://ycmou.ac.in / http://ycmou.digitaluniversity.ac

LOCATION

Design : Kanchan Shinde | AB-25-188